सोलापूर
# तरुण भारत
Solapur Tarun Bharat
न मे कर्मफले स्पृहा
छत्रपती संभाजीनगर, अहिल्यानगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित
छत्रपती संभाजीनगर | गुरूवार, दि. २८ मे २०२६ | वर्ष – ४ थे | अंक ४४ | पाने : ८ | किंमत रु. ६/– | dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

## जलजीवन मिशनच्या ५१ हजार योजनांचा आढावा ; नदीजोड प्रकल्पाला प्राधान्य देणार

### केंद्रीय जलशक्ती मंत्र्यांच्या उपस्थितीत जलजीवन मिशनमधील योजनांचा दिल्लीत आढावा

वृत्तसंस्था

नवी दिल्ली : महाराष्ट्रात सध्या सुमारे ५१ हजार जलजीवन मिशनच्या योजना सुरू असून त्यांचा सविस्तर आढावा घेण्यात आला. अपूर्ण किंवा त्रुटी असलेल्या योजनांची पूर्तता कशी करता येईल, तसेच पाण्याच्या स्रोतांशी संबंधित अडचणींवर मार्ग कसा काढता येईल, याबाबत सकारात्मक चर्चा झाल्याची माहिती उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिली.केंद्रीय जलशक्ती मंत्री सी. आर. पाटील यांच्या अध्यक्षतेखाली नवी दिल्लीतील अंत्योदय भवन, सीजीओ कॉम्प्लेक्स येथे जलजीवन मिशन आणि पाणीटंचाईच्या अनुषंगाने महत्त्वपूर्ण बैठक पार पडली. या बैठकीस मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार, जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील, पाणीपुरवठा मंत्री गुलाबराब पाटील, यांच्यासह सबंधित विभागाचे अधिकारी उपस्थित होते.



बैठकीनंतर पत्रकारांशी बोलताना शिंदे म्हणाले की, राज्यातील सर्व योजनांचा सखोल आढावा घेण्यात आला. अनेक योजना पूर्णत्वाच्या मार्गावर असून काही योजनांमध्ये तांत्रिक बदल आवश्यक ठरले आहेत. काही भागांमध्ये पाण्याचे स्रोत कोरडे पडल्याने निर्माण झालेल्या अडचणींवर उपाययोजना कशा करता येतील, यावरही सविस्तर चर्चा करण्यात आली.योजनांमधील त्रुटी दूर करून त्यांची प्रभावी अंमलबजावणी सुनिश्र्चित करण्यासाठी विविध पर्यायांवर विचारविनिमय झाला. संबंधित विभागांना आवश्यक त्या सुधारणा करून कामांना गती देण्याबाबतही सूचना देण्यात आल्या.

यावेळी राज्यासाठी महत्त्वाच्या ठरणाऱ्या नदीजोड प्रकल्पावर विशेष चर्चा करण्यात आली. हा प्रकल्प महाराष्ट्रातील विशेषतः मराठवाडा आणि इतर दुष्काळग्रस्त भागांसाठी वरदान ठरणार असल्याचे शिंदे यांनी सांगितले. या प्रकल्पामुळे सिंचनक्षेत्र वाढण्यास मदत होणार असून दुष्काळमुक्त महाराष्ट्राच्या दिशेने महत्त्वाचे पाऊल उचलले जाईल, असा विश्र्वास त्यांनी व्यक्त केला.पंतप्रधानांनीही नदीजोड प्रकल्पाला प्राधान्य दिले असून केंद्रीय जलशक्ती मंत्री सी. आर. पाटील यांनी बैठकीत त्याबाबत सकारात्मक भूमिका मांडल्याचे शिंदे यांनी नमूद केले. शेतकऱ्यांच्या हिताच्या दृष्टीने आणि अधिकाधिक जमीन ओलिताखाली आणण्यासाठी ही बैठक अत्यंत उपयुक्त ठरल्याचे त्यांनी सांगितले.

दरम्यान, जलसंधारणासाठी राबविण्यात येणाऱ्या 'जलतारा' उपक्रमाच्या विस्तारावरही बैठकीत चर्चा झाली. श्री श्री रविशंकर यांच्या संस्थेसोबत या उपक्रमासाठी सामंजस्य करार करण्यात आला असून त्याचे काम डॉ. पुरुषोत्तम यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू असल्याची माहिती शिंदे यांनी दिली. राज्यात सध्या सुमारे ६५ हजार जलतारा संरचना उभारण्यात आल्या आहेत. मात्र, भूजलपातळी वाढविण्यासाठी आणि पाणी अधिक प्रमाणात जमिनीत मुरावे यासाठी या उपक्रमाची व्याप्ती आणखी वाढविणे आवश्यक असल्याचे शिंदे यांनी स्पष्ट केले. यामुळे भूजलसाठ्यात वाढ होऊन शेतकऱ्यांना मोठा लाभ मिळेल, असेही त्यांनी सांगितले

## म्हाडा लॉटरी २०२६ ला प्रचंड प्रतिसाद!

### मुंबईतील २,६४० घरांसाठी ८२ हजारांहून अधिक अर्ज




तभा वृत्तसेवा

मुंबई : मुंबईत स्वतःच्या हक्काच्या घराचे स्वप्न पाहणाऱ्या हजारो नागरिकांसाठी म्हाडाची घरांची सोडत मोठी संधी ठरत आहे. महाराष्ट्र गृहनिर्माण आणि क्षेत्रविकास प्राधिकरणाच्या (म्हाडा) मुंबई मंडळाच्या २,६४० घरांच्या सोडतीला नागरिकांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत असून आतापर्यंत तब्बल ८२ हजारांहून अधिक अर्ज दाखल झाले आहेत. विशेष म्हणजे, अर्ज प्रक्रियेसाठी अवघे ३ दिवस शिल्लक असल्याने अंतिम मुदतीपर्यंत अर्जांची संख्या आणखी वाढण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

मुंबईतील वाढत्या घरांच्या किमतींमुळे सर्वसामान्य आणि मध्यमवर्गीय कुटुंबांसाठी घर खरेदी करणे दिवसेंदिवस कठीण होत चालले आहे. अशा परिस्थितीत म्हाडाकडून परवडणाऱ्या दरात उपलब्ध करून दिलेल्या घरांकडे नागरिकांचे विशेष लक्ष लागले आहे. विक्रोळी, गोरेगाव, बोरीवली, चेंबूर, वडाळा, घाटकोपर, पवई, दादर, वांद्रे आणि गोराई यांसारख्या प्रमुख भागांमध्ये घरे उपलब्ध असल्याने अर्जदारांकडून मोठ्या प्रमाणात प्रतिसाद मिळत आहे.

## शरद पवार ब्रीच कँडी रुग्णालयात दाखल

तभा वृत्तसेवा



मुंबई : राष्ट्रवादी काँग्रेसचे (शरदचंद्र पवार) अध्यक्ष आणि ज्येष्ठ नेते शरद पवार यांना प्रकृती अस्वास्थ्यामुळे मुंबईतील ब्रीच कँडी रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. दिल्लीहून परतल्यानंतर काहीसा त्रास जाणवू लागल्याने डॉक्टरांच्या सल्ल्यानुसार त्यांना तातडीने रुग्णालयात नेण्यात आले. सध्या रुग्णालयातील तज्ज्ञ डॉक्टरांच्या देखरेखीखाली त्यांच्या विविध वैद्यकीय चाचण्या आणि तपासण्या सुरू आहेत.

शरद पवार यांची प्रकृती सध्या स्थिर असून काळजी करण्याचे कोणतेही कारण नसल्याचे त्यांच्या निकटवर्तीयांकडून सांगण्यात आले आहे.

मात्र, रुग्णालयात दाखल व्हावे लागल्यामुळे त्यांचे आगामी सर्व नियोजित दौरे आणि कार्यक्रम तात्पुरते रद्द करण्यात आले आहेत. डॉक्टरांनी त्यांना पूर्ण विश्रांती घेण्याचा सल्ला दिला असून, सध्या सुरू असलेल्या सर्व वैद्यकीय चाचण्यांचे अहवाल आल्यानंतरच त्यांना रुग्णालयातून डिस्चार्ज दिला जाईल.

## मुंबईत अवघ्या नऊ महिन्यांच्या मुलीचे यकृत प्रत्यारोपण

तभा वृत्तसेवा

मुंबई : लहान मुलांमध्ये यकृत प्रत्यारोपणाची शस्त्रक्रिया आव्हानात्मक असते. मात्र बिहारहून आलेल्या एका नऊ महिन्यांच्या बाळावर मुंबईतील महापालिकेच्या नायर रुग्णालयाच्या सहकार्याने खासगी रुग्णालयामध्ये यशस्वी यकृत प्रत्यारोपण शस्त्रक्रिया करण्यात आली.

सोना (नाव बदलले आहे) ही अवघ्या चार महिन्यांची असताना तिला बिलिअरी अट्रेशिया या गंभीर आजाराचे निदान झाले होते.



या यकृतविकाराच्या प्रगत स्थितीमध्ये तिचे वजन ५.८ किलो होते. त्यासह पोर्टल व्हेन अट्रेशिया यांसारखी गंभीर वैद्यकीय गुंतागुंत होती. या मुलीचे पालक वैद्यकीय उपचारासाठी तिला मुंबई महापालिकेच्या नायर रुग्णालयामध्ये घेऊन येत. मात्र कावीळ आणि यकृतासंदर्भातील इतर गुंतागुंतींमुळे तिची प्रकृती बिघडली. त्यावेळी गॅस्ट्रोएन्टेरोलॉजिस्ट डॉ. अनिल तांबे यांचे वैद्यकीय मत घेण्यात आले. डॉ. तांबे नायर रुग्णालयामध्ये मानद डॉक्टर म्हणून वैद्यकीय सेवा देतात. या बालरुग्णाला यकृत प्रत्यारोपणाची गरज असल्याचे निदान झाले. बाळाच्या वडिलांनी यकृत दान करण्याचा निर्णय घेतला. त्यानुसार आवश्यक वैद्यकीय तपासण्या आणि उपचार सुरू करण्यात आले.

नायर रुग्णालयामध्ये यासाठी लागणाऱ्या वैद्यकीय तपासण्या करण्यात आल्या. प्रत्यारोपण समितीसह इतर वैद्यकीय प्रक्रिया या खासगी रुग्णालयांमध्ये पूर्ण करण्यात आल्या. या कुटुंबासमोर खर्चाचेही आव्हान होते. अनेक वैद्यकीय तसेच धर्मादाय संस्था या कुटुंबाच्या पाठीमागे भक्कम उभ्या राहिल्या.

या लहानग्या जिवाने दाखवलेली चिकाटी आणि धैर्य पाहून रुग्णालयातील डॉक्टरांचेही डोळे पाणावले. शस्त्रक्रियेनंतरचा काळ तिच्यासाठी खूप कठीण होता. तिला ट्रॅकिओस्टॉमी (श्वासनलिकेला छेद देण्याची वैद्यकीय प्रक्रिया) करावी लागली. मात्र या प्रक्रियेस सकारात्मक प्रतिसाद देऊन तिच्या प्रकृतीमध्ये सुधारणा झाली आहे.




एक योजना, एक प्रिमियम,
जी तुम्हा दोघांचे संरक्षण करते.

एलआयसीची नवीन जीवन साथी
एकल प्रिमियम
यूआयएन: 512N393V01 | प्लॅन नं.: 888
नॉन–पार, नॉन–लिंक्ड, जीवन, व्यक्तिगत, बचत योजना

मुख्य वैशिष्ट्ये:
- पती आणि पत्नी यांच्यासाठी एकाच पॉलिसीअंतर्गत संयुक्त जीवन संरक्षण
- संपूर्ण पॉलिसी कालावधीत प्रति ₹1000/– मूलभूत विमा रकमेवर @ ₹70/– हमीयुक्त वाढीव लाभ
- अधिक संरक्षणासाठी अतिरिक्त रायडर पर्याय उपलब्ध
- विद्यमान पॉलिसीधारक तसेच मृत पॉलिसीधारकांच्या नामनिर्देशित/लाभार्थ्यांसाठी सवलती उपलब्ध
- कर्ज सुविधा उपलब्ध


LIC/R1/2026-27/05/Mar

ऑनलाईन देखील उपलब्ध

क्यूआर कोड स्कॅन करा आणि My LIC App डाऊनलोड करा
भेट द्या: licindia.in
कॉल सेंटर सेवा (022) 6827 6827
आमचा व्हॉट्सॲप नं. 8976862090 बोला 'Hi'

LIC
भारतीय आयुर्विमा महामंडळ
भारतीय जीवन बीमा निगम
LIFE INSURANCE CORPORATION OF INDIA
प्रत्येक क्षणी तुमच्या सोबत

अधिक माहितीसाठी तुमचे विमा एजंट/तुमच्या नजीकच्या एलआयसी शाखेबरोबर संपर्क साधा/www.licindia.in वर जा
आम्हाला फॉलो करा: LIC India Forever | IRDAI Regn No.: 512
भ्रामक फोन कॉल्स आणि बनावट/फसव्या ऑफर्सपासून सावध रहा. आयआरडीएआय किंवा त्यांचे अधिकारी विमा पॉलिसींची विक्री, बोनस जाहीर करणे किंवा प्रिमियमची गुंतवणूक, रकमा परत करणे यासारख्या विमा व्यवसायाशी संबंधित कोणत्याही कामकाजात सहभाग घेत नाहीत, अशा प्रकारचे दुरध्वनी येणाऱ्या पॉलिसीधारकांनी अथवा संभाव्य ग्राहकांनी पोलिसांकडे तक्रार नोंदवावी. कृपया विक्रीचा व्यवहार पूर्ण करण्यापुर्वी अधिक माहितीसाठी तसेच जोखमींचे घटक, नियम व अटी यासंबंधीच्या माहितीसाठी, विक्री माहितीपुस्तिका काळजीपूर्वक वाचा.




LIC's नवीन जीवन साथी
मर्यादित हप्ता
यूआयएन: 512N394V01 प्लॅन नं. 889
नॉन–पार, नॉन–लिंक्ड, जीवन, व्यक्तिगत, बचत योजना

- एकाच पॉलिसीमध्ये तुमच्यासाठी आणि तुमच्या जोडीदारासाठी संयुक्त जीवन विमा
- हप्ता भरण्याची मर्यादित मुदत
- भरलेल्या एकूण वार्षिक हप्त्यावर 7% हमीपूर्वक वृध्दी
- विद्यमान पॉलिसीधारकांसाठी आणि मृत पॉलिसीधारकाच्या वारसासाठी/लाभार्थ्यासाठी सवलती
- कर्जाची सुविधा उपलब्ध

ऑनलाइनसुध्दा उपलब्ध

डाऊनलोड करा एलआयसी मोबाईल ॲप | भेट द्या:licindia.in | कॉल सेंटर सेवा (022) 6827 6827
अधिक माहितीसाठी आपल्या एजंटला/जवळच्या एलआयसी शाखेला संपर्क करा/भेट द्या: www.licindia.in
आम्हाला फॉलो करा: LIC India Forever | IRDAI Regn No.: 512
आमचा व्हॉट्सॲप नं. 8976862090 बोला 'Hi'
LIC
भारतीय आयुर्विमा महामंडळ
LIFE INSURANCE CORPORATION OF INDIA
प्रत्येक क्षणी तुमच्या सोबत
LIC/O1/2026-27/04/Mar
बनावट फोन कॉल्सपासून आणि खोट्या/फसव्या ऑफर्सपासून सावध राहा. आयआरडीएआय किंवा त्यांचे अधिकारी विमा पॉलिसींची विक्री, बोनस जाहीर करणे किंवा प्रिमियमची गुंतवणुक, रकमा परत करणे यासारख्या विमा व्यवसायाशी संबंधित कोणत्याही कामकाजात सहभाग होत नाहीत, अशा प्रकारचे दूरध्वनी येणाऱ्या पॉलिसीधारकांनी अथवा संभाव्य ग्रहकांनी पोलिसांकडे तक्रार नोंदवावी. जोखीम घटकांवर, नियम व अटींवर अधिक माहिती मिळवण्यासाठी, कृपया विक्री समाप्त करण्यापूर्वी विक्री पुस्तिका काळजीपूर्वक वाचून घ्या.



सोयगाव - मुंबई मंत्रालय येथे राज्यमंत्री मेघनाताई बोर्डीकर यांना आज मंत्रालय मुंबई येथे भाजपा अल्पसंख्यांक मोर्चाचे प्रदेश अध्यक्ष इद्रिस मुलतानी व सुरेश बनकर पाटील व सोयगाव पंचायत समिती सदस्य राहुल राठोड सोबत फर्दापूर पाणी टंचाई असल्या कारणाने दुरुस्ती करता राज्यमंत्री मेघनाताई बोर्डीकर ५० लाख रुपये मंजूर केले त्याबद्दल प्रत्यक्ष भेटून राज्यमंत्री मेघनाताई बोर्डीकर यांचे धन्यवाद मानले.

# घृष्णेश्वर मंदिर परिसरातील विकासकामांना हिरवा कंदील; भाविकांसाठी अत्याधुनिक सुविधांचे बांधकाम होणार

## लाखो भाविकांना मिळणार प्रतीक्षा कक्ष, भक्त निवास, सभा मंडपासह विविध सुविधा

छत्रपती संभाजीनगर तभा वृत्तसेवा प्रतिनिधी : देशातील प्रसिद्ध १२ ज्योतिर्लिंगांपैकी एक असलेल्या श्री घृष्णेश्वर मंदिर परिसरातील भाविकांच्या सोयीसाठी महत्त्वपूर्ण विकासकामांना राष्ट्रीय स्मारक प्राधिकरणाकडून (NMA) मंजुरी मिळाली आहे. मंदिर परिसरातील नियंत्रित क्षेत्रात विविध सार्वजनिक सुविधा उभारण्यासाठी G+1 मजली भव्य बांधकामास अधिकृत परवानगी देण्यात आली असून, त्यामुळे देशभरातून येणाऱ्या लाखो भाविकांना आधुनिक व आंतरराष्ट्रीय दर्जाच्या सुविधा उपलब्ध होणार आहेत.



सांस्कृतिक मंत्रालय, भारत सरकार अंतर्गत सक्षम प्राधिकारी कार्यालय (महाराष्ट्र राज्य, मुंबई) यांनी दि. २५ मे २०२६ रोजी यासंदर्भातील अधिकृत मंजुरी पत्र (Form IV) निर्गमित केले. नवी दिल्ली येथे दि. २० मे २०२६ रोजी झालेल्या राष्ट्रीय स्मारक प्राधिकरणाच्या ५१९ व्या बैठकीत या प्रकल्पास मंजुरी देण्यात आली. जिल्हाधिकारी विनय गौडा जी. सी. यांनी बैठकीत या प्रकल्पाचे सादरीकरण केले. यावेळी वेणुगोपाल रेड्डी, विनोद अग्रवाल, अरुण मलिक, कर्नल एस. मारवाह, यदुवीर रावत, भारत वायाळ तसेच स्मिता पवार उपस्थित होते.

सार्वजनिक बांधकाम (पश्चिम) विभागाच्या कार्यकारी अभियंत्यांकडून या विकास आराखड्याचा प्रस्ताव सादर करण्यात आला होता. वेरूळ येथील गट क्रमांक ४ मध्ये हा प्रकल्प साकारण्यात येणार आहे.

मंजूर आराखड्यानुसार भाविकांसाठी शॉपिंग कॉम्प्लेक्स, प्रशस्त प्रतीक्षा कक्ष, भक्त निवास, भव्य सभा मंडप, पायी दर्शन बारी, फूट ओव्हर ब्रिज, प्रवेशद्वार तसेच सुरक्षा भिंतीचे बांधकाम करण्यात येणार आहे. शॉपिंग कॉम्प्लेक्ससाठी ५१३२.९१ चौ. मीटर, प्रतीक्षा कक्षासाठी २२६५.३६ चौ. मीटर, भक्त निवासासाठी १५३१.०२ चौ. मीटर आणि सभा मंडपासाठी १२२३.६० चौ. मीटर क्षेत्र मंजूर करण्यात आले आहे.

तांत्रिक निकषांनुसार बांधकामाची एकूण उंची पॅरापेट भिंत व पाण्याच्या टाकीसह १३.८८ मीटरपर्यंत राहणार असून मुख्य इमारतीची उंची ९.११ मीटरपेक्षा अधिक नसणार आहे.

प्राधिकरणाने मंजुरी देताना काही महत्त्वाच्या अटीही घातल्या आहेत. स्मारकाच्या प्रतिबंधित क्षेत्रात कोणतेही बांधकाम करता येणार नाही. उत्खनन किंवा बांधकामादरम्यान पुरातत्त्वीय अवशेष आढळल्यास काम तातडीने थांबवून भारतीय पुरातत्व सर्वेक्षण (ASI) च्या वेरूळ उप-वर्तुळ कार्यालयाला माहिती देणे बंधनकारक राहील.

तसेच प्राचीन स्मारके आणि पुरातत्त्व स्थळे व अवशेष कायदा १९५८ मधील तरतुदींचे उल्लंघन झाल्यास मंजुरी रद्द करून कायदेशीर कारवाई करण्यात येणार असल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे. बांधकाम सुरू करण्यापूर्वी अग्निशामक दल, स्थानिक प्रशासन आणि संबंधित विभागांचे 'ना हरकत प्रमाणपत्र' घेणे तसेच काम पूर्ण झाल्यानंतर 'भोगवटा प्रमाणपत्र' प्राप्त करणेही आवश्यक राहणार आहे.

या महत्त्वपूर्ण मंजुरीमुळे श्री घृष्णेश्वर मंदिर परिसराचा विकास वेगाने होणार असून भाविकांना अधिक सुरक्षित, सुसज्ज आणि सोयीस्कर सुविधा उपलब्ध होण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.

## मिंत्राचा एंड ऑफ रिझन सेल 29 मे पासून सुरू

छत्रपती संभाजीनगर : भारताच्या ई-लाइफस्टाइल इकोसिस्टममध्ये ग्रोथ कॅटलिस्ट म्हणून आपली भूमिका पुढे नेत, मिंत्रा ने एंड ऑफ रिझन सेल (ईओआरएस) चा 24 वा एडिशन जाहीर केला आहे. हा सेल 29 मे पासून सुरू होणार असून वीआईपी अर्ली ॲक्सेस 28 मे पासून उपलब्ध असेल. 6 मिलियन+ स्टाइल्ससह हा इव्हेंट भारताच्या फॅशन आणि लाइफस्टाइल इकोसिस्टमला आणखी बळकट करणार आहे, उदयोन्मुख ब्रँड्ससाठी मोठ्या प्रमाणात संधी निर्माण करताना ग्राहकांना ट्रेंड-फर्स्ट सिलेक्शन, व्हॅल्यू आणि सोयीस्कर शॉपिंग अनुभव देणार आहे.

## मोटोरोला टॉप 5 स्मार्टफोन ब्रँड्समध्ये

नाशिक : मोटोरोला या मोबाइल तंत्रज्ञान आणि नाविन्यता क्षेत्रातील जागतिक आघाडीची कंपनी, तसेच प्रमुख तंत्रज्ञान संशोधन संस्था टेकआर्क नुसार भारतातील आघाडीच्या एआय स्मार्टफोन ब्रँडने भारतात आपली जोरदार घोडदौड कायम ठेवली आहे. आयडीसी क्वार्टर्ली मोबाइल फोन ट्रॅकर, क्यू १-२६ च्या ताज्या अहवालानुसार, मोटोरोला भारतातील टॉप ५ स्मार्टफोन ब्रँड्सच्या यादीत समाविष्ट झाली आहे. २०२४ च्या पहिल्या तिमाहीमधील ९ व्या स्थानावरून २०२६ च्या पहिल्या तिमाहीमध्ये ५ व्या स्थानावर झेप घेत मोटोरोलाने गेल्या दोन वर्षांत भारतातील स्मार्टफोन क्षेत्रात सर्वाधिक वेगाने वाढणारा ब्रँड म्हणून स्वतःला सिद्ध केले आहे.

## पॅराशूट ॲडव्हान्स्ड प्रोटीन शॅम्पू लॉन्च

मुंबई - मॅरिको लिमिटेड ने आज पॅराशूट ॲडव्हान्स्ड प्रोटीन शॅम्पूच्या लॉंचसह हेअर क्लिन्झिंग श्रेणीमध्ये प्रवेश करून, हेअरकेअर क्षेत्रामधील आपले स्थान अधिक बळकट केले आहे. आशिष गोपाल, सीईओ - इंडिया कोअर बिझनेस, मॅरिको लिमिटेड म्हणाले, "पॅराशूट ॲडव्हान्स्ड कोकोनटच्या गुणधर्मांसह हेअर-क्लिंझिंग स्वरूपातील हे उत्पादन सादर करणे, हे गेल्या काही वर्षांत मॅरिकोने आपल्या श्रेणीत केलेला एक महत्त्वपूर्ण विस्तार दर्शवते. नैसर्गिक उत्पादनांसाठी ग्राहकांची वाढती मागणी पूर्ण करण्याच्या उद्देशाने पॅराशूट ॲडव्हान्स्ड शॅम्पू हे एक धोरणात्मक पाऊल आहे. यावरून उद्देशपूर्ण आणि नारळावर आधारित नावीन्यपूर्ण उत्पादने सादर करण्याबाबतची मॅरिकोची कटिबद्धता दिसून येते.

## एमजी मॅजेस्टर डी प्लस एसयूव्ही लॉन्च करण्याची घोषणा

पुणे : जेएसडब्ल्यू एमजी मोटर इंडियाने आज बहुप्रतिक्षित एमजी मॅजेस्टर, भारतातील पहिली डी प्लस एसयूव्ही लॉन्च करण्याची घोषणा केली. ज्या ग्राहकांना त्यांच्या पुढील एसयूव्ही कडून अधिक अपेक्षा आहेत, त्यांच्यासाठी डिझाइन केलेली मॅजेस्टर , रस्त्यावर प्रभावी उपस्थिती, प्रगत अभियांत्रिकी आणि उत्कृष्ट सर्व-भूभाग क्षमता यांचा मिलाफ आहे. एमजी मॅजेस्टर 4x2 ऑटोमॅटिक टॉप ट्रिम किंमत 40.99 लाख (एक्स-शोरूम किंमत) (६ आणि ७-सीटर)एमजी मॅजेस्टर 4x4 ऑटोमॅटिक टॉप ट्रिम किंमत 44.99 लाख (एक्स-शोरूम किंमत) रुपयांना लॉन्च

## भारत जागतिक शक्ती म्हणून उदयास

छत्रपती संभाजीनगर : देशाचा स्वाभिमान जागा करून परिवर्तन घडवलं जाऊ शकते, हे पंतप्रधान नरेंद्र मोदीजी यांनी त्यांच्या 12 वर्षांच्या कार्यकाळात केलेल्या कार्याने दाखवून दिले आहे. फक्त अनुदान घेणे ही वृत्ती न बाळगता देशाला जगामध्ये स्वाभिमानाने उभा असलेला भारत देश बनवण्याचे काम पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केले आहे. एवढेच नाही तर देशात मेक इन इंडिया ही चळवळ राबवून मेक फॉर वर्ल्ड च्या दिशेने देशाची वाटचाल सुरू करण्यामागे मोलाचे योगदान दिले आहे. ज्या भारताकडे पूर्वी एक याचक राष्ट्र म्हणून पाहिले जायचे, त्याला जागतिक महाशक्ती बनविण्याचे काम पंतप्रधान नरेंद्र मोदीजी यांनी केले आहे, असे गौरवोद्गार महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मुंबईत काढले.

## 'जगद्धात्री' मालिकेतून सयंतानी घोषचा भावनिक संदेश; "मुलांना भावनिक त्रास सहन करावा लागू नये

छत्रपती संभाजीनगर : जगद्धात्री मालिकेतील अभिनेत्री सयंतानी घोष हिने आपल्या मायाच्या भूमिकेद्वारे पालकांच्या मतभेदांचा मुलांवर होणारा परिणाम प्रभावीपणे मांडला आहे. मालिकेत माया आणि शरद वेगळे राहत असून त्यांच्या दुराव्याचा परिणाम त्यांची मुलगी गुंजनवर होताना दिसत आहे. बोलता आणि ऐकू न येणारी गुंजन आपल्या आई-वडिलांच्या प्रेमासाठी तगमगत असून दोघे पुन्हा एकत्र यावेत, अशी तिची इच्छा आहे.



सयंतानी घोष म्हणाल्या की, विभक्त होणे किंवा घटस्फोट ही वास्तव परिस्थिती असू शकते, मात्र पालकांनी आपल्या वैयक्तिक संघर्षांचा मुलांच्या मनावर होणारा परिणाम लक्षात घेणे गरजेचे आहे. बालपणीचा भावनिक तणाव मुलांच्या मनावर कायमस्वरूपी प्रभाव टाकू शकतो. प्रत्येक मुलाला प्रेम, सुरक्षितता आणि आनंदाचे वातावरण मिळायला हवे, असेही त्यांनी सांगितले.

मालिकेच्या अलीकडील भागांमध्ये गुंजनच्या अपघातावेळी शरदने तिचा जीव वाचवला, मात्र त्यात तो गंभीर जखमी झाला. सध्या तो गुपचूप देशमुख यांच्या घरी राहत असून मायाला याची कल्पना नाही. आता माया आणि शरद पुन्हा एकत्र येणार का, याकडे प्रेक्षकांचे लक्ष लागले आहे.

# छत्रपती संभाजीनगर-जालना मतदारसंघाची जागा भाजपाला द्या; मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे शिष्टमंडळाची मागणी

मुंबई, प्रतिनिधी : छत्रपती संभाजीनगर-जालना स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघाची जागा भारतीय जनता पक्षाला सोडण्यात यावी, अशी मागणी भाजपाच्या शिष्टमंडळाने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची मुंबई येथे भेट घेऊन केली.

या भेटीदरम्यान स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघातील राजकीय परिस्थिती, पक्षाची ताकद तसेच आगामी निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर भाजपाची भूमिका याबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली. मतदारसंघात भाजपाची मजबूत संघटनात्मक बांधणी असून



ही जागा पक्षाला मिळावी, अशी भूमिका शिष्टमंडळाने मुख्यमंत्र्यांसमोर मांडली.

यावेळी मंत्री अतुल सावे, आमदार नारायण कुचे, आमदार प्रशांत बंब, मा. आमदार संजय केणेकर, भाजपा जिल्हाध्यक्ष भास्कर आबा दानवे, उपमहापौर राजेश राऊत, स्थायी समिती सभापती अशोक पांगारकर, बसवराज मंगरुळे, बापू घडामोडे आदी उपस्थित होते.

या बैठकीमुळे स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघाच्या राजकारणात नव्या चर्चांना उधाण आले असून आगामी काळात महायुतीतील जागावाटपाकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# बिडकीन नवीन गावठाण येथे शंभर केव्हीए रोहित्र बसवण्याची नागरिकांची मागणी

**तभा वृत्तसेवा**

बिडकीन दि २७ मे : पैठण तालुक्यातील बिडकीन येथील रांजणगाव रोड वरील नवीन गावठाण येथील शासकीय घाटी मागे बसविण्यात आलेली सध्या ६३ केव्हीए रोहित्र क्षमतेची आहे, परंतु परिसरातील वीज ग्राहकांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढल्यामुळे सदर रोहित्र वर अतिरिक्त भार पडत आहे , गेल्या सलग दोन महिन्यापासून दररोज सकाळी व सायंकाळच्या वेळेस रोहित्र वारंवार ष्ट्रिप होत असून, परिसरातील वीजपुरवठा खंडित होत आहे, तसेच वारंवार विद्युत पुरवठा खंडित होत असल्याने मुळे नागरिकांना मोठा त्रास सहन लागत आहे, तसेच शालेय विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होत असून घरगुती तसेच व्यावसायिक कामावर परिणाम होत आहे, त्यामुळे ६३ केव्हीए रोहित्र बदलून तत्काळी शंभर केव्हीए क्षमतेची नवीन रोहित्र बसवण्यात यावी अशी गावठाण परिसरातील नागरिकांची मागणी आहे,तरी विद्युत मंडळ यांनी या गंभीर समस्येकडे तातडीने लक्ष देऊन पुढील दहा दिवसांच्या आता रोहित्र बदलण्याची कारवाई करावी अन्यथा गावठाण परिसरातील नागरिकांच्या वतीने तीव्र आंदोलन करण्यात येईल असे जिद्दी ग्रुप बिडकीन व ग्रामपंचायत सदस्य सागर फरताळे तसेच गावठाण परिसरातील नागरिकांनी महावितरण कार्यालयात लेखी निवेदन देण्यात आले आहे,

# 29 व 30 मे रोजी 'जितो मॅन्युफॅक्चरिंग अँड इकोसिस्टम ग्रोथ समिट 2026'

छत्रपती संभाजीनगर, प्रतिनिधी : जैन इंटरनॅशनल ट्रेड ऑर्गनायझेशन (जितो) छत्रपती संभाजीनगर चॅप्टरच्या वतीने २९ व ३० मे २०२६ रोजी हॉटेल हयात प्लेस येथे 'जितो मॅन्युफॅक्चरिंग अँड इकोसिस्टम ग्रोथ समिट २०२६' या दोन दिवसीय भव्य शिखर परिषदेचे आयोजन करण्यात आले आहे. उद्योग, व्यापार, गुंतवणूक आणि नवोपक्रम क्षेत्रातील संधींचा वेध घेण्यासाठी तसेच विविध क्षेत्रांतील तज्ज्ञांना एकत्र आणण्यासाठी या परिषदेचे आयोजन करण्यात आले आहे.

या परिषदेचे उद्घाटन जितो अपेक्सचे अध्यक्ष विजय भंडारी तसेच जितो रोम झोनचे अध्यक्ष राजेंद्र जैन यांच्या हस्ते होणार आहे. देशभरातील उद्योगपती, उद्योजक, गुंतवणूकदार, धोरणकर्ते, स्टार्टअप संस्थापक, व्यावसायिक आणि युवा उद्योजक या परिषदेत सहभागी होणार असून महाराष्ट्रासह विशेषतः मराठवाड्यातील औद्योगिक व आर्थिक विकासाच्या संधींवर सखोल चर्चा होणार आहे.

परिषदेमध्ये मॅन्युफॅक्चरिंग, इलेक्ट्रिक व्हेईकल (ईव्ही), इन्फ्रास्ट्रक्चर, रिअल इस्टेट, हॉस्पिटॅलिटी, वेअरहाउसिंग, लॉजिस्टिक्स, गुंतवणूक, कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय), शाश्वत विकास (सस्टेनेबिलिटी) आणि कौटुंबिक उद्योग (फॅमिली बिझनेस) या महत्त्वपूर्ण विषयांवर तज्ज्ञ मार्गदर्शन करणार आहेत. उद्योग क्षेत्रातील सध्याची परिस्थिती आणि भविष्यातील संधी यांचाही उहापोह करण्यात येणार आहे.

दोन दिवस चालणाऱ्या या परिषदेत कीनोट सत्रे, पॅनेल चर्चा, फायरसाईड चॅट, बिझनेस नेटवर्किंग सत्रे आणि इकोसिस्टम-केंद्रित संवाद आयोजित करण्यात येणार आहेत. यामुळे सहभागी उद्योजकांना उद्योगातील नव्या प्रवाहांची, गुंतवणुकीच्या संधींची आणि व्यवसाय विस्ताराच्या विविध पर्यायांची माहिती मिळणार आहे.

या परिषदेत अँथर एनर्जी, ओमेगा सेकी मोबिलिटी, ईवाय (EY), कॉग्निझंट, नुवामा वेल्थ, कुशमन अँड वेकफिल्ड, बार्क (BARC), जेएलएल (JLL), अटेरो रीसायकलिंग यांसारख्या राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावरील नामांकित संस्थांचे प्रतिनिधी सहभागी होणार आहेत.

परिषदेतील प्रमुख वक्त्यांमध्ये डॉ. उदय नारंग, स्वप्निल जैन, डॉ. बाबू पद्मनाभन, भावेश ठक्कर, रोहित चतुर्वेदी, राहुल जैन, विराट शाह, सनमती पाटील आणि जी. श्रीकांत यांचा समावेश असून विविध उद्योग संस्था व कॉर्पोरेट क्षेत्रातील वरिष्ठ अधिकारीही आपले अनुभव आणि मार्गदर्शन सहभागींसोबत शेअर करणार आहेत.

जितोच्या पदाधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार, ही परिषद उद्योग, गुंतवणूक आणि नवोपक्रम क्षेत्रात नवीन भागीदारी, सहकार्य आणि विकासाच्या संधी निर्माण करण्यासाठी महत्त्वपूर्ण व्यासपीठ ठरणार आहे. तसेच छत्रपती संभाजीनगरला उदयोन्मुख मॅन्युफॅक्चरिंग व इकोसिस्टम हब म्हणून राष्ट्रीय स्तरावर अधिक बळकट ओळख मिळण्यास मदत होणार आहे.

परिषदेसाठी नोंदणी प्रक्रिया सुरू असून उद्योजक, उद्योगपती, गुंतवणूकदार, व्यावसायिक आणि युवकांनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदवावा, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

# एमजीएमच्या श्रीनिवास मोतीयेळे यांनी यशस्वीपणे पूर्ण केले लडाख बाईक एक्स्पिडिशन

छत्रपती संभाजीनगर, दि.२७ : महात्मा गांधी मिशन विद्यापीठाच्या क्रीडा विभागाचे सहाय्यक प्राध्यापक डॉ.श्रीनिवास मोतीयेळे यांनी 'आह्वान' संस्थेच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या लेह-लडाख बाईक एक्स्पिडिशनमध्ये सहभाग घेऊन जगातील अत्यंत खडतर आणि उंच समजल्या जाणाऱ्या खारदुंगला पासचे बाईक रायडिंग यशस्वीपणे पूर्ण केले. खारदुंगला ही लडाखमधील सुमारे १७,९८२ फूट उंचीवरील पर्वतीय खिंड असून ती लेह शहराला नुब्रा आणि श्योक खोऱ्यांशी जोडते. हिमालयातील विहंगम दृश्यांसाठी प्रसिद्ध असलेला हा मार्ग जगातील सर्वात उंच मोटारयोग्य रस्त्यांपैकी एक मानला जातो. या साहसी मोहिमेत एकूण ४० रायडर्स सहभागी झाले होते. तसेच १० जणांच्या सपोर्टिंग स्टाफने उपक्रम यशस्वी करण्यासाठी परिश्रम घेतले. या मोहिमेचे नेतृत्व अरविंद गुसेन आणि थॉमस यांनी केले. या बाईक एक्स्पिडिशनदरम्यान डॉ.मोतीयेळे यांनी नुब्रा व्हॅली, तुर्तुक गाव, सियाचीन बॉर्डर, गलवान, पँगॉन्ग त्सो तलाव, रँचो स्कूल, विश्वशांती स्तूप, दिसकित मोनेस्ट्री आदी ठिकाणांचा बाईकद्वारे प्रवास केला.




या धाडसी बाईक रायडिंग मोहिमेबद्दल एमजीएम विद्यापीठाचे कुलपती अंकुशराव कदम, कुलगुरू प्रा.डॉ.विलास सपकाळ, कुलसचिव डॉ.आशिष गाडेकर, अधिष्ठाता डॉ.जॉन चेल्लादुराई, क्रीडा संचालक नितीन घोरपडे, विभागप्रमुख डॉ.दिनेश वंजारे, डॉ.शशिकांत सिंग, डॉ.सदाशिव जव्हेरी, डॉ.रहीम खान, ऐश्वर्या आघाव आणि निलेश खरे यांनी त्यांचे अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या आहेत.

# बांधावरील झाडाच्या वादातून नातलगांत हाणामारी; सात जणांविरुद्ध गुन्हा

**तभा वृत्तसेवा**

कन्नड :दि.२७ मे - तालुक्यातील नावडी शिवारात बांधावरील सुरबाभळीचे झाड तोडल्याच्या कारणावरून दोन नातलगांमध्ये वाद होऊन हाणामारी झाल्याची घटना घडली. या प्रकरणी सात जणांविरुद्ध कन्नड ग्रामीण पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत पोपट छगन मुरकुंडे (वय २८, रा. नावडी, ता. कन्नड) यांनी फिर्याद दिली. फिर्यादीनुसार, त्यांच्या शेत गट क्रमांक ३०५ मधील बांधावरील सुरबाभळीचे झाड तोडण्यात आले होते. यावरून त्यांचे चुलते देवनाथ साहेबराव मुरकुंडे यांनी संबंधित झाड त्यांच्या मालकीचे असल्याचा दावा केला होता.

मंगळवारी सकाळी देवनाथ मुरकुंडे यांनी फोन करून शेतात बोलावल्याने पोपट मुरकुंडे हे त्यांच्या कुटुंबीयांसह शेतात गेले. त्यावेळी बांधावरील झाडांवरून दोन्ही बाजूंमध्ये वाद झाला. वाद वाढल्याने देवनाथ मुरकुंडे यांनी हातातील कुऱ्हाडीच्या तुंब्याने पोपट मुरकुंडे यांच्या डोक्यात मारून जखमी केल्याचा आरोप फिर्यादीत करण्यात आला आहे. तसेच तातेराव व आण्णासाहेब मुरकुंडे यांनी लाथाबुक्क्यांनी व दगडफेक करून मारहाण केल्याचे नमूद आहे.

याशिवाय रंजना मुरकुंडे, अनिल मुरकुंडे, सुनिल मुरकुंडे, अंकुश मुरकुंडे व महेश मुरकुंडे यांनाही शिवीगाळ करत काठी व लाथाबुक्क्यांनी मारहाण करण्यात आल्याचे फिर्यादीत म्हटले आहे.

या प्रकरणी देवनाथ साहेबराव मुरकुंडे, सचिन आण्णासाहेब मुरकुंडे, सतिष तातेराव मुरकुंडे, ओमकार संतोष मुरकुंडे, आण्णासाहेब मुरकुंडे, संतोष मुरकुंडे व तातेराव मुरकुंडे (सर्व रा. नावडी, ता. कन्नड) यांच्याविरुद्ध कन्नड ग्रामीण पोलिसांत गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे.

# पाण्याच्या बाटलीच्या किंमतीवरून दोन गटांत तुफान हाणामारी

**तभा वृत्तसेवा**

कन्नड :दि.२७ मे - शहरातील हिवरखेडा रोडवरील पांडवनगरीजवळ मंगळवारी सायंकाळी पाण्याच्या बाटलीच्या किंमतीवरून दोन गटांत तुफान हाणामारी झाली. या घटनेत दोन्ही बाजूंचे अनेक जण जखमी झाले असून कन्नड शहर पोलीस ठाण्यात परस्परविरोधी गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

पांडवनगरी येथील राज सुभान शेख (वय ३०) यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार, त्यांच्या वडिलांच्या पानटपरीवर मेहताबनगर येथील इम्रान शेख व गॅस गोडावून परिसरातील मुजाहिद शेख युनुस उर्फ मुजुडॉन हे पाण्याची बाटली घेण्यासाठी आले होते. बाटलीच्या किंमतीवरून वाद झाल्यानंतर दोघांनी शिवीगाळ केल्याचे फिर्यादीत नमूद आहे. त्यानंतर काही वेळाने ते कन्नड येथील सलमान बाटुक व मोईन गणी सायकलवाले यांना सोबत घेऊन पुन्हा आले. त्यांनी राज शेख, त्यांचे वडील सुभान शेख व भाऊ बबलू शेख यांना लाथाबुक्क्यांनी मारहाण केली. तसेच मुजाहिद याने लोखंडी पट्टीने राज शेख यांच्या डोक्यात वार करून जखमी केले, तर मोईन गणी सायकलवाले याने सुभान शेख यांच्या डोक्यात लोखंडी पट्टी मारल्याचा आरोप करण्यात आला आहे.

दरम्यान, समर्थनगर येथील मोईन गणी शेख (वय ३९) यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार, ते हिवरखेडा रोडवरील पांडवनगरीजवळील टपरीवर पाण्याची बाटली घेण्यासाठी गेले असता बाटलीच्या किंमतीवरून वाद झाला. त्यावेळी पांडवनगरी येथील सुभान शेख यांनी हातोडीने डोक्यात मारून जखमी केल्याचा आरोप त्यांनी केला आहे. तसेच कन्या शाळेजवळील बॉम्बे बिल्डिंग परिसरातील सलमान व अन्सार शेख तसेच पांडवनगरी येथील रियाज सुभान शेख यांनी लाथाबुक्क्यांनी मारहाण केल्याचे फिर्यादीत म्हटले आहे.

या घटनेमुळे परिसरात काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले होते. पोलिसांनी दोन्ही बाजूंच्या तक्रारींवरून गुन्हे दाखल करून पुढील तपास पोलिस निरीक्षक आर.वि.सानप यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस उपनिरीक्षक टीलोकचंद पवार,केसरसिंग जारवाल करीत आहे

# पिशोर नाका येथील धोकादायक डिव्हायडरवर रेडियम पोल बसविले

**तभा वृत्तसेवा**

कन्नड :दि.२७ मे - शहरातील पिशोर नाका परिसरात वारंवार होणारे अपघात आणि रात्रीच्या वेळी डिव्हायडर न दिसल्यामुळे वाहनचालकांना होणारा धोका लक्षात घेऊन सामाजिक बांधिलकीतून स्थानिक नागरिकांनी पुढाकार घेत डिव्हायडरवर दि.२६ रोजी मध्यरात्रीच्या सुमारास रेडियम पोल बसविण्याचे काम हाती घेतले.

समाजसेवक तथा माजी उपनगराध्यक्ष डॉ. सदाशिव पाटील यांच्या नेतृत्वाखाली व सामाजिक कार्यकर्ते शेख शमशू भाई यांच्या सहकार्याने मंगळवारी मध्यरात्री साडेबारा वाजता पिशोर नाका येथील डिव्हायडरच्या दोन्ही बाजूंना रेडियम पोल उभारून त्यावर रेडियम पट्ट्या लावण्यात आल्या. यामुळे रात्रीच्या वेळी वाहनचालकांना डिव्हायडर सहज दिसणार असून अपघात टाळण्यास मदत होणार आहे.

या उपक्रमात समाजसेवक सलीम शेख, पिंटू भाऊ सोनवणे, रिझवान मिस्तरी, व्यापारी पवन सेठ पांडे, रईस पवार तसेच योगेश पाखले आप्पा मित्र मंडळाच्या कार्यकर्त्यांनी सहभाग घेतला.

पिशोर नाका परिसरात यापूर्वी अनेकदा डिव्हायडर न दिसल्याने अपघात घडले होते. त्यामुळे स्थानिक नागरिकांकडून या उपक्रमाचे स्वागत करण्यात येत आहे.

# वाढत्या पेट्रोल-डिझेल दरांविरोधात खासदार कल्याण काळेंचे जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन

## सर्वसामान्य नागरिक, शेतकरी व व्यापाऱ्यांना दिलासा देण्याची मागणी

**तभा वृत्तसेवा**
**जालना । प्रतिनिधी**

देशात सातत्याने वाढत असलेल्या पेट्रोल व डिझेलच्या दरांमुळे सर्वसामान्य नागरिकांचे आर्थिक नियोजन कोलमडले असून शेतकरी, व्यापारी, वाहनधारक आणि लघुउद्योजक मोठ्या अडचणीत सापडले आहेत. या पार्श्वभूमीवर वाढत्या इंधन दरांवर नियंत्रण आणण्यासाठी उपाययोजना कराव्यात, अशी मागणी करणारे निवेदन जिल्हाधिकारी यांना खासदार कल्याण काळे यांनी दिले आहे.



दिलेल्या निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, जालना जिल्ह्यातील बहुतांश नागरिक शेती व्यवसायावर अवलंबून आहेत. शेती मशागतीसाठी वापरले जाणारे ट्रॅक्टर, मोटार पंप आणि इतर यंत्रसामग्री डिझेलवर चालत असल्याने इंधन दरवाढीचा थेट परिणाम शेती उत्पादन खर्चावर होत आहे. परिणामी शेतकऱ्यांची आर्थिक परिस्थिती अधिकच बिकट होत चालली आहे. तसेच पेट्रोल-डिझेलच्या वाढत्या दरांमुळे वाहतूक खर्चात वाढ होत असून त्याचा परिणाम बाजारपेठेतील सर्व वस्तूंच्या किंमतीवर दिसून येत आहे.

> पेट्रोल व डिझेलच्या सतत वाढणाऱ्या दरांमुळे सर्वसामान्यांचे आर्थिक बजेट कोलमडले आहे. शासनाने तातडीने हस्तक्षेप करून इंधन दर कमी करण्यासाठी ठोस उपाययोजना कराव्यात. – **खासदार कल्याण काळे**

किरकोळ व्यापारी, नोकरदार वर्ग, विद्यार्थी आणि लघु व्यावसायिकांना याचा मोठा आर्थिक फटका बसत असल्याचे खा.काळे यांनी म्हटले आहे. गेल्या काही दिवसांत पेट्रोल आणि डिझेलच्या दरात वारंवार वाढ करण्यात आल्याने नागरिकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. ग्रामीण भागात सार्वजनिक वाहतूक व्यवस्था मर्यादित असल्यामुळे नागरिकांना खासगी वाहनांचा वापर करावा लागत असून त्यामुळे इंधन दरवाढीचा भार अधिक तीव्रतेने सहन करावा लागत आहे. जालना जिल्हा हा औद्योगिक तसेच कृषीप्रधान जिल्हा असल्यामुळे इंधन दरवाढीचा परिणाम उद्योग, व्यापार आणि शेती क्षेत्रावर मोठ्या प्रमाणात होत असल्याचेही निवेदनात नमूद करण्यात आले आहे. त्यामुळे शासनाने पेट्रोल व डिझेलवरील करांमध्ये सवलत देऊन नागरिकांना दिलासा द्यावा तसेच जिल्हा प्रशासनाने नागरिकांच्या अडचणी शासनाच्या निदर्शनास आणून द्याव्यात, अशी मागणी खासदार कल्याण काळे यांनी केली आहे.

# अवकाळी पावसाचा तडाख्याने जि.प.च्या उर्दू शाळेचे नुकसान

**तभा वृत्तसेवा**
**परतूर । प्रतिनिधी**

दिनांक २५ मे रोजी रात्रीच्या सुमारास आलेल्या वादळी वाऱ्यासह अवकाळी पावसाने वरफळ गावाला जोरदार तडाखा दिला. या अवकाळी पावसामुळे गावातील जिल्हा परिषद उर्दू शाळेचे प्रचंड मोठे नुकसान झाले आहे. आगामी शैक्षणिक वर्ष सुरू होण्यास अवघा काही काळ शिल्लक असल्याने, शासनाने याकडे तातडीने लक्ष देऊन शाळेची दुरुस्ती करावी, अशी जोरदार मागणी आता स्थानिक नागरिकांमधून होत आहे.

वादळ इतके भीषण होते की, जिल्हा परिषद उर्दू शाळेच्या इमारतीवरील छताचे पत्रे हवेत उडून गेले आहेत. एवढेच नव्हे तर शाळेची एक भिंतही पत्त्यासारखी कोसळली आहे. घटनेची माहिती मिळताच वरफळ गावचे सरपंच जुबेद राजा यांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेत प्रत्यक्ष पाहणी (स्थळ पाहणी) केली. यावेळी शाळेचे झालेले अतोनात नुकसान समोर आले. अवकाळी पावसामुळे आमच्या जिल्हा परिषद उर्दू शाळेचे मोठे नुकसान झाले आहे. छताचे पत्रे उडाले असून भिंतही कोसळली आहे. मुलांच्या भविष्याचा विचार करता,



शासनाने यात त्वरित लक्ष घालणे गरजेचे असल्याचे सरपंच जुबेद राजा यांनी सांगितले. महाराष्ट्रात आगामी १५ जूनपासून नवीन शैक्षणिक वर्षाला सुरुवात होत असून शाळा उघडणार आहेत. शाळा सुरू होण्यास आता महिनाभरापेक्षाही कमी कालावधी उरला आहे. अशा स्थितीत शाळेची इमारत तात्काळ दुरुस्त न झाल्यास विद्यार्थ्यांच्या बसण्याची गैरसोय होणार असून त्यांच्या शिक्षणावर याचा वाईट परिणाम होऊ शकतो. शाळेची ही दुरवस्था पाहून वरफळ येथील ग्रामस्थ आणि पालकांमध्ये चिंतेचे वातावरण आहे. १५ जून रोजी शाळा सुरू होण्यापूर्वी शासनाने या गंभीर समस्येकडे विशेष लक्ष देऊन, युद्धपातळीवर शाळेची दुरुस्ती करून द्यावी, अशी आग्रही मागणी वरफळच्या नागरिकांनी प्रशासनाकडे करण्यात येत आहे.

## संक्षिप्त

### जिल्ह्यातील दामिनी पथक अधिक सक्षम व प्रभावी करा- शितल बारोटे



**तभा वृत्तसेवा**
**जालना । प्रतिनिधी**

जालना जिल्ह्यात ग्रामीण भागासह जालना शहरात महिला व मुलींच्या सुरक्षेच्या दृष्टीने कार्यरत असलेल्या दामिनी पथकाला अधिक सक्षम व प्रभावी करण्यात यावे, अशी मागणी राष्ट्रवादी युवती काँग्रेसच्या जिल्हाध्यक्ष सौ. शीतलताई बारोटे यांनी जिल्हा पोलीस अधीक्षकांकडे निवेदनाद्वारे केली आहे. राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे जिल्हाध्यक्ष अरविंदराव चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हा पोलीस अधीक्षक यांना निवेदन देण्यात आली

ग्रामीण भागासह जालना शहरात शाळा, महाविद्यालये, बसस्थानके, रेल्वे स्टेशन तसेच सार्वजनिक ठिकाणी महिलांची मोठ्या प्रमाणावर वर्दळ असते. अशा ठिकाणी महिला छेडछाड, अत्याचार व इतर अनुचित प्रकारांना प्रतिबंध घालण्यासाठी दामिनी पथकाची गस्त वाढविण्याची मागणी निवेदनात करण्यात आली आहे. तसेच प्रत्येक तालुक्यात महिला पथक सक्रिय करून महिलांच्या तक्रारींवर तात्काळ कारवाई करण्यात यावी, अशी मागणीही करण्यात आली. महिलांच्या सुरक्षेविषयी जनजागृती करण्यासाठी शैक्षणिक संस्थांमध्ये मार्गदर्शन शिबिरे व महिला सुरक्षा हेल्पलाईनची माहिती देण्याची सूचनाही निवेदनात करण्यात आली आहे. जिल्ह्यातील महिलांना सुरक्षित वातावरण मिळावे आणि महिलांविरोधातील गुन्ह्यांना आळा बसावा, यासाठी प्रशासनाने तातडीने आवश्यक ती पावले उचलावीत, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली आहे.

### तहान, भूक विसरत अहिल्यामातेचे दर्शनाचे भाग्य मिळाले; भाविकांची प्रतिक्रिया



**तभा वृत्तसेवा**
**अंबड । प्रतिनिधी**

अबड दि २६ मे प्रसंग बाका उभा राहिला होता. अंबड चौंडी बसचे अधिकृत उद्घाटन झाले. प्लॅटफॉर्मवर गाडी उभी करायची तर कंडक्टर महिला भगिनीने थेट प्रवासी नसल्याचे व उशीर झाल्याचे कारण देत बस रवाना करण्यात निरुत्साह दाखवला. सोबत असलेले लक्ष्मण बेवले सर,सुनील भाऊ भिडे, बाबुराव भाऊ खरात कंडक्टर भगिनींची व आगर प्रमुखांची मनधनी करू लागलो. चौंडी जाणाऱ्या एक प्रवासी असेल तर बस जाईल असा नियम वजा आदेश निघाला, आणि त्या क्षणी मी बस मध्ये जाऊन बसलो...
चौंडी जाणारा एक प्रवासी गाडीत असल्याचे पाहून बस रवाना करण्या वाचून पर्याय नव्हता आणि अखेर बस चौंडीकडे रवाना झाली. नऊ ते दहा घंट्याचा प्रवासात मी काही तयारी नसताना बस मध्ये ठाण मारून बसलो. मोबाईलची चार्जिंग संपल्यामुळे मोबाईलने ही साथ सोडली. वाटेत कुठेच बस जेवण्यास थांबली नाही आणि सोबत जेवण नव्हतेच. परंतु मनात होती जिद्द आणि अहिल्या मातेच्या दर्शनाची ओढ. वाटेत पाटोदा येथील मुख्य बस स्थानकात बसचे फटाक्याच्या आतिषबाजीत भव्य स्वागत झाल्याचे पाहून नवचैतन्य निर्माण झाले. चौंडी येथे मातेच्या चरणी नतमस्तक होतात सर्व थकवा दूर झाला नवीन ऊर्जा व बळ मिळाले.. कदाचित अहिल्यामातेने मला एकट्यालाच दर्शनाला बोलवले असेल या ऊर्जेने मन भरून आले. डोळ्याच्या कडा अलगद पुसद स्वतःला भाग्यवान समजत, नवीन ऊर्जा संकल्प घेत होळकर शाहीचा सेवक म्हणून सदैव कटिबद्ध राहणार असल्याची मनाशी खूनगाठ बांधत अभिमानाने घरी परतलो.

# गोवंश तस्करी रोखण्यासाठी जालना जिल्हा प्रशासनाने उचलले कठोर पाऊल

## अवैध वाहतूक, अनधिकृत कत्तलखान्यांवर जिल्हाधिकाऱ्यांचे कारवाईचे आदेश

**तभा वृत्तसेवा**
**जालना । प्रतिनिधी**

जालना जिल्ह्यात वाढत असलेल्या गोवंश तस्करी, अवैध वाहतूक, अवैध कत्तल आणि अनधिकृत कत्तलखान्यांना आळा घालण्यासाठी जिल्हा प्रशासनाने कठोर भूमिका घेतली आहे. जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांनी यासंदर्भात महत्त्वपूर्ण परिपत्रक जारी करत संबंधित सर्व विभागांना तात्काळ प्रभावी अंमलबजावणी करण्याचे निर्देश दिले आहेत.

महाराष्ट्र शासनाच्या गृह विभागाच्या निर्देशानुसार हे परिपत्रक काढण्यात आले असून भारतीय संविधानातील अनुच्छेद ४८ नुसार गोवंश संवर्धन व संरक्षणाच्या दृष्टीने ही कारवाई करण्यात येत असल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले आहे. गोवंश जनावरांची अवैध वाहतूक, गो तस्करी तसेच अनधिकृत कत्तलखाने याबाबत विविध संघटनांकडून तक्रारी प्राप्त झाल्यानंतर प्रशासनाने हा निर्णय घेतला आहे. जिल्ह्यातील सर्व विभागांना महाराष्ट्र प्राणी संरक्षण अधिनियम १९७६ तसेच प्राण्यांना निर्दयपणे वागविण्यास प्रतिबंध अधिनियम १९६० अंतर्गत कठोर अंमलबजावणी करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. जिल्ह्यातील महानगरपालिका, नगरपरिषद, नगरपंचायत, ग्रामपंचायत तसेच पंचायत समितींना त्यांच्या कार्यक्षेत्रातील अनधिकृत कत्तलखाने शोधून त्यांच्यावर तात्काळ कारवाई करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. वारंवार गो तस्करी करणाऱ्या टोळ्या किंवा संघटित



गुन्हेगारीमध्ये सहभागी असलेल्या व्यक्तींवर मोक्का अंतर्गत कारवाई करण्याचाही इशारा प्रशासनाने दिला आहे. परिवहन विभागाला अवैधरित्या गोवंश वाहतूक करणाऱ्या वाहनांची नियमित तपासणी करून मोटार वाहन कायद्यानुसार कारवाई करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. तसेच पोलीस अधीक्षक आणि उपप्रादेशिक परिवहन अधिकारी यांनी स्वतंत्र नोडल अधिकारी नियुक्त करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. संयुक्त भरारी पथके स्थापन करून अवैध गोवंश वाहतूक व बेकायदेशीर कत्तलखान्यांवर संयुक्त कारवाई करण्याचे आदेशही प्रशासनाने दिले आहेत. गोवंश तस्करी, अवैध वाहतूक किंवा अनधिकृत कत्तलखान्यांबाबत कोणतीही माहिती मिळाल्यास नागरिकांनी डायल ११२ हेल्पलाईनवर तक्रार नोंदवावी, असे आवाहन प्रशासनाने केले आहे. प्राप्त तक्रारींवर संबंधित पोलीस यंत्रणेला तात्काळ कारवाई करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. या संपूर्ण मोहिमेसाठी उपयुक्त पशुसंवर्धन अधिकारी, जालना यांची नोडल अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. संबंधित सर्व विभागांच्या अधिकाऱ्यांनी समन्वय ठेवून शासन निर्देशांची काटेकोर अंमलबजावणी करावी, असे आदेश जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांनी दिले आहेत. गोवंशाची अवैध वाहतूक व अनधिकृत कत्तलखान्यांविरोधात जिल्हा प्रशासनाची मोहीम अधिक कठोर करण्यात येणार असून कायदा मोडणाऱ्यांवर थेट कारवाई केली जाईल असा इशारा जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांनी दिला आहे.

# मंठ्यात हायवा धारकांची हैवानियत पुन्हा उफाळली!

**तभा वृत्तसेवा**
**मंठा । प्रतिनिधी**

मंठा शहरासह तालुक्यात अवैध वाळू वाहतुकीचा उच्छाद दिवसेंदिवस वाढत असून सुसाट वेगाने धावणाऱ्या हायवा व टिप्परमुळे नागरिकांच्या जीवितास मोठा धोका निर्माण झाला आहे. या बेफाम वाहनचालकांच्या निष्काळजीपणामुळे गंभीर अपघातांची मालिका सुरूच आहे.
दोन दिवसांपूर्वी नळदो परिसरात एका निष्पाप तरुणाचा हायवाच्या धडकेत मृत्यू झाला होता. त्या घटनेची धग अजून ओसरलेली नसतानाच आज नायगाव पाटी येथे आणखी एक धक्कादायक प्रकार घडला. सुसाट वेगाने येणाऱ्या हायवाने एका वयोवृद्ध आजीला धडक देण्याची वेळ आली होती. मात्र, आजीचा जीव थोडक्यात वाचला; पण तिच्या पाळीव कुत्र्याला या अपघातात जीव गमवावा लागला. या घटनेनंतर संतप्त नागरिकांनी दिंडी महामार्गावर रास्ता रोको करत प्रशासनाविरोधात तीव्र संताप व्यक्त केला. तालुक्यातील पूर्णा नदी पात्रातून मोठ्या प्रमाणावर अवैध वाळू उपसा सुरू असून एकाच पावतीवर दिवसभर वाळू वाहतूक केली जात असल्याचा आरोप नागरिकांनी केला आहे. विना क्रमांकाच्या हायवा व टिप्परद्वारेही मोठ्या प्रमाणावर तस्करी होत आहे. नदीपात्रात १५ ते २०



फूट खोल खड्डे करून पर्यावरणाचे मोठे नुकसान केले जात आहे. या सर्व प्रकाराकडे महसूल, पोलीस व आरटीओ विभागाचे दुर्लक्ष होत असल्याचा आरोप नागरिकांतून होत आहे. वारंवार तक्रारी व निवेदने देऊनही कोणतीही ठोस कारवाई होत नसल्याने प्रशासनाच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात आहे. मागील महिन्यात आरटीओ विभागाने केवळ एक दिवस औपचारिक कारवाई केली, त्यानंतर मात्र पूर्णपणे दुर्लक्ष करण्यात आले. काही अधिकाऱ्यांवर आर्थिक देवाणघेवाणीचे आरोपही नागरिकांकडून केले जात आहेत. सध्या शहर व तालुक्यात भीतीचे वातावरण निर्माण झाले असून रस्त्यावर हायवा दिसताच नागरिकांच्या जीवात जीव राहत नाही. या गंभीर परिस्थितीकडे जिल्हाधिकारी, जिल्हा पोलीस अधीक्षक व उपप्रादेशिक परिवहन विभागाने तात्काळ लक्ष देऊन कठोर कारवाई करावी, अशी मागणी नागरिकांकडून जोर धरत आहे.

# सदर बाजार पोलिसांची कारवाई; वेश्या व्यवसाय चालविणाऱ्यांवर गुन्हा दाखल

**तभा वृत्तसेवा**
**जालना । प्रतिनिधी**

जालना शहरातील सदर बाजार पोलीस ठाण्याच्या हद्दीत सुरू असलेल्या देहविक्री व्यवसायावर पोलिसांनी धडक कारवाई करत पाच जणांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. या कारवाईमुळे शहरात एकच खळबळ उडाली असून पोलिसांच्या या धाडसी मोहिमेचे नागरिकांकडून स्वागत करण्यात येत आहे.

दिनांक २६ मे २०२६ रोजी पोलीस अधीक्षक तेघबीर सिंह संधू तसेच अपर पोलीस अधीक्षक यांच्या मार्गदर्शनाखाली सदर बाजार पोलीस ठाण्याच्या पथकाने ही कारवाई केली. मिळालेल्या गोपनीय माहितीनुसार पोलिसांनी शहरातील बस स्थानकासमोरील न्यू वैष्णवी लॉज येथे छापा टाकला. यावेळी लॉजच्या पहिल्या मजल्यावर महिलांना बोलावून त्यांच्या मार्फत देहविक्रीचा व्यवसाय सुरू असल्याचे निदर्शनास आले. छापेमारीदरम्यान पोलिसांनी घटनास्थळावरून रोख रक्कम, मोबाईल फोन तसेच कंडोम पाकिटे जप्त केली. सायंकाळी सुमारे ७ वाजण्याच्या सुमारास ही कारवाई करण्यात आली. याप्रकरणी सदर बाजार पोलीस ठाण्यात महिलांचे अनैतिक व्यापार प्रतिबंध अधिनियम १९५६ अंतर्गत कलम ३, ४, ५ व ६ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणात पोलिसांनी या कैलास रतनलाल कुंभार (वय ३०, रा. चितोडगड, राजस्थान), करण रवि वाडुळे (वय २०, रा. जामवाडी, जि. जालना), नारायण रामेश्वर सेन (वय ३७, रा. उदयगाव, चितोडगड, राजस्थान), स्वप्नील मधुकर खेडेकर (वय २६, रा. रुमणा चांगफळ, जि. बुलढाणा), रुपीका रामकिसन जयभाये (वय २३, रा. रुमणा चांगफळ, जि. बुलढाणा) यांच्या विरोधात गुन्हा दाखल केला आहे. ही कारवाई पोलीस अधीक्षक तेघबीर सिंह संधू, अपर पोलीस अधीक्षक विक्रम साळी यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. पोलीस निरीक्षक भारती सो., सपोनि आनंदसिंग साबळे, सपोनि अविनाश गडाख तसेच पोलीस पथकातील अधिकारी व कर्मचाऱ्यांनी या कारवाईत सहभाग घेतला. जालना शहरात अनैतिक व्यवसाय करणाऱ्यांविरुद्ध पोलिसांची मोहीम अधिक तीव्र करण्यात येणार असून अशा बेकायदेशीर कृत्यांना कोणतीही मुभा दिली जाणार नसल्याचे पोलीस प्रशासनाकडून सांगण्यात आले.



**तभा वृत्तसेवा**

मुंबई येथे महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेऊन छत्रपती संभाजीनगर-जालना स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघाची जागा भारतीय जनता पक्षाला सोडण्यात यावी, अशी मागणी जालना भाजपाच्या शिष्टमंडळाने केली. यावेळी मंत्री अतुल सावे , आ. नारायण कुचे, आ. प्रशांत बंब, मा. आ. संजय केनेकर, भाजपा जिल्हाध्यक्ष भास्कर आबा दानवे, उपमहापौर राजेश राऊत, स्थायी समिती सभापती अशोक पांगारकर, बसवराज मंगरुळे, बापू घडामोडे आदी उपस्थित होते.

# जालना एमएमएलपीत पहिल्या ट्रायल कंटेनर रेकचे आगमन; मराठवाड्यात लॉजिस्टिक क्रांतीची नांदी

**तभा वृत्तसेवा**
**जालना । प्रतिनिधी**

जिल्ह्याच्या औद्योगिक आणि लॉजिस्टिक क्षेत्रासाठी ऐतिहासिक ठरणारा महत्त्वपूर्ण मल्टी मॉडेल लॉजिस्टिक्स पार्क (एमएमएलपी) अर्थात ड्राय पोर्ट प्रकल्पात २५ मे २०२६ रोजी पहिल्या ट्रायल कंटेनर रेकचे यशस्वी आगमन झाले. या पहिल्या ट्रायल कंटेनर रेकचे जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांनी स्वागत केले.





यावेळी अपर जिल्हाधिकारी रमेश मिसाळ, जालना ड्रॉयपोर्टचे व्यवस्थापक विकास मलिक यांच्यासह अधिकारी आणि उद्योजकांची उपस्थिती होती. यामुळे जालना आणि संपूर्ण मराठवाडा विभागात रेल्वे-संलग्न मालवाहतूक सेवांची औपचारिक सुरुवात झाली आहे. पहिली इनबाउंड कंटेनर रेक 'पोलाद स्टील' कंपनीसाठी स्पंज आयर्न घेऊन एमएमएलपी जालना येथील रेल्वे सायडिंगवर दाखल झाली. या यशस्वी ट्रायलमुळे उद्योगांसाठी रेल्वे, रस्ता आणि बंदर यांचा समन्वय साधणाऱ्या एकात्मिक मल्टी मॉडेल मालवाहतुकीची नवी दारे खुली झाली आहेत. विशेष म्हणजे,राष्ट्रीय महामार्ग लॉजिस्टिक्स व्यवस्थापन लिमिटेड (छक्ङचङ) याराष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण (छक-ख) च्या पूर्ण मालकीच्या उपकंपनीमार्फत आणिजवाहरलाल नेहरू पोर्ट प्राधिकरण (गछझ-) यांच्या सहकार्याने उभारण्यात आलेला हा देशातील पहिलाच ड्राय पोर्ट/मल्टी मॉडेल लॉजिस्टिक्स पार्क प्रकल्प आहे. महाराष्ट्र एमएमएलपी प्रायव्हेट लिमिटेड (चचझङ) या विशेष उद्देश वाहन (ड्झत) अंतर्गत हा प्रकल्प विकसित करण्यात आला आहे. केंद्र सरकारच्या 'पीएम गतिशक्ती' आणि राष्ट्रीय लॉजिस्टिक्स धोरणांतर्गत विकसित करण्यात आलेल्या या प्रकल्पामुळे मालवाहतुकीचा खर्च कमी होणे, मालवाहतुकीची कार्यक्षमता वाढणे, रस्त्यांवरील वाहतूक कोंडी कमी होणे, कार्बन उत्सर्जनात घट आणि इंधन बचत होण्यास मोठी मदत होणार आहे. पर्यावरणपूरक आणि शाश्वत मालवाहतूक व्यवस्थेला चालना देण्याच्या दृष्टीने हा प्रकल्प अत्यंत महत्त्वाचा मानला जात आहे.

या प्रकल्पाचा पहिला टप्पा सुमारे ६४.५१ एकर क्षेत्रात कार्यान्वित करण्यात आला आहे. तसेच, आयात-निर्यात (एदखच्) व्यवहारांसाठी आवश्यक असलेली सीमाशुल्क विभागाची वैधानिक मान्यता देखील या प्रकल्पाला प्राप्त झाली आहे. त्यामुळे आता जालन्यासह मराठवाड्यातील उद्योगांना थेट आयात-निर्यात माल हाताळणीची सुविधा उपलब्ध होणार आहे. एमएमएलपी जालना प्रकल्पामुळे मराठवाडा विभागात मोठ्या प्रमाणावर औद्योगिक गुंतवणूक आकर्षित होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. याशिवाय रोजगारनिर्मितीला चालना मिळणार असून, अंतर्गत महाराष्ट्रातील निर्यात-आयात व्यापाराला नवी गती मिळेल. जालना ते जेएनपीए बंदर तसेच राष्ट्रीय लॉजिस्टिक्स कॉरिडॉरशी थेट जोडणी झाल्याने उद्योग क्षेत्राला मोठा फायदा होणार आहे. या प्रकल्पाच्या कार्यान्वयनासाठीभारतीय रेल्वे, सीमाशुल्क विभाग, महाराष्ट्र शासनाच्या विविध यंत्रणा तसेच संबंधित सर्व भागधारकांनी केलेल्या समन्वित प्रयत्नांचे जालना जिल्हा प्रशासनाने कौतुक केले आहे. पहिल्या ट्रायल कंटेनर रेकच्या यशस्वी आगमनामुळे जालना जिल्ह्यासह संपूर्ण मराठवाडा विभागात लॉजिस्टिक-आधारित औद्योगिक विकासाच्या नव्या पर्वाची सुरुवात झाली आहे.

## अग्रलेख...

# नियोजनशून्यतेच्या विळख्यातली शेती

नैसर्गिक आपत्ती, अवकाळी पाऊस, दुष्काळ, वाढते कर्ज, शेतमालास न मिळणारा भाव आणि उत्पादन खर्चात झालेल्या प्रचंड वाढीमुळे शेतकरी आधीच आर्थिक आणि मानसिक तणावाखाली जगत आहे. अशा परिस्थितीत शासनाकडून ठोस आणि वेळेवर नियोजनाची अपेक्षा असते; पण खरीप हंगाम तोंडावर आला असला तरी प्रशासकीय गोंधळ संपण्याची चिन्हे नाहीत. बियाणांचा काळाबाजार सुरूच आहे, खतांचा कृत्रिम तुटवडा आहेच, इंधनाच्या वाढत्या दरांचा आणि टंचाईचा प्रश्न गंभीर बनला आहे. कर्जमाफीची घोषणा करण्यात आली; पण प्रत्यक्षात पेरणीसाठी शेतकऱ्याच्या खिशात पैसा येणार कुठून, याचे उत्तर कुणाकडेच नाही. एका बाजूला पावसाची चाहूल लागलेली आहे आणि दुसऱ्या बाजूला यंत्रणेचा हा गोंधळ शेतकऱ्याला सतत छळतो आहे. खरिपाचे नियोजन म्हणजे फक्त बैठका घेणे, घोषणा करणे नसते. शासनाच्या दृष्टीने तो शेतकऱ्यांच्या उपजीविकेला आधार देण्याचा प्रयत्न असायला हवा. दुर्दैवाने प्रत्येक वर्षी तोच गोंधळ, तोच ढिसाळपणा आणि त्याच चुका केल्या जातात. शेतकरी आणि संकट हे दोन्ही शब्द समानार्थी वाटावेत, अशी आजची परिस्थिती आहे. प्रत्येक हंगामाच्या सुरुवातीलाच शेतकरी निसर्गाशी कमी आणि प्रशासनाच्या निष्क्रियतेशी जास्त झुंजताना आपल्याला दिसतो.

यंदाच्या खरीप हंगामाकडे पाहताना पहिला प्रश्न उभा राहतो तो पावसाचा. हवामान खात्याचे अंदाज दरवर्षी बदलतात. कधी 'सरासरीपेक्षा जास्त पाऊस' असे सांगितले जाते, तर प्रत्यक्षात पाऊस दडी मारतो. कधी मुसळधार पावसाचा इशारा दिला जातो, पण पाऊस येतच नाही. हवामान अंदाजातील ही विसंगती शेतकऱ्याला आर्थिक खाईत ढकलते. पाऊस येईल या अपेक्षेने तो पेरणी करतो; पण नंतर जमीन कोरडी पडली की संपूर्ण बियाणे वाया जाते. दुबार पेरणीचा खर्च वेगळाच. खतांच्या बाबतीतही परिस्थिती वेगळी नाही. डीएपी, युरिया, मिश्र खतांचे दर वाढले आहेत. काही भागांत कृत्रिम तुटवडा निर्माण करून काळाबाजार सुरू असल्याच्या तक्रारी आहेत. शासन बैठका घेते, अधिकारी दौरे करतात, पण गावपातळीवर शेतकऱ्याला वेळेवर खत मिळत नाही. अनेकदा खतांसोबत इतर उत्पादने घेण्याची सक्ती केली जाते. कृषी सेवा केंद्रांतील ही उघड लूट प्रशासनाला दिसत नाही का की ती जाणीवपूर्वक दुर्लक्षित केली जाते?


हवामान बदल शेतकऱ्यांसमोरीलच नव्हे सर्वांच्या दृष्टीने फारच मोठे संकट आहे. कारण त्याचा संबंध थेट अर्थकारणाशी आहे. पूर्वी पावसाळ्याचा एक ठरावीक क्रम होता. मृग नक्षत्रात पाऊस सुरू व्हायचा, पेरण्या व्हायच्या, मध्यम पाऊस पडायचा आणि पिके उभी राहायची. आता चित्र पूर्ण बदलले आहे. कधी जून कोरडा जातो, तर जुलैमध्ये महापुरासारखा पाऊस होतो आणि ऑगस्टमध्ये पुन्हा खंड पडतो. अवकाळी पावसाने शेतीचे सारेच गणित कोलमडते. सध्या उन्हाची दाहकता प्रचंड वाढली आहे. विदर्भ, मराठवाडा आणि उत्तर महाराष्ट्रातील अनेक भागांत तापमान ४५ अंशांच्या पुढे गेले. जमिनीतील ओलावा संपला असून पाण्याचे स्रोतही आटले आहेत. जनावरांसाठी चारा आणि पाण्याचा प्रश्न गंभीर झाला आहे. उष्णतेच्या लाटेचा परिणाम थेट शेतीवरही होत असतो. अति उष्ण वातावरणात जमिनीतील सूक्ष्मजीव नष्ट होतात, मातीची सुपीकता कमी होते आणि उत्पादनावरही परिणाम होत असतो. पण कृषी विभागाकडे या संकटावर ठोस उपाययोजना आहेत का? याचे उत्तर दुर्दैवाने नकारात्मकच. कृषी विभागाची भूमिका केवळ कागदी घोडे नाचविण्यापुरतीच आहे. शेतकऱ्यांना मार्गदर्शन करण्यासाठी अधिकारी गावात किती वेळा पोहोचतात? पीकपद्धती बदल, हवामान आधारित शेती, कमी पाण्यातील पिके याबाबत माहितीच दिली जात नाही. शेतकरी अजूनही खाजगी कंपन्यांच्या एजंट्सकडून माहिती घेतो, कारण सरकारी यंत्रणा त्याच्यापर्यंत पोहोचतच नाही. शासनाच्या योजनांची घोषणाबाजी मोठी असते; पण प्रत्यक्ष लाभ मिळवताना शेतकरी हैराण होतो. पीकविमा योजना हे त्याचे उत्तम उदाहरण. विम्यासाठी पैसे कापले जातात; पण नुकसानभरपाई मिळवण्यासाठी शेतकऱ्याला महिनोन्महिने प्रतीक्षा करावी लागते. अनेकदा पंचनामेच होत नाहीत. झाले तर नुकसान कमी दाखवले जाते. विमा कंपन्या आणि प्रशासन यांच्यात शेतकरी भरडला जातो. प्रत्येक निवडणुकीत कर्जमाफीची घोषणा होते; पण प्रत्यक्षात पात्र-अपात्रतेच्या निकषांत अनेक खरे शेतकरी वंचित राहतात. कर्जमाफी हा उपाय नाही. शेतीला स्थैर्य देणारे धोरण हवे. उत्पादनाला हमीभाव, साठवणूक सुविधा, प्रक्रिया उद्योग आणि बाजारपेठेची साखळी मजबूत केल्याशिवाय शेतकऱ्यांचे प्रश्न सुटणार नाहीत. खरीप हंगामाच्या तोंडावर बाजारातील बियाणे कंपन्या प्रचंड नफा कमावत आहेत. जाहिरातींचा भडिमार करून विक्रमी उत्पादन देण्याचे दावे केले जातात. प्रत्यक्षात हवामान साथ देत नसल्याने उत्पादन घटते आणि तोटा शेतकऱ्याचाच होतो. शेतकऱ्यांच्या मानसिकतेचा ही व्यवस्था फायदा घेत आहे. ग्रामीण भागात आत्महत्येचा प्रश्न पुन्हा गंभीर होत आहे. आर्थिक संकट, वाढते कर्ज, अनिश्चित हवामान आणि बाजारातील अस्थिरतेमुळे शेतकरी मानसिक तणावाखाली आहे. सरकारे बदलली, घोषणा बदलल्या; पण शेतकऱ्याचे आयुष्य बदलले नाही. उलट त्याच्या संकटांची तीव्रता वाढत गेली. पाणी व्यवस्थापनाच्या बाबतीतही महाराष्ट्राचे चित्र फार चांगले नाही. हजारो कोटींचे सिंचन प्रकल्प झाले; पण अजूनही मोठा भाग कोरडवाहू आहे. ज्या राज्यात धरणे आहेत, कालवे आहेत, तिथे टँकरने पाणीपुरवठा करावा लागतो, हा प्रशासनाच्या अपयशाचा पुरावाच म्हटला पाहिजे. शेतकरी फक्त उत्पादन करतो; पण त्याच्या मालाला योग्य भाव मिळत नाही. कांदा, टोमॅटो, सोयाबीन, कापूस यांचे दर सतत घसरत असतात. पिकवताना खर्च वाढतो; पण विकताना भाव कोसळतो. बाजार समित्या, व्यापारी आणि निर्यात धोरणातील विसंगतीमुळे शेतकरी अडचणीत येतो. शेतमाल आयात-निर्यात निर्णय अचानक घेतले जातात आणि त्यांचा फटका थेट शेतकऱ्याला बसतो. राज्याच्या कृषी धोरणात सातत्याचा अभाव आहे. एखाद्या वर्षी सोयाबीनला प्रोत्साहन, पुढच्या वर्षी कापूस, मग डाळी. परिणामी पीकपद्धतीत असंतुलन निर्माण होते. हवामान बदलाच्या पृष्ठभूमीवर राज्याने दीर्घकालीन कृषी आराखडा तयार करण्याची गरज आहे. कोणत्या भागात कोणती पिके शाश्वत राहतील, पाण्याचा वापर कसा कमी करायचा, स्थानिक बियाणांचे संवर्धन कसे करायचे, याचा गंभीर विचार व्हायला हवा. शेतकरी त्याच्या श्रमाचे मोल मागतो आहे. गावागावात कृषी सहायक पोहोचले पाहिजेत. हवामानाच्या सूचना वेळेवर मिळाल्या पाहिजेत. बनावट बियाणे आणि खतांवर कठोर कारवाई झाली पाहिजे. पीकविम्याची प्रक्रिया पारदर्शक झाली पाहिजे. खरी गरज आहे ती शेतीला उद्योगाइतके महत्त्व देण्याची. उद्योगासाठी जशा धोरणात्मक सवलती दिल्या जातात, तसेच पाठबळ शेतीलाही मिळाले पाहिजे.

खरीप हंगाम हा महाराष्ट्राच्या अर्थव्यवस्थेचा कणा आहे. पाऊस चांगला झाला तर बाजारपेठा जिवंत राहतात, ग्रामीण अर्थचक्र फिरते. पावसाने हुलकावणी दिली किंवा अतिवृष्टी झाली तरी अर्थव्यवस्था डळमळते. त्यामुळेच शेतीचा प्रश्न हा केवळ शेतकऱ्यांपुरता मर्यादित नसून तो संपूर्ण राज्याच्या जगण्याचा प्रश्न आहे. शेतकरी आभाळाकडे पाहतोय, पण त्याचवेळी सरकारकडेही पाहतो आहे. पाऊस पडेल की नाही हे निसर्ग ठरवेल; पण शेतकऱ्याला व्यवस्थेच्या भरवशावर जगता येईल की नाही, हे सरकारने ठरवायचे आहे. दुर्दैवाने आतापर्यंतचा अनुभव त्याला निराश करणारा आहे. शेतकरी अजूनही उभा आहे, कारण त्याच्याकडे पर्याय नाही. तो उन्हात जळतो, पावसात भिजतो, कर्जात बुडतो; पण तरीही पेरणी करतो. कारण त्याच्या हातात केवळ बियाणे आहे आणि मनात उद्याच्या पावसाची आशा. पुढाऱ्यांनी आणि प्रशासनाने या आशेचा अंत होऊ देऊ नये. अन्यथा शेतकऱ्याचा प्रश्न हा केवळ कृषक संस्कृतीचा नाही, तर सामाजिक आणि आर्थिक विस्फोटाचा प्रश्न ठरेल. कृषक संस्कृती जगली, वाढली तरच मनुष्य जगेल.

## प्रासंगिक

**तरुण विजय**

# नितीनजी, नव्या भारताच्या उभारणीतील एक अग्रणी...!



भारताच्या नव्या मार्गाचे शिल्पकार म्हणून ओळखले जाणारे केंद्रीय मंत्री नितीन गडकरी हे आज भारतातील सर्वांत सक्रिय आणि परिणामकेंद्रित नेत्यांपैकी एक मानले जातात. त्यांना स्नेहाने आणि आदराने 'भारताचे हायवे मॅन' म्हटले जाते, परंतु त्यांचे योगदान केवळ रस्त्यांपुरते मर्यादित नाही. त्यांचे संपूर्ण कार्य दोन प्रकारे समजून घेता येईल. पहिले, एक संवेदनशील नेता म्हणून सामाजिक सुधारणेसाठी केलेले कार्य आणि दुसरे, देशाचे रस्ते आणि महामार्ग मंत्री म्हणून केलेले त्यांचे उत्कृष्ट कार्य. नितीन गडकरी राजकारणाला केवळ एक करीअर न मानता, समाज आणि अर्थव्यवस्था सुधारण्याचे एक साधन मानतात. ते पंडित दीनदयाल उपाध्याय यांच्या तत्त्वांनुसार अन्त्योदय म्हणजेच समाजातील सर्वांत गरीब घटकांच्या विकासाच्या तत्त्वांवर कार्य करतात. आदिवासी भागांतून कुपोषण निर्मूलन करणे ही त्यांच्या आयुष्यातील एक महत्त्वपूर्ण कामगिरी आहे. महाराष्ट्रातील त्यांच्या सुरुवातीच्या काळात, त्यांच्या असे लक्षात आले की, अमरावती जिल्ह्यातील मेळघाट-धारणी भागातील आदिवासी लोक रस्त्यांच्या अभावामुळे वैद्यकीय उपचार आणि शिधावाटपापासून वंचित राहत होते. त्यामुळे मोठ्या प्रमाणावर कुपोषण वाढले होते. नितीन गडकरी यांनी ९१ दुर्गम आदिवासी गावांना पक्क्या रस्त्यांनी जोडले. या एका पावलामुळे डॉक्टर आणि शिधावाटप सहज उपलब्ध झाले; परिणामी कुपोषणात लक्षणीय घट झाली.

**कचऱ्यातून सोने :** त्यांना कचऱ्यापासून उपयुक्त वस्तू बनवण्याची प्रचंड आवड आहे. त्यांच्या मार्गदर्शनाखाली, नागपूर हे भारतातील पहिले शहर बनले, जिथे महानगर पालिकेच्या सांडपाण्यावर प्रक्रिया करून ते वीज प्रकल्पांना विकण्यात आले आणि त्यातून मोठा आर्थिक लाभ झाला. ते रस्ते बांधकामात प्लॅस्टिक कचरा आणि घनकचऱ्याचाही उपयोग करतात. नितीन गडकरी हे कृषी प्रदेशातील अर्थात् नागपूरचे रहिवासी असल्याने त्यांना शेतकऱ्यांच्या अडचणींची चांगलीच जाणीव आहे. त्यांनी शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढविण्यासाठी मोठ्या प्रमाणावर काम केले आहे. त्यांच्या पाठिंब्याने देशातील पहिला बायो-सीएनजीवर चालणारा ट्रॅक्टर तयार झाला; ज्यामुळे शेतकऱ्यांच्या डिझेल खर्चात बचत झाली. त्यांनी ग्रामीण लोकांना रोजगार देण्यासाठी अन्त्योदय ट्रस्ट आणि सहकारी साखर कारखाने स्थापन केले.

२०१४ मध्ये जेव्हा नितीन गडकरी यांनी या मंत्रालयाचा कार्यभार स्वीकारला, तेव्हा देशात रस्ते बांधणीची गती खूपच कमी होती. भूसंपादनास होणारा विलंब आणि निधीच्या अभावामुळे सुमारे १ लाख कोटी रुपयांचे प्रकल्प रखडले होते. गडकरींनी हे अडथळे दूर केले.

**रस्ते बांधणीचा विक्रमी वेग :** ते मंत्री झाल्यानंतर देशातील महामार्ग बांधणीचा वेग झपाट्याने वाढला. २०१३-१४ मध्ये जिथे दररोज केवळ ११ ते १२ किलोमीटर रस्ता बांधला जात होता, तिथे २०२०-२१ मध्ये कोविड-१९ महामारीच्या काळात हा वेग वाढून दररोज ३७ किलोमीटर झाला. २०१४ च्या तुलनेत भारतातील राष्ट्रीय महामार्गांची एकूण लांबी ५० टक्क्यांपेक्षा जास्त वाढली आहे.

**प्रमुख द्रुतगती मार्ग आणि प्रकल्प :** त्यांनी केवळ रस्ते रुंद केले नाहीत, तर देशाला आधुनिक आणि मोठे द्रुतगती मार्गही उपलब्ध करून दिले. भारतमाला प्रकल्पांतर्गत दिल्ली-मुंबई द्रुतगती मार्गाच्या बांधकामाला गती दिली (ज्यामुळे दिल्ली ते मुंबई प्रवासाचा वेळ २४ तासांवरून केवळ १२ तासांवर येईल). तसेच, त्यांनी झोझिला बोगद्यासारख्या गुंतागुंतीच्या प्रकल्पांचे काम पूर्णत्वास नेले. त्यामुळे पर्वत भागांत सर्व ऋतूंमध्ये प्रवास करणे शक्य होते.

**निधी उभारण्याचे नवीन स्रोत :** सरकारकडे प्रत्येक प्रकल्पासाठी निधीची कमतरता होती. त्यावर मात करण्यासाठी गडकरींनी नावीन्यपूर्ण पद्धती शोधून काढल्या. त्यांनी हायब्रीड ॲन्युईटी मॉडेल सादर केले, ज्यामध्ये सरकार रस्ते बांधणीच्या खर्चापैकी ४० टक्के खर्च उचलते, ज्यामुळे खाजगी कंपन्यांना निर्भयपणे काम करता येते. या व्यतिरिक्त सरकारने आधीच बांधलेले रस्ते भाडेतत्त्वावर देऊन नवीन निधी उभारला.

**पर्यावरणपूरक वाहने आणि इंधन :** गडकरी हे भारतात इलेक्ट्रिक वाहने (ईव्ही) आणि स्वच्छ इंधनाला प्रोत्साहन देण्याचे प्रमुख समर्थक आहेत. पेट्रोल आणि डिझेलवरील देशाचा पैसा वाचविण्यासाठी त्यांनी १०० टक्के इथेनॉलवर (ऊस आणि धान्यांपासून मिळविलेले) चालणाऱ्या फ्लेक्स-फ्यूएल इंजिनच्या वापरावर भर दिला. ते ग्रीन हायड्रोजनला भविष्यातील इंधन मानतात.

**डिजिटल परिवर्तन आणि सुरक्षा :** टोल प्लाझावरील लांब रांगांची समस्या दूर करण्यासाठी देशव्यापी मॉडेल लागू केले, ज्यामुळे लोकांचा वेळ आणि इंधन दोन्ही वाचले. याव्यतिरिक्त त्यांनी जुनी आणि प्रदूषणकारी वाहने काढून टाकण्यासाठी 'व्हेईकल स्क्रॅपेज पॉलिसी' आणले आणि रस्ते अपघातांमध्ये प्रवाशांचे प्राण वाचवण्यासाठी एअरबॅगचे नियम कडक केले.

नितीन गडकरी हे एक असे उत्साही नेते आहेत, ज्यांनी आपले कार्य आणि विचारधारा सोडून आयुष्यात इतर कशाचीही पर्वा केली नाही. ते मित्रांचे मित्र आहेत आणि आजही आपल्या जुन्या ओळखीच्या आणि मित्रांसोबत मैत्री कायम ठेवतात. त्यांचा सर्वांत मोठा गुण म्हणजे प्रत्येक कामाकडे एक आव्हान म्हणून पाहतात. रज्जूभय्यांच्या शब्दांत, ''परिपूर्णतेचा स्तर एक इंचही कमी होता कामा नये.'' एकतर काम हाती घ्यायचे नाही किंवा हाती घेतले, तर ते उत्कृष्टपणे पूर्ण करायचे. दिल्लीतील त्यांच्या मंत्रालयातील एका मोठ्या फलकावर लिहिलेल्या या ओळी खूप लोकप्रिय झाल्यात : 'अमेरिका महान आहे म्हणून तिथले रस्ते चांगले आहेत असे नव्हे, तर तिथले रस्ते चांगले आहेत म्हणून अमेरिका महान आहे.' गडकरींनी अटलजींच्या कार्यकाळात मुंबई-पुणे द्रुतगती मार्ग बांधून हाच मंत्र प्रत्यक्षात आणला. त्यांच्या सल्ल्यानेच अटलजींना राष्ट्रीय महामार्ग मंत्रालय आणि ग्रामीण रस्ते सुलभता योजना (प्रधानमंत्री ग्राम सडक योजना) सुरू करण्याची प्रेरणा मिळाली, असे म्हणणे अधिक योग्य ठरेल. केंद्रीय मंत्री म्हणून, त्यांनी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे एक समर्पित स्वयंसेवक म्हणून, कोणत्याही प्रसिद्धी किंवा माध्यमांच्या पाठिंब्याशिवाय सामान्य नागरिकांचे आशीर्वाद आणि प्रशंसा मिळवत, देशाला एकता व विकासाच्या बंधनात बांधणारे महामार्गांचे जाळे उभारले.

(लेखक राज्यसभेचे माजी सदस्य आहेत.)

## वेध

**विजय निचकवडे**

# सात-बारात 'पाणीदार' महाराष्ट्राचे प्रतिबिंब!

निसर्ग मुक्तहस्ते देत असला तरी, आम्ही ते फक्त घेतच नाही, तर ओरबाडतो! मिळते तेवढे घ्या, ओरबडून, आमचं काय जातंय, हीच मानसिकता आज झाली आहे. मग त्या वर्षानुवर्ष सावली देणाऱ्या वृक्षांच्या कटाईच्या रूपाने असो, की भूगर्भातील जलसाठ्याचे अनियंत्रित आणि अवास्तव उपशाच्या रूपाने असो! पण जेव्हा माणसाचे नियंत्रण सुटते, तेव्हा त्यांना नियंत्रित करण्यासाठी एक व्यवस्था उभारून नियम घालून दिले जातात, त्यातून बदलाची अपेक्षा केली जाऊ शकते! जलव्यवस्थापनासाठी 'पाण्याचा सात-बारा' हा अभिनव प्रयोग राबविण्याचा राज्य सरकारने घेतलेला निर्णय नक्कीच महाराष्ट्राच्या नव्या जलक्रांतीची नांदी ठरू शकेल!



बुडत्याचे पाय डोहाकडे म्हणतात, ते खोटे नसावे! भूजल पातळी खालावत चालली आहे. जलस्रोत संपत आहेत. टँकरचे प्रमाण वाढू लागले आहे. या सर्व गोष्टी विनाशाकडे नेणाऱ्या आहेत. तरीही आज आम्हाला भविष्यातील धोक्याची जाणीव होत नसेल तर आम्ही बुद्धिजीवी म्हणण्यास कितपत पात्र आहोत. प्रचंड आणि अनियंत्रित पाण्याचा उपसा करून जणू काही भूगर्भातील पाणी आमच्या मालकीचे असल्यागत वागतो. नियोजनशून्य असा पाण्याचा वापर करतो आणि शेवटी निसर्गाला दोष देऊन मोकळे होतो. पण आता या अनियंत्रित आणि बेसुमार जलउपशावर अंकुश लागावा म्हणून राज्य शासनाच्या महसूल व जलसंपदा विभागाने घेतलेला पुढाकार नक्कीच कौतुकास्पद आहे. राज्याचे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या संकल्पनेतून साकारणारा 'पाण्याचा सात-बारा' महाराष्ट्राचा चेहरा 'पाणीदार' करणारा असाच आहे. सात-बारा हा प्रत्येक शेतकऱ्याच्या आयुष्याचा आणि अर्थकारणाचा अविभाज्य अंग समजला जातो. या सात-बारावर जमिनीची मालकी आणि पिकांची नोंदणी असते. याच धर्तीवर आता 'पाण्याचा' सात-बारा तयार होणार आहे आणि तोही डिजिटल! बदलत्या हवामानामुळे निर्माण होत असलेले पाण्याचे दुर्भिक्ष, अनियंत्रित भूजल उपसा, भविष्यातील जलसंकटाची चाहूल अशा विविध बाबींचा विचार करून ही संकल्पना मांडणारे आणि त्या दृष्टीने पाऊल टाकणारे महाराष्ट्र हे देशातील पहिले राज्य आहे. या सात-बारावर पाण्याची उपलब्धता, वापर, साठ्याचा टाळेबंद नोंदविला जाणार आहे. 'वॉटर बॅलन्सशीट' तयार करून या ताळेबंदाच्या आधारे पिण्याचे असो, की सिंचनाचे अशा दोन्ही प्रकारच्या पाण्याचे नियोजन करणे सोपे होणार आहे. भारतात ७० टक्के शेती ही पाण्यावर अवलंबून आहे. पावसाचे अनियंत्रित प्रमाण, वाढते बाष्पीभवन, अतोनात उपसा यामुळे जलसाठ्यावर पडणारा ताण पाहता पाण्याचा सात-बारा प्रभावी ठरू शकतो. आज महाराष्ट्रातील ४२ टक्के प्रदेश टंचाईग्रस्त म्हणून ओळखला जातो. अशा सर्व परिस्थितीत पाणी वापराचा ताळेबंद जोपर्यंत ठेवला जाणार नाही, तोपर्यंत नियंत्रण ठेवणे शक्य होणार नाही. हा ताळेबंदच भविष्यातील नियोजनाचा आधारही राहणार आहे. राज्य शासनाने पाणी सात-बाराच्या निमित्ताने टाकलेले हे पाऊल महाराष्ट्रात जलक्रांतीची दिशा स्पष्ट करणारे आहे. मात्र हे करताना महाराष्ट्रातील प्रत्येकाला आपल्या कर्तव्याची जाणीव होणे गरजेचे आहे. शासन सात-बारा तयार करून मोकळे होईल. ग्राम पंचायती, पाणलोट क्षेत्र अशा ठिकाणी कागदोपत्री आकडेवारी उपलब्ध राहून अनेक दस्तावेज तयार होतील. पण या मागचा हेतू जोपर्यंत आमच्यासारख्या स्वार्थाने झपाटलेल्यांना कळणार नाही, तोपर्यंत हा चांगला प्रयोग क्रांतीच्या दिशेने सहज वाटचाल करू शकणार नाही. जलपुनर्भरण व्हावे म्हणून शासनाने अनेक अटी टाकल्या आहेत. ही अट पूर्ण करण्याच्या हमीवर बांधकामाची परवानगी दिली जाते. परंतु किती लोक दिलेल्या हमीसोबत प्रामाणिक असतात, याचा विचार प्रत्येकाने करावा! शासकीय यंत्रणाही केवळ कागद रंगविण्याचे काम करते. त्यामुळे पाण्याचा सात-बारा केवळ आकडेवारीने रंगून न राहता महाराष्ट्र पाणीदार होण्यासाठी महत्त्वाचा आधार ठरेल, यासाठी प्रशासकीय यंत्रणेसह सामान्य नागरिकांनीही मनावर घेणे गरजेचे आहे. विकसित महाराष्ट्राचे स्वप्न साकारण्याच्या दृष्टीने राज्याच्या महसूल मंत्र्यांनी घेतलेली ही भूमिका धडसाची आणि दूरदृष्टी ठेवून असली तरी जोपर्यंत अधिकारी, कर्मचारी आणि सामान्य माणसांची 'दृष्टी' बदलणार नाही, तोपर्यंत महाराष्ट्राच्या चेहऱ्यावर पाणी येणार नाही.

९७६३७१३४१७

## विशेष

**कमोडोर श्रीकांत देशमुख**


# ग्रेट निकोबार प्रकल्प; भारताची धोरणात्मक गरज

१७ व्या शतकापासून पोर्तुगीज आणि फ्रेंच मिशनऱ्यांनी निकोबार बेटांवर ख्रिश्चन धर्माचा प्रचार करण्याचा प्रयत्न केला. निकोबार बेटांचे महत्त्व लक्षात घेऊन डेन्मार्कने १७५६ मध्ये त्यांचा ताबा घेतला आणि कामोर्ता बेटावर त्यांचे मुख्यालय स्थापन केले. तथापि, १८४८ मध्ये त्यांनी ते सोडून दिले. १८६९ मध्ये ब्रिटिशांनी औपचारिकपणे ही बेटे ताब्यात घेतली. १९४२ ते १९५ या काळात दुसऱ्या महायुद्धाच्या काळात जपान्यांनी ही बेटे काबीज केली. १९४७ मध्ये या बेटांना भारतीय प्रजासत्ताकाचा अविभाज्य भाग म्हणून सामावून घेण्यात आले. ग्रेट निकोबारमध्ये भारताच्या सुरक्षिततेसाठी पायाभूत सुविधांचा विकास करण्याच्या भारताच्या दृढ निर्णयामुळे या प्रदेशाकडे जगाचे लक्ष वेधले गेले आहे. भौगोलिकदृष्ट्या ग्रेटा निकोबार हे भारतातील सर्वात दक्षिणेकडील बेट. ते ९२१ चौरस किमी क्षेत्रफळ असलेले पर्यावरणीयदृष्ट्या महत्त्वाचे क्षेत्र आहे. उष्णकटिबंधीय सदाहरित जंगले, उच्च जैवविविधता (मेगापोड पक्ष्यासह) आणि ६४२ मीटर उंच माऊंट थुलियर हे त्याची वैशिष्ट्ये आहेत. यात गॅलाथियासारख्या प्रमुख नद्या आहेत आणि मलाक्का सामुद्रधुनीजवळ एक महत्त्वपूर्ण सामरिक सागरी बिंदू म्हणून काम करते. येथे स्थानिक शोम्पेन (विशेषत: प्राचीन आदिवासी गट), निकोबारी लोक राहतात. काही स्थायिक झालेले इतर लोक राहतात. ग्रेट निकोबार हा भारतासाठी सामरिक आणि आर्थिकदृष्ट्या अत्यंत महत्त्वाचा आहे. मलाक्का सामुद्रधुनीजवळील हे एक महत्त्वपूर्ण सागरी प्रवेशद्वार आहे. भारताचे संरक्षण धोरण आणि ॲक्ट ईस्ट धोरणासाठी या क्षेत्राचा विकास महत्त्वाचा आहे. त्याचे मुख्य पैलू पुढीलप्रमाणे :

**स्ट्रॅटेजिक चोक पॉईंट :** हे पूर्व-पश्चिम शिपिंग मार्गापासून केवळ ४० किमी आणि मलाक्का सामुद्रधुनीपासून १०० किमी अंतरावर आहे. यामुळे भारताला सागरी वाहतुकीचे निरीक्षण आणि नियंत्रण करणे शक्य होते.

**लष्करी सामर्थ्य प्रोजेक्शन :** अंदमान समुद्र आणि विस्तीर्ण हिंद-प्रशांत क्षेत्रावर वर्चस्व गाजवण्यासाठी नौदल आणि हवाई दलासाठी हे बेट महत्त्वाचे आहे. या प्रदेशातील पहिला सुरक्षा आणि आपत्ती निवारण प्रदाता/सुविधा प्रदाता म्हणून भारताला बळकट करण्यासाठी पण हे बेट महत्त्वाचे आहे.

**चीनवर नजर ठेवणे :** हे या प्रदेशातील परकीय, विशेषत: चिनी नौदलाचा प्रभाव प्रभाव कमी करण्यास मदत करते. चाचेगिरी, अवैध व्यापार आणि सुरक्षा धोक्यांविरुद्ध भारताचे संरक्षण मजबूत करते. अंदाजे ८०,००० कोटी रुपयांचा ग्रेट निकोबार विकास प्रकल्प हा केवळ पायाभूत सुविधांचा उपक्रम नाही, तर भारताच्या राष्ट्रीय सुरक्षेसाठी धोरणात्मक प्रकल्प आहे. जगातील सर्वात व्यस्त शिपिंग लेनपैकी एक असलेल्या मलाक्काच्या सामुद्रधुनीजवळ परदेशी बंदरांवरील अवलंबित्व कमी करणे, पाळत ठेवण्याची क्षमता वाढविणे व आर्थिक क्षमता वाढविणे ही त्याची उद्दिष्टे आहेत. या प्रकल्पात १४.२ दशलक्ष २० फूट समतुल्य युनिट (एमटीईयू) आंतरराष्ट्रीय कंटेनर ट्रान्सशिपमेंट टर्मिनल, ग्रीनफील्ड आंतरराष्ट्रीय विमानतळ (४००० पीक अवर प्रवासी-पीएचपी), ४५० मेगा वॉट गॅस-सौर ऊर्जा प्रकल्प आणि नियोजित टाऊनशिप यासारख्या प्रमुख पायाभूत सुविधांचा समावेश आहे. ईआयए अधिसूचना, २००६ आणि आयसीआरझेड अधिसूचना, २०१९ अंतर्गत ४२ अनुपालन अटींचे पालन करून आणि १७.३० चौरस किमीवर पर्यायी वनीकरणासह बेट वन आच्छादनाच्या १.८२ टक्क्यांची भरपाई करून हा प्रकल्प नियमन पर्यावरणीय चौकटीचे अनुसरण करेल. शोम्पेन आणि निकोबार समुदायांचे कमीत कमी विस्थापन आणि पुनर्अधिसूचनेद्वारे अधिसूचित आदिवासी राखीव क्षेत्रात जास्त वाढ करून या प्रकल्पात आदिवासींचे कल्याण केंद्रस्थानी असेल हे भारत सुनिश्चित करीत आहे. हा प्रकल्प आधुनिक तंत्रज्ञानावर आधारित असून भारताला पुढील फायदे होणे अपेक्षित आहे-



**इंटरनॅशनल कंटेनर ट्रान्सशिपमेंट टर्मिनल (आयसीटीटी) :** सिंगापूर आणि कोलंबोसारख्या परदेशी बंदरांतील व्यापार हिस्सा मिळवून, जागतिक शिपिंगमध्ये भारताला एक प्रमुख देश म्हणून स्थान मिळेल.

**आर्थिक केंद्र विकास :** एक ग्रीनफिल्ड आंतरराष्ट्रीय विमानतळ, ४५० एमव्हीए ऊर्जा प्रकल्प आणि एक नवीन वसाहत या प्रदेशातील आर्थिक घडामोडींना चालना देईल.

**महसूल आणि रोजगार निर्मिती :** अंदाजानुसार हा प्रकल्प २०४० पर्यंत वार्षिक ३०,००० कोटी रुपये महसूल निर्माण करू शकेल आणि ५०,००० रोजगार निर्माण करू शकेल.

**प्रादेशिक संपर्क व्यवस्था :** ही सागरमाला उपक्रम आणि मेरीटाईम इंडिया व्हिजन २०३० शी सुसंगत परदेशी केंद्रांवरील अवलंबित्व कमी करेल.

**संरक्षण आवश्यकता :** मलाक्का सामुद्रधुनी आणि जागतिक नौवहन वाहतुकीवर प्रभावी देखरेख ठेवणे शक्य होईल. यामुळे अंदमान आणि निकोबार कमांड मजबूत होईल, ही भारतातील एकमेव तिन्ही सेवा कमांड आहे. यामुळे भारताच्या सुरक्षिततेला असलेले धोके कमी करेल आणि नैसर्गिक आपत्तींना त्वरित प्रतिसाद देण्याची क्षमता वाढवेल.

**ॲक्ट ईस्ट धोरण आणि व्यापार :** हा प्रकल्प भारताच्या ॲक्ट ईस्ट पॉलिसीला समर्थन देईल, हिंद महासागराला प्रशांत महासागराशी जोडेल, लॉजिस्टिक कनेक्टिव्हिटी वाढवेल आणि जागतिक व्यापार मार्गांमध्ये प्रमुख केंद्र म्हणून काम करेल.

### चीनची नाराजी

हा प्रकल्प चीनच्या दुखऱ्या नसेला स्पर्श करीत असल्याने ते प्रकल्पाच्या प्रगतीत अडथळा आणण्याचा प्रयत्न करीत आहेत. चीनने या प्रकल्पाला लक्ष्य करून एक अपप्रचार मोहीम सुरू केली आहे, ज्यामध्ये तो पर्यावरण विध्वंसक आणि राजकीयदृष्ट्या वादग्रस्त असल्याचे चित्रित केले गेले आहे; चीनने मात्र पर्यावरणीयदृष्ट्या संवेदनशील क्षेत्रात स्वत:चा ब्रह्मपुत्रा मेगा धरण प्रकल्प तथा दक्षिण चिनी समुद्रात कृत्रिम बेटे निर्माण करण्याचे प्रकल्प निर्ढावलेल्या वृत्तीने पुढे नेले आहेत; ज्यामुळे त्याचा दुटप्पी चेहरा उघड झाला आहे. विश्लेषकांनी निदर्शनास आणून दिले आहे की, चीनच्या व्यापार आणि ऊर्जा पुरवठ्यासाठी एक महत्त्वाचा अडथळा असलेल्या मलाक्काच्या सामुद्रधुनीजवळ भारताच्या सामरिक क्षमतेला कमकुवत करण्याच्या बीजिंगच्या व्यापक धोरणाचा हा एक भाग आहे. चिनी सोशल मीडिया प्लॅटफॉर्म ग्रेट निकोबार बेटावरील भारताच्या पायाभूत सुविधांच्या प्रकल्पाबद्दल चिनी अस्वस्थता स्पष्टपणे दर्शवित आहेत. हा भारताच्या बेटांना देशाच्या आर्थिक आणि धोरणात्मक मुख्य प्रवाहात एकत्रित करण्याच्या दिशेने एक निर्णायक पाऊल आहे, जो २१ व्या शतकात भारताला एक समर्थ सागरी शक्ती म्हणून स्थान देईल.

(लेखक निवृत्त नेव्हल एव्हिएशन ऑफिसर तथा संरक्षण आणि भू-राजकीय विश्लेषक आहेत.)

### 'नीट'ची ऑनलाईन परीक्षा हाच उपाय

देश स्तरावरील 'नीट' स्पर्धा परीक्षेतील पेपर फुटीचे प्रकरण वाढत चालले आहे. या प्रकरणाचा सखोल तपास करण्याचा चंग यंत्रणांनी बांधला आहे. वारेमाप पैसे देऊन पेपर विकत घेणारे पालक तसेच शिक्षण संस्था पेपरफुटीसाठी जबाबदार आहेत. कोणालाही दया दाखवू नये. शिक्षणाच्या मूळ हेतूवरच घाला घालण्याचा हा प्रकार आहे. शिक्षण क्षेत्राला काळिमा फासणारी ही घटना आहे. पुन्हा असे करण्याचे धाडस कोणालाही होऊ नये या दृष्टीने कठोर कारवाई करावी. पुढील वर्षीपासून 'नीट'चे पेपर सेटिंग ऑनलाईन करण्याचा निर्णय शासनाने घेतलाच आहे. त्याचप्रमाणे देश आणि राज्य स्तरावरील सर्व प्रकारच्या स्पर्धा परीक्षा ऑनलाईनच घेण्याचे ठरविल्यास पेपरफुटीला वावच राहणार नाही. ट्युशनच्या नावाखाली असे करणाऱ्यांचा धंदाही बंद होईल.

**ॲड. बळवंत रानडे**/पुणे

### आंबेनळी घाटातील अपघात मन विचलित करणारा

आंबेनळी घाटात पुन्हा एकदा मृत्यूने अक्षरशः तांडव घातला. सहलीसाठी आलेल्या पर्यटकांचे स्कॉर्पिओ वाहन आंबेनळी घाटात १२०० फूट खाली कोसळले आणि वाहनातील आठ जणांचा जागीच मृत्यू झाला. या दरीमध्ये २४ तासांपूर्वी झालेल्या या अपघाताचे कोणालाच काही कळू शकले नाही. कारण जवळजवळ दीड हजार फूट उंचीवरून पडलेले वाहन कळणार कसे? आंबेनळी घाटाचा प्रश्न आता शासनाने त्वरित आपल्या अखत्यारीत घेऊन त्या घाटावर उपाययोजना करायला हवी. दोन वर्षांपूर्वी एक लक्झरी बस या दरीत कोसळली होती आणि फक्त चालक सोडून जवळजवळ ४० प्रवाशांचा मृत्यू झाला होता. कालचा अपघात २४ तासांनी कळला. शासनाने आंबेनळी घाटावर सशक्त पहारा चौकी वा सशस्त्र जवानांची नियुक्ती करावी; जेणेकरून अपघातात झाल्यास बचावकार्य सुरू करता येईल.

**शिरीष बने**/९२२४२९९२३०

## वाचक पत्रे

### सावरकरांचा आठव



२८ मे रोजी स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांची १४३ वी जयंती. त्यांच्या एकूण जीवनचरित्रावर अनेक खंडात ग्रंथ निर्मिती झाली आहे तरी पण; त्यांच्यातील अष्टपैलूत्व व बहुआयामित्व यांना साद घालण्यावाचून सावरकर प्रेमीजनांना राहावत नाही. साम्राज्यवादी पाशवी ब्रिटिशांच्या जोखडातून मातृभूमीला स्वतंत्र करण्यासाठी; स्वतःच्या घरादारावर तुळशीपत्र ठेवून गृहस्थ जीवनाचा त्याग करणारे व अभिनव भारत सशस्त्र क्रांतिकारक चळवळ उभारणारे व त्यासाठी दोन दोन जन्मठेपेची शिक्षा झेलून अंदमान सेल्युलर जेलमध्ये काळ कोठडीत ब्रिटिशांचे अनन्वित अत्याचार सहन करत, काळाच्या कपाळावर स्वातंत्र्य देवतेचे काव्य काळ कोठडीच्या भिंतीवर स्वतःची नखे किंवा कोळशाने रेखाटून हृदयात कंठस्थ करणारे महान कवी या भूतलावावर अन्य कोणीही झाल्याचे ज्ञात नाही. सतत बारा तेरा वर्षे ब्रिटिशांच्या काळ कोठडीत तेल निर्मितीचे कोलू अमानुषपणे ओढत, स्वरूधीराचे पाणी करत व ब्रिटिशांनी फेकलेले निकृष्ट अन्न सेवन करून हाडांच्या काड्या झाल्या तरी कमला व सागरा प्राण तळमळलासारखे अंगावर शहारे आणणारे महाकाव्य रचना करणारे, ब्रिटिशांच्या तावडीतून सुटण्यासाठी मार्सेलिस बंदरावर जहाजाच्या पोर्टल होलमधून समुद्रात धाडसी उडी घेऊन भारतातील स्वातंत्र्य चळवळ जगभर पोहोचविणारे धाडसी वीर केवळ सावरकरच असू शकतात. अंदमान शिक्षा भोगून सुटल्यानंतर रत्नागिरीत स्थानबद्ध असताना प्रचंड मराठी वाङ्मय निर्मिती, हजारो स्फुटलेखन, नाटके, मराठी भाषाशुद्धी व समृद्धी, इंग्रजी भाषेतील अनेक लेख, जातिभेद अस्पृश्यता निवारण, सामाजिक चळवळ चालविणारे, बुद्धिवादी, विज्ञानवादी, छत्रपती शिवाजी महाराजांवर ''हे हिंदु नृसिंहा प्रभू शिवाजी राजा'' ही आरती रचून आयुष्यभर शिवाजी जगणारे जाज्वल्य राष्ट्रभक्त 'न भूतो न भविष्यती' असे असताना त्यांना अनेक जण राज्यघटना विरोधी ठरवितात.

यापूर्वीच्या सरकारांनी त्यांना भारतरत्न सर्वोच्च नागरी सन्मान देऊन जरी गौरविले नाही; तरी सध्याच्या भाजपप्रणीत भारत सरकारने त्यांना मरणोत्तर भारतरत्न सन्मान देऊन त्यांचा गौरव करावा ही करोडो सावरकरप्रेमींची इच्छा आहे. तिचा आदर भारत सरकारने करावा व स्वातंत्र्यवीर सावरकर या महामानवाच्या स्मृतीस खऱ्या अर्थाने अभिवादन करावे असे वाटते.

**ॲड. प्रकाश देशपांडे**/७०५८९७५३७६

वाचक पत्रे पाठविण्यासाठी ईमेल ॲड्रेस
tbedit2016@gmail.com
तसेच **कुठलाही लेख** पाठवायचा असल्यास **९८५०७५३२८१** या व्हॉट्स ॲप क्रमांकावर पाठवावा.

हे पत्र मुद्रक व प्रकाशक कुलभूषणराम रामकृष्ण तारे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय प्लॉट नं ए -३२,छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रियल को ऑफ सोसायटी रेल्वे स्टेशन रोड छत्रपती संभाजी नगर ४३१००५ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक सोलापूर तरुण भारत कार्यालय,छत्रपती संभाजीनगर येथे प्रकाशित करून छत्रपती संभाजीनगर, जालना,परभणी,नांदेड, हिंगोली ,बीड येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून वितरीत केले.
प्रबंध संपादक :विवेक घळसासी. मुख्य समुह संपादक : दिलीप यशवंत पेठे. मुख्य संपादक: प्रशांत वसंतराव माने, दूरध्वनी -८८८८४७२६८
RNI Reg.No 46878/87
stbaurangabad@gmail.com. www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# स्वा विनायक दामोदर सावरकर क्रांतीकारक व समाजसुधारक

भारताच्या स्वातंत्र्यलढ्यात अनेक थोर क्रांतीकारकांनी आपले योगदान दिले. त्यापैकी स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर हे अत्यंत तेजस्वी, धैर्यवान आणि बहुआयामी व्यक्तिमत्त्व होते. ते केवळ क्रांतीकारकच नव्हे तर एक महान समाजसुधारक, लेखक, कवी आणि विचारवंत होते. त्यांच्या कार्यामुळे भारतीय स्वातंत्र्यलढ्यास नवी दिशा मिळाली आणि समाजातही प्रबोधन झाले.

सावरकरांचा जन्म २८ मे १८८३ रोजी भगूर नाशिक जिल्हा येथे झाला. लहानपणापासूनच त्यांच्यात देशभक्तीची ज्वाला प्रज्वलित झाली होती. त्यांनी शिक्षण घेत असताना "मित्रमेला" आणि नंतर "अभिनव भारत" सारख्या संघटनांची स्थापना केली. या संघटनांद्वारे त्यांनी तरुणांमध्ये स्वातंत्र्याची जाणीव निर्माण केली.

जननी जन्मभूमिश्च स्वर्गादपि गरीयसी।": आई आणि मातृभूमी स्वर्गापेक्षा श्रेष्ठ आहेत.

क्रांतीकारक म्हणून सावरकरांचे कार्य अत्यंत महत्त्वाचे आहे. त्यांनी इंग्रजांविरुद्ध सशस्त्र संघर्षाचा पुरस्कार केला. त्यांनी लंडनमध्ये शिक्षण घेत असताना India House येथे राहून क्रांतीची बीजे पेरली. त्यांनी लिहिलेला "The Indian War of Independence १८५७" हा ग्रंथ अत्यंत प्रभावी होता. या ग्रंथात त्यांनी १८५७ च्या उठावाला 'पहिले स्वातंत्र्ययुद्ध' असे संबोधले, ज्यामुळे भारतीयांमध्ये स्वाभिमान जागृत झाला.

ने मजसी ने परत मातृभूमीला,
सागरा प्राण तळमळला।
भूच्या कणाकणांत माझे प्रेम,
रक्तात देशभक्ती दाटला॥

सावरकरांच्या क्रांतिकारक कार्यामुळे ब्रिटिश सरकारने त्यांना अटक केली आणि त्यांना Cellular Jail (अंदमानची सेल्युलर जेल) येथे जन्मठेपेची शिक्षा ठोठावली. या काळात त्यांनी अमानुष छळ सहन केला, परंतु त्यांचा निर्धार कधीही ढळला नाही. त्या कठोर परिस्थितीतही त्यांनी लेखनकार्य सुरू ठेवले आणि देशप्रेमाची ज्योत प्रज्वलित ठेवली.

जातीभेदाच्या भिंती तोडुनी,
समतेचा दीप त्यांनी पेटविला।
मानवतेचा संदेश देत,
नवा समाज त्यांनी घडविला॥

सावरकर हे केवळ क्रांतीकारक नव्हते, तर ते एक प्रखर समाजसुधारकही होते. त्यांनी जातिभेद, अस्पृश्यता आणि अंधश्रद्धांविरुद्ध लढा दिला. त्यांनी "पतितपावन मंदिर" स्थापून सर्व जातींच्या लोकांना मंदिरात प्रवेश दिला. त्या काळात हा अत्यंत धाडसी आणि क्रांतिकारक निर्णय होता. त्यांनी समाजात समता, बंधुता आणि राष्ट्रभक्तीचे मूल्य रुजवण्याचा प्रयत्न केला.

त्यांच्या विचारसरणीत राष्ट्रप्रेमाला सर्वोच्च स्थान होते. त्यांनी "हिंदुत्व" या संकल्पनेद्वारे सांस्कृतिक राष्ट्रवादाची मांडणी केली. त्यांच्या लेखनात राष्ट्रभक्ती, स्वाभिमान आणि आत्मनिर्भरतेचा संदेश दिसून येतो. ते एक उत्कृष्ट कवी आणि लेखक होते. त्यांच्या कवितांमध्ये देशभक्तीची प्रेरणा आणि उत्साह ओतप्रोत भरलेला आहे.

सावरकरांनी स्त्रीशिक्षण, विज्ञाननिष्ठ विचार आणि सामाजिक सुधारणा यांना प्रोत्साहन दिले. त्यांनी समाजातील जुन्या रूढी-परंपरांना आव्हान देत प्रगतिशील विचार मांडले. त्यामुळे ते आधुनिक विचारांचे समाजसुधारक म्हणून ओळखले जातात.

उद्यमेन हि सिद्ध्यन्ति कार्याणि न मनोरथैः।"

केवळ इच्छा करून नाही, तर प्रयत्नांनीच कार्य सिद्ध होतात. एकूणच, स्वातंत्र्यवीर सावरकर यांचे जीवन हे संघर्ष, त्याग आणि प्रेरणेचे प्रतीक आहे. त्यांनी देशाच्या स्वातंत्र्यासाठी आणि समाजाच्या उन्नतीसाठी आयुष्यभर कार्य केले. त्यांच्या कार्यातून आजही तरुणांना प्रेरणा मिळते. अशा महान क्रांतीकारक व समाजसुधारकाला जयंती दिनी कोटी-कोटी प्रणाम.

संकलक :- प्रा शशिकांत अरविंद पसारकर
स्वा सावरकर माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय बीड

# स्व. गोपीनाथराव मुंडे यांचा आदर्श डोळ्यांसमोर ठेवा : सुनील राणे

## भाजपा बीड जिल्ह्याचे दोन दिवसीय प्रशिक्षण शिबिर उत्साहात प्रारंभ

मुंबई/मिरा भाईंदर, प्रतिनिधी : पंडित दीनदयाळ उपाध्याय प्रशिक्षण अभियानांतर्गत भारतीय जनता पार्टी बीड जिल्ह्याचे दोन दिवसीय प्रशिक्षण शिबिर ठाणे जिल्ह्यातील मिरा भाईंदर येथील रामभाऊ म्हाळगी प्रबोधिनीच्या निसर्गरम्य परिसरात उत्साहपूर्ण वातावरणात प्रारंभ झाले. भाजपा बीड जिल्हा प्रभारी तथा आमदार सुनील राणे यांच्या हस्ते शिबिराचे उद्घाटन करण्यात आले.



यावेळी मार्गदर्शन करताना सुनील राणे म्हणाले, "स्वर्गीय गोपीनाथराव मुंडे यांचा चेहरा डोळ्यासमोर आणला तरी कार्यकर्ता कसा असावा, पक्षासाठी त्याग, संघर्ष आणि निष्ठेने काम कसे करावे याची प्रेरणा मिळते. भाजपा आज मोठा पक्ष झाला असला तरी त्यामागे मुंडे-महाजन जोडीचे अथक परिश्रम आहेत, हे विसरून चालणार नाही."

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ॲड. वाल्मिकराव निकाळजे होते. व्यासपीठावर जिल्हाध्यक्ष शंकरराव देशमुख, योगेश क्षीरसागर, राम कुलकर्णी, सर्जेराव तात्या तांदळे, नवनाथ आण्णा शिराळे आदी मान्यवर उपस्थित होते.

प्रास्ताविकात जिल्हाध्यक्ष शंकरराव देशमुख यांनी जिल्हा भाजपा संघटनेच्या कार्याचा आढावा घेत शिबिरासाठी अपेक्षित शंभर टक्के कार्यकर्ते उपस्थित राहिल्याबद्दल समाधान व्यक्त केले. तसेच हे शिबिर मा. ना. पंकजाताई मुंडे यांच्या मार्गदर्शनाखाली होत असल्याचे त्यांनी सांगितले.

स्व. गोपीनाथराव मुंडे यांच्यासोबत मुंबईत २५ वर्षे कार्य केलेल्या सुनील राणे यांनी आपल्या भाषणात अनेक आठवणींना उजाळा दिला. "राजकीय स्वार्थ बाजूला ठेवून सेवाभाव, वैचारिक निष्ठा आणि संघटन वाढीसाठी काम करणारा कार्यकर्ता पक्षाचा खरा आधार असतो," असे ते म्हणाले.

### जिल्हाध्यक्षांच्या नियोजनाचे कौतुक

महाराष्ट्र भाजपा प्रदेश संघटनेच्या वतीने राज्यभर जिल्हानिहाय प्रशिक्षण वर्ग सुरू आहेत. बीड जिल्ह्याचा वर्ग कुठे आयोजित करायचा याबाबत चर्चा सुरू असताना जिल्हाध्यक्ष शंकरराव देशमुख यांनी मिरा भाईंदर येथील रामभाऊ म्हाळगी प्रबोधिनीची निवड केली. मा. ना. पंकजाताई मुंडे आणि माजी खासदार डॉ. प्रीतमताई मुंडे यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित या शिबिरात कार्यकर्त्यांसाठी उत्कृष्ट निवास, वैचारिक वातावरण आणि शिस्तबद्ध नियोजन करण्यात आल्याने जिल्हाध्यक्षांच्या भूमिकेचे सर्व स्तरातून कौतुक होत आहे.

# खांबावर काम करताना शॉक लागून कामगाराचा दुर्देवी मृत्यू

## अंबाजोगाई च्या महावितरण मुख्य कार्यालयास निवेदन

अंबाजोगाई : विद्युत लाईन ओढताना अचानक पणे तारेमध्ये विद्युत प्रवाह सूरू होवून झालेल्या दुर्घटनेत एका कामगाराचा शॉक लागून मृत्यू झाल्याची घटना येथून जवळच असलेल्या लाडेवडगाव (ता.केज )येथे घडली असून, या प्रकरणी आज येथील महावितरण कार्यालयासमोर आंदोलन करण्यात आले.

थोडक्यात वृत्त असे की,खाजगी कंत्राटदाराच्या हस्ते लाडेवडगाव (ता.केज) येथे विद्युत खांबावर लाईन ओढण्याचे काम सूरू होते,दरम्यान अचानक पणे तारेमध्ये विद्युत प्रवाह सूरू होवून झालेल्या दुर्घटनेत संतोष सोनेराव निकम (रा. पोखरी ता.अंबाजोगाई जि बीड) नामक कागगाराचा शॉक लागून मृत्यू झाला. या घटनेचा निषेध करीत केज कृषी उत्पन्न बाजार समिती उपसभापती डॉ.वासुदेव नेहरकर,पोखरी गावचे सरपंच, मयताचे नातेवाईक यांनी अंबाजोगाई येथील महावितरण मुख्य कार्याकारी अभियंता कार्यालयास निवेदन देऊन सदरील प्रकरणी संबंधितांवर कारवाई करण्याची मागणी केली आहे.

# जयभवानीच्या कु.आयशा शेख हीची महाराष्ट्र पोलीस मध्ये निवड

## पालक शेख अन्सार यांचा महाविद्यालयात सत्कार



पाटोदा (प्रतिनिधी )दि. २६ मे :पाटोदा येथिल जय भवानी महाविद्यालयाची चुभंळी येथिल विद्यार्थीनी कु.शेख आयशा अन्सार हीची नुकतीस महाराष्ट्र पोलीस मध्ये निवड झाली आहे. कु. आयशा शेख ही हुशार व मेहनती विद्यार्थीनी होती. तिच्या निवडी बद्दल तिचे वडिल शेख अन्सार यांचा महाविद्यालयात प्राचार्य डॉ.विश्वास कदम यांच्या शुभहस्ते शाल पुष्पगुच्छ व श्रीफळ देवुन सत्कार करण्यात आला. या प्रसंगी प्राचार्य डॉ. विश्वास कदम यांनी कु. आयशा शेख व तिचे पालक यांचे अभिनंदन करून भविष्यासाठी शुभेच्छा! दिल्या या प्रसंगी ह.भ.प. अप्पासाहेब घुमरे, ॲड.नाईकनवरे,श्री.दत्ता पवार यांची विशेष उपस्थिती होती. या कार्यक्रमाचे संचलन प्रा.डॉ.अशोक देवगुडे यांनी केले तर आभार प्रा. बाळासाहेब जोशी यांनी मानले या प्रसंगी सर्व प्राध्यापक उपस्थित होते.

# शून्य मशागत तंत्रज्ञानाला चालना; शेतकऱ्यांनी लाभ घ्यावा : उपविभागीय कृषि अधिकारी गर्जे यांचे आवाहन



बीड, ( प्रतिनिधी ) दि. २७ मे २०२६ : बदलत्या हवामानामुळे निर्माण झालेली पर्जन्यमानातील अनिश्चितता, जमिनीतील ओलावा व सेंद्रिय कर्बातील घट, वाढता उत्पादन खर्च आणि पिकांच्या उत्पादकतेवरील परिणाम लक्षात घेता नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्पांतर्गत शून्य मशागत/कमीत कमी मशागत तंत्रज्ञानाचा अवलंब करण्यासाठी शेतकऱ्यांनी पुढे यावे, असे आवाहन उपविभागीय कृषि अधिकारी गर्जे यांनी केले आहे. या तंत्रज्ञानामुळे मृदा संवर्धन, पाणी कार्यक्षमता, जमिनीचे आरोग्य आणि शाश्वत उत्पादनवाढ साध्य होऊ शकते .

नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्पाच्या हवामान अनुकूल तंत्रज्ञान अभियानांतर्गत (CRT अभियान) शून्य मशागत तंत्रज्ञानाला विशेष प्रोत्साहन देण्यात येत असून, प्रत्येक प्रकल्प गावातील किमान ३० टक्के शेतकऱ्यांनी हे तंत्र अवलंबावे, असे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. या तंत्रज्ञानामुळे जमिनीची कमीत कमी ढवळाढवळ होते, सेंद्रिय कर्ब वाढतो, ओलावा टिकून राहतो, धूप कमी होते आणि पावसातील खंड किंवा अतिवृष्टी यांसारख्या परिस्थितीत पिके अधिक तग धरून राहतात.

या घटकांतर्गत प्रकल्प गावातील सर्व शेतकरी, शेतकरी गट, महिला बचत गट, शेतकरी उत्पादक कंपनीचे सदस्य, तसेच ग्राम कृषी विकास समितीशी संबंधित शेतकरी लाभासाठी पात्र आहेत . अनुदानाची कमाल मर्यादा रु. 5,000 प्रति हेक्टर प्रति दोन हंगाम, म्हणजे रु. 20,000 प्रति एकर, आणि जास्तीत जास्त रु. 25,000 प्रति लाभार्थी इतकी निश्चित करण्यात आली आहे .

शेतकऱ्यांनी अर्ज करण्यासाठी https://dbt-ndksp.mahapocra.gov.in/IndividualFarmer/Login या डीबीटी पोर्टलवर समूह सहाय्यकांच्या मदतीने नोंदणी करायची आहे, तसेच आवश्यक कागदपत्रे ऑनलाईन अपलोड करायची आहेत . खरीप २०२६ साठी अर्ज करण्याची अंतिम मुदत १५ जुलै २०२६, तर रबी २०२६ साठी १५ नोव्हेंबर २०२६ अशी आहे . मुदतीनंतर अर्जाची सुविधा बंद होणार असल्याने पात्र शेतकऱ्यांनी वेळेत अर्ज सादर करावेत, असेही आवाहन करण्यात आले आहे . शून्य मशागत तंत्रज्ञान राबविताना पहिल्या हंगामात रुंद वरंबे किंवा कोरडवाहू क्षेत्रात टोकण पद्धतीचा अवलंब करावा, तर पुढील हंगामात बेड न मोडता पुढील पिकाची लागवड करावी, अशी कार्यपद्धती मार्गदर्शक सूचनांमध्ये स्पष्ट केली आहे . काढणीवेळी पिके उपटून न काढता फक्त कापणी करणे, मुळे आणि धसकटे जमिनीतच ठेवणे, तसेच कोणत्याही परिस्थितीत नांगरणी, कुळवणी किंवा रोटाव्हेटरचा वापर टाळणे बंधनकारक आहे .

या उपक्रमात लाभार्थ्यांनी सहाय्यक कृषि अधिकारी किंवा समूह सहाय्यक यांच्या मार्गदर्शनानुसार पेरणीपूर्व तयारी, तण व्यवस्थापन, फोटोद्वारे नोंदी आणि आवश्यक हमीपत्रे सादर करणे अपेक्षित आहे. प्रकल्पामार्फत माती तपासणीचा खर्च भागविण्यात येणार असून, शून्य मशागतीमुळे जमिनीच्या आरोग्यावर होणारा परिणाम दरवर्षी तपासला जाणार आहे .

# केज रोटरीचे 'रोटरी सक्षम' व 'रोटरी आत्मनिर्भर' पुरस्कारांचे वितरण

केज/प्रतिनिधी : रोटरी क्लब ऑफ केजच्या वतीने यावर्षी घोषित 'केज रोटरी सक्षम' पुरस्कार रत्नमाला बलभीमराव क्षीरसागर यांना त्यांनी दिव्यांग असताना असंख्य संकटाना सामोरे जात शिक्षण, व्यवसाय व नोकरीची ध्येय गाठल्याबद्दल तर 'केज रोटरी आत्मनिर्भर पुरस्कार' अशोक बापूराव सिंगण यांना वडील बापूराव सिंगण यांच्या मार्गदर्शनाखाली त्यांच्या प्रचंड प्रयत्न, परिश्रम, जिद्द व आत्मविश्वासाने निर्माण केलेल्या व्यावसायिक यशाबद्दल प्रदान करण्यात आले.

रोटरी क्लब ऑफ केज च्या 'डिस्ट्रिक्ट गव्हर्नर भेटी दरम्यान डिस्ट्रिक्ट गव्हर्नर सुधीर लातुरे, असिस्टंट गव्हर्नर गिरीश कुलकर्णी, रोटरी क्लब ऑफ केजचे अध्यक्ष सत्यवान राऊत व सचिव प्रवीण देशपांडे आणि केज रोटरीचे संस्थापक अध्यक्ष हनुमंत भोसले यांच्या हस्ते पुरस्कार देण्यात आले.

रोटरी क्लब ऑफ केज च्या डीजी व्हिजिट च्या निमित्ताने विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी डिस्ट्रिक्ट गव्हर्नर सुधीर लातुरे यांनी क्लबला भावी वाटचालीसाठी सविस्तर मार्गदर्शन केले.

अध्यक्ष सत्यवान राऊत यांनी उपस्थितांचे स्वागत केले तर सचिव प्रवीण देशपांडे यांनी प्रास्ताविक केले.हनुमंत भोसले यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले. राष्ट्रगीताने कार्यक्रमाची कार्यक्रम सांगता झाली. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी माजी अध्यक्ष विकास मिरगणे, महेश जाजू, सूर्यकांत चवरे, दादाराव जमाले पाटील, बापूराव सिंगण, पुढील अध्यक्ष असरार कुरेशी, सदस्य संतोष पिलाजी, प्रा डॉ बीजे हिरवे, बापूराव वाळके इत्यादीने विशेष परिश्रम घेतले.

# भारतीय शेतीच्या नव्या पर्वाची चाहूल; गांधी, गोयल, अग्रवाल यांची महत्त्वपूर्ण बैठक

## कृषी, बँकिंग आणि वित्तीय क्षेत्र बळीराजाच्या उन्नतीसाठी एकत्र

परळी वैजनाथ (प्रतिनिधी) : भारताच्या अर्थव्यवस्थेचा कणा असलेला शेतकरी आजही अनेक आव्हानांशी झुंज देत आहे. उत्पादन वाढत असले तरी उत्पन्नाची हमी नाही, बाजारपेठेपर्यंत पोहोचण्याची मर्यादा आहे आणि शेतीकडे अजूनही अनेकदा केवळ उदरनिर्वाहाचे साधन म्हणूनच पाहिले जाते. मात्र आता या पारंपरिक चौकटी मोडून भारतीय शेतीला नव्या आर्थिक क्रांतीच्या केंद्रस्थानी आणण्याच्या दिशेने महत्त्वपूर्ण पावले उचलली जात आहेत. याच पार्श्वभूमीवर ग्लोबल विकास ट्रस्टचे संस्थापक अध्यक्ष जलनायक मयंक गांधी, भारतीय स्टेट बँकेचे (SBI) कृषी विभागाचे मुख्य महाव्यवस्थापक गोविंद नारायण गोयल आणि मोतीलाल ओसवाल समूहाचे अध्यक्ष रामदेव अग्रवाल यांच्यात एक अत्यंत महत्त्वपूर्ण बैठक नुकतीच संपन्न झाली. या बैठकीचा केंद्रबिंदू होता "भारतीय शेतकऱ्याला राष्ट्रउभारणीच्या केंद्रस्थानी आणणे".



गांधी, गोयल, अग्रवाल यांच्यात झालेली ही बैठक केवळ औपचारिक चर्चा नव्हती, तर भारताच्या ग्रामीण आणि कृषी अर्थव्यवस्थेला नवसंजीवनी देण्याच्या व्यापक दृष्टिकोनाची सुरुवात मानली जात आहे. या बैठकीनंतर ग्लोबल विकास ट्रस्टचे संस्थापक अध्यक्ष जलनायक मयंक गांधी म्हणाले की, तळागाळातील प्रत्यक्ष सामाजिक कार्य, संस्थात्मक बँकिंगची ताकद आणि देशातील वित्तीय बाजारपेठेचा अनुभव यांची सांगड घालत भारतीय शेतीला नव्या युगात नेण्याचा निर्धार या बैठकीतून व्यक्त करण्यात आला आहे. विशेष म्हणजे, या उपक्रमामागे "शेती म्हणजे फक्त उत्पादन नव्हे, तर राष्ट्र निर्मितीचे शक्तिशाली माध्यम" ही भूमिका स्पष्टपणे अधोरेखित करण्यात आली. आधुनिक वित्तीय नियोजन, बाजारपेठेतील गुंतवणूक, शाश्वत शेती पद्धती, मूल्यवर्धन आणि ग्रामीण उद्योजकता यांचा समन्वय साधून शेतकऱ्यांचे उत्पन्न अनेक पटींनी वाढविण्याचा रोडमॅप तयार करण्यावर भर देण्यात आला असल्याचेही त्यांनी सांगितले. आज भारताला सर्वाधिक गरज आहे ती ग्रामीण भाग आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्याची. कारण खऱ्या अर्थाने विकसित भारताचा मार्ग हा गावातून आणि शेतातूनच जातो. देशातील लाखो शेतकरी आत्मनिर्भर आणि आर्थिकदृष्ट्या सक्षम झाले, तर भारताचे आर्थिक सार्वभौमत्व अधिक बळकट होईल, असा विश्वास या बैठकीत व्यक्त करण्यात आला.

# सामर्थ्यसंपन्न हिंदूस्थानचे अग्रगण्य पुरस्कर्तेः स्वातंत्र्यवीर सावरकर

मनुष्यजातीची उत्पत्ती अस्तिक म्हणतात त्याप्रमाणे परमेश्वराने केलेली असो किंवा नास्तिक म्हणतात त्याप्रमाणे लक्षावधी वर्षांच्या उत्क्रांतीने झालेली असो, 'दात असलेले दात नसलेल्यांना खाऊन टाकतात' हे तत्वज्ञान सर्वकालिक सत्य असल्याचे दोघेही कबुल करतील. ज्यास आपले, आपल्या राष्ट्राचे अस्तिव टिकवावयाचे आहे त्याला दुर्बल राहून चालत नाहि. कलानुसार बदलणे आणि शक्तिची निरंतर ऊपासना या दोन गोष्टी राष्ट्राच्या अस्तित्वाकरता अपरिहार्य आहेत.

हिंदुस्थानचे भौगोलिक स्थान हे अशाप्रकारचे आहे की परकिय आक्रमकांनी विशेष अडचण न येता या देशावर आक्रमकांमागून आक्रमणे केली. इथल्या संस्कृतीचा विनाश करण्याचा प्रयत्न केला. स्वत:ची राज्ये स्थापली. अमेरिकेला जसे विशाल अटलांटीक महासागराचे नैसर्गीक संरक्षण लाभले तसे हिंदुस्थानला नाही. साध्या भाषेत सांगायचे तर हिंदुस्थान हा जगाच्या रहदारीवरचा प्रदेश. सार्वभौम राष्ट्र म्हणून जर हिंदुस्थानला टिकून रहायचे असेल तर प्रबळ सैनिकी सामर्थ्याला पर्याय नाही. कोणतेही राष्ट्र शतकानुशकते युध्दमान अवस्थेत राहु शकत नाही ही गोष्ट खरी आहे पण कोणतेही राष्ट्र तसे शांततेतही राहू शकत नाही हेही तितकेच खरे आहे. आपण युध्द करणार नाही म्हणजे युध्द होणार नाही असे थोडीच आहे. चर्चिल एके ठिकाणी म्हणतात, "सैनिकी बळाची आणि अस्त्राची उपासना ही शांततेच्या यत्रिकाला नितांत आवश्यक आहेत." असो.

ज्या भारतीय नेत्यांनी हिंदुस्थानच्या शस्त्रसज्जतेला फार महत्व दिले त्यात स्वातंत्र्यवीर सावरकरांचे नाव सदैव आग्रभागी राहिल. हिंदुस्थान स्वतंत्र असता आणि सावरकर सैनिकी पेशाचे असते तर त्यांची गणना जनरल गुडेरीन, जनरल रोमेल किंवा जनरल मॅकार्थर या तोडीच्या सेनापतींच्या रांगेत झाली असती अशा प्रकारची त्यांची तल्लख बुध्दीमत्ता, जिद्द आणि चातुर्य होते.

स्वातंत्र्यवीर सावकरांच्या कार्यकाळात दोन जागतिक युध्दे झाली. 1914 ते 18 असे पहिले महायुध्द तर 1939 ते 45 असे दुसरे महायुद्ध. युरोपात पाहिले महायुध्द नोव्हेंबर 1914 मध्ये भडकले. त्यावेळी स्वातंत्र्यवीर सावरकर अंदमानात काळ्या पाण्याची शिक्षा भोगत होते. युध्दाच्या या सोनेरी संधीचा स्वदेश स्वातंत्र्यासाठी उपयोग करुन घेण्यास ते मोकळे नव्हते. हिंदुस्थान हे ब्रिटीश साम्राज्याचा भाग असल्याने ब्रिटनच्या प्रत्येक युध्दात हिंदुस्थान आपोआप समिल होत असे. पहिल्या महायुद्धात ब्रिटीश सैन्यात भरती होऊन हजारो हिंदी तरुणांनी पश्चिम अशिया समवेत युरोपातली रणांगणे गाजवल्याचे सावरकरांना तुरुंगात समजले. 1915 सालच्या मार्चमध्ये तुरुंगातून लिहिलेल्या एका पत्रात स्वातंत्र्यवीर सावरकर आनंदाने म्हणतात, " जगातील सर्वश्रेष्ठ सैनिक सत्तेशी युध्द करण्यास हजारो हिंदी सैनिकांना युरोपच्या रणभूमीवर जाण्याची संधी मिळाली. तेथे त्यांनी आपली कामे उत्कृष्ट बजावली आणि लढवय्ये म्हणून मोठी किर्ती गाजवली. हे ऐकून मला आनंदाचे भरते आले. देवाची कृपा! हिंदुस्थानातून एकंदरीत अद्यापि पुरुषार्थ नाहीसे झाले नाही तर!" पहिल्या महायुध्दाच्या वेळी महात्मा गांधीनीही संपुर्ण हिंदुस्थानात मोठ्या प्रमाणावर सैनिक भरतीचा प्रचार केला होता ही गोष्ट लक्षात घेण्यासारखी आहे. लोकमान्यांनीही सारकारच्या सैनिकीकरणाच्या धोरणाला सशर्त पाठींबा देऊ केला होता.

पुढे 24 फेब्रुवारी 1920 येथे केंद्रीय कायदेमंडळात सरदार पटेलांचे थोरले बंधु विठ्ठलभाई पटेल यांनी ठराव मांडून सावरकर बंधुंच्या सुटकेची मागणी केली. लोकमान्य टिळकांनीही भारमंत्री मॉनटेग्यु यांना पत्र लिहून सावरकरांच्या सुटकेची मागणी केली. महात्मा गांधीनीही सावरकरांच्या सुटकेच्या मागणीचे समर्थन करताना यंग इंडिया मध्ये लिहले, 'सावरकर बंधुंनी कोणतही हिंसक कृत्य केल्याचा आरोप सिध्द झालेला नाही. सध्याच्या घटकेला हिंसक पंथाला हिंदुस्थानात कोणी अनूयायी उरले नाही. त्यांना बंधमुक्त करणे व्हाईसरॉयचे कर्तव्य आहे.' या सर्वांचा परिणाम होऊन 2 मे 1921 या दिवशी अंदमानातून सावरकर बंधूंची सुटका झाली. तेथून अलिपूर, साबरमती, रत्नागिरी आणि शेवटी पुण्याच्या येवरडा कारागृहात स्वातंत्र्यवीर सावरकरांची रवानगी झाली. काही काळाने सावरकरांच्या संपुर्ण मुक्ततेसाठी फिरुन चळवळ सुरु झाली. विशेष म्हणजे 1923 च्या काकीनाडा येथे भरलेल्या काँग्रेसच्या अधिवेशनात सावरकरांच्या मुक्ततेची मागणी करणारा ठराव संमत करण्यात आला. 6 जानेवारी 1924 ला सावरकरांची 'रत्नागिरीच्या सिमीत क्षेत्रातच वावर करीन' या अटीवर मुक्तता केली गेली. सावरकर कोणत्याही राजकारणात भाग घेणार नाहीत अशी त्यांना घातलेल्या अटीमध्ये महत्वाची अट होती.



युरोपात 1939 मधे दुसऱ्या महायुध्दास सुरुवात होईपर्यंत ब्रिटन कोणत्याही युध्दात गुंतले नव्हते. 1933 च्या जानेवारी महिन्यात हिटरलने जर्मनीत सत्ता काबीज केली आणि 1938 मध्ये युरोपावर फिरुन महायुध्दाचे ढग जमू लागले. जर्मनी विरुध्द ब्रिटन-फ्रान्स फिरून युध्द पेटणार याची सर्वांचीच खात्री पटली होती. युरोपात दुसरे महायुध्द 3 सप्टेंबर 1939 या दिवशी सुरु झाले. ब्रिटीश साम्राज्याचा भाग म्हणून आपोआप हिंदुस्थानही युध्दमान राष्ट्र झाले. युध्दात ज्याचे संख्याबळ जास्त त्याचे पारडे जड ही गोष्ट उघड आहे आणि हे संख्याबळ ब्रिटनला हिंदुस्थानातून मिळणार नाही तर कोठून मिळणार होते? हि संधी साधुन सावरकरांनी आपले लक्ष हिंदूच्या सैनिकीकरणावर केंद्रीत केले. आपली भुमिका निसंकोचपणे मांडताना सावरकर उघडपणे म्हणाले, "अपरिहार्य परिस्थितीत ब्रिटीश सरकार तुमच्या हाती शस्त्र देत आहे. एक काळ असा होत की, एखाद्या तरुणापाशी पिस्तुल सापडले तर त्या अपराधासाठी त्याला तुरुंगाच्या कोठडीत सडत पिचत रहावे लागत होते. या संधीचा फायदा घेऊन प्रशिक्षित सैनिक आणि सेनानी बना. सुध्दसाहित्य तयार करण्याचे तंत्रज्ञान हस्तगत करा. सैन्यात शिरणारे आपले तरुण हे ब्रिटीशांचे केवळ पगारी नोकरी आहेत असे आज दिसत आहे, ही गोष्ट खरी आहे. परंतु ज्यावेळी मोक्याचा आणि आणिबाणीचा प्रसंग येईल. त्यावेळी हे तरुण खरे देशभक्त आणि कट्टर हिंदु असल्याचे सिध्द होईल. सैन्यात शिरा, बंदुका वापरण्यास शिका आणि त्याच बंदुका स्वातंत्र्याच्या कामासाठी दुसऱ्या दिशेला फिरवा." हिंदुच्या सैनिकीकरणाचा इतका प्रभावी प्रचार स्वातंत्र्यवीर सावरकरांइतका क्वचितच दुसऱ्या कोणाने केला असावा. त्यात सावरकरांची दुरदृष्टी ही होती आणि चातुर्यही होते. 1948 मध्ये स्वातंत्र्य इस्राईल राष्ट्राची निर्मिती झाली आणि लगेचच या नवजात राष्ट्राच्या नरडीला नख लावण्यासाठी अरबांच्या फौजांनी चारी दिशांनी इस्राईल वर आक्रमण केले. या लढाईत अरबांचा पार धुव्वा उडवला तो दुसऱ्या महायुध्दातून मोकळ्या झालेल्या ज्यु सैनिकांनीच! सावरकरांच्या अचूक दुरदृष्टीचा आणखीन कोणता मोठा पुरावा देता येईल? असो.

पुढे 1945 मध्ये जर्मनी- जपानचा पराभव होऊन दुसरे महायुध्द संपले. महायध्दामुळे दुर्बळ झालेल्या ब्रिटनला आपल्या वसाहती राखणे शक्य नव्हते. हिंदुस्थान स्वतंत्र झाला पण तो त्रिखंडीत होऊन! हिंदुद्वेषाने माथे फिरलेल्या मुस्लिम लिगच्या शस्त्रधारी गुंडांनी दंगली करून भारताच्या पूर्वेला आणि वायव्येला हिंदुस्थानचे तुकडे करुन वेगळ्या ईस्लामी राज्याची स्थापना केली. पुढे 1949 मध्ये कम्युनिस्टांनी चीन मध्ये बंदुकीच्या नळीतून सत्ता काबीज केली. कम्यूनिझम अर्थात साम्यवादाची व्याख्या करताना माओ म्हणतो, 'साम्यवाद हा काही प्रेमाचा संदेश नव्हे. साम्यवाद हा शत्रुची डोकी मारण्यासाठी वापरला जणारा आमचा हाथोडा आहे.' चीनी कम्युनिस्ट काय आणि भारताच्या वायव्य सरहद्दीवरचे धर्मवेडे काय दोघांच्या तत्वज्ञानात कोणतेही साम्य नसले तरी हिंदुस्थानच्या द्वेषाच्या समान धाग्यातून ते एकमेकांशी बांधले गेले. भविष्यात या दोन्ही शत्रुंच्या संयुक्त शक्तिशी हिंदुस्थानचा संघर्ष उडणार याची सावरकरांना खात्री होती आणि म्हणून उद्या असा संघर्ष उडाला तर हिंदुस्थानने आपल्या संपुर्ण सामर्थ्याने तेथे उपस्थित असले पाहिजे अशी सावरकरांची व्यवहारी भुमिका होती. हिंदूस्थानने अण्वस्त्रधारी असण्याची गरज स्पष्ट करताना सावरकर म्हणतात, 'स्वत: दुर्बळ असताना चीन किंवा रशियाशी राजकीय स्नेह ठेवून काहीही उपयोगाचे नाही. आपले सैनिकी सामर्थ्य वाढावे आणि भारतीय लढाऊ दले आधुनिक नि अद्ययावत शस्त्रस्त्रांनी सुसज्ज असावीत या गोष्टीकडे आपण अविलंबाने परिपूर्ण लक्ष पुरवले पाहिजे. या इतर राष्ट्रांप्रमाणे आपणही अण्वस्त्रे निर्माण करण्याचे सामर्थ्य मिळवले पाहिजे. सिकियांग नि इतर ठिकाणी अण्वस्त्र निर्मितीची केंद्रे उभारणे जर चीनला शक्य होऊ शकते तर आपणालाही ते शक्य झाले पाहिजे. वस्तुत: ते मुळीच कठिण नाही. आमचे वैज्ञानिक आमच्या प्रयोगशाळांमध्ये एक दोन वर्षांच्या अवधीत अशा अस्त्र निर्मितीचे शोध लावू शकतील. एवढेच काय पण ते क्वचित इतरांहुन अधिक संहारक अस्त्रे निर्माण करु शकतील. उच्च तत्वांना प्रबळ शस्त्र सामर्थ्यांची जोड असली तरच त्या तत्वांचे पालन घडवून आणणे शक्य असते.'

'जग जसे तुमच्याशी वागेल तसे तुम्ही त्यांच्याशी वागा' ही लोकमान्यांची भुमिका सावरकर 'जोपर्यंत सारे जग आक्रमण आहे तोपर्यंत भारतानेही आक्रमक असणे आवश्य आहे.' अशा वेगळया शब्दांत पुढे होऊन जाताना दिसतात. चाहुबाजूनी शत्रु राष्ट्रांकडून घेरला जाऊनही ईस्त्राईलने आतापर्यंत आपले स्वातंत्र्य टिकवून ठेवले ते शस्त्रांस्त्रांची उपासना केल्यामुळेच नव्हे का? हिंदुस्थानतही इस्त्राईल प्रमाणे सैनिकी प्रशिक्षण देण्या-या शाळा तरुणांनी गजबजल्या पाहिजे हे सावरकरांचे स्वप्न होते.

हिटलर, स्टालीन, मुसोलिनी यांसारख्या हुकुमशहांप्रमाणे स्वातंत्र्यवीर सावरकरांना रक्तपाताचे आकर्षण मुळीच नव्हते. अत्यंतिक हिंसेलादेखील सावरकर पाप मानत. अहिंसा हि हिंदू तत्वज्ञानाने जगाला दिलेली अनमोल देणगी असल्याची जणीव त्यांना होती. महात्मा गांधींनाही शुरांची अहिंसा अभिप्रेत आहे, भ्याडांची नव्हे!

सावरकर शक्तीचे ऊपासक होते. दुस-या कोणावर आक्रमणासाठी म्हणून नव्हे तर आपले स्वातंत्र्य टिकवण्यासाठी आणि कोणत्याही परकिय आक्रमणाला तोंड देण्यास आधुनिक शस्त्र अस्त्रांनी हिंदुस्तानने सदैव सज्ज असायला हवे ही त्यांची जॉर्ज वॉशिंगटनसारखी प्रामाणिक भुमिका होती. हिन्दुस्तानवर लष्करी राजवट असावी किंवा एखाद्या लष्करशहाने हिंदुस्तान चालवावा असे प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षपणेही त्यांनी आपल्या भाषणांतून, पत्रांमधुन किंवा लेखणीतून कधीही सुचवले नाही.'एक व्यक्ती एका मत आणि गुणवत्तेनुसार नोकऱ्या' या लोकशाहीच्या मुलभूत तत्वावर त्यांची नितांत श्रद्धा होती.

संकुचीत, आक्रमक आणि दुष्ट बुद्धीच्या शेजा-यांचा सहवास लाभल्याने हिंदुस्थानने लष्करी सामर्थ्यात कोठेही कमी असता कामा नये हा त्यांचा रास्त आग्रह होता.

- महेश पारेकर
9021980300

उपविभागीय कार्यालय : आदर्श नगर, गणपती मंदिराजवळ, पांगरी रोड, बीड. मो. 9403264930, ई-मेल - jagannathdeshmukh2020@gmail.com

# मतदार याद्यांच्या विशेष पुनरिक्षण मोहीमेत सक्रीय सहभाग नोंदवावा

## जिल्हाधिकारी गुप्ता यांचे राजकीय पक्षाच्या आढावा बैठकीत आवाहन




**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २७ मे**

राज्यात सध्या मतदारांच्या नोंदींची जुळवणी करण्याचे काम सुरू असून मतदार याद्या अधिक अचूक, पारदर्शक व दोषविरहित करण्यासाठी सर्व राजकीय पक्षांनी तसेच सर्व पात्र मतदारांनीही या विशेष सखोल पुनरिक्षण मोहिमेत सक्रिय सहभाग नोंदवावा, असे आवाहन जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांनी राजकीय पक्षाच्या आढावा बैठकीत केले.

भारत निवडणूक आयोगामार्फत संपूर्ण देशात मतदार याद्यांचे विशेष सखोल पुनरिक्षण अभियान राबविण्यात येत असून, तिसऱ्या टप्प्यात महाराष्ट्र राज्याचा समावेश करण्यात आला आहे. या पार्श्वभूमीवर जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी राहुल गुप्ता यांच्या अध्यक्षतेखाली आज राजकीय पक्षांच्या प्रतिनिधींची आढावा बैठक आयोजित करण्यात आली. या बैठकीस उपजिल्हा निवडणूक अधिकारी प्रगती चोंडेकर यांच्यासह विविध राजकीय पक्षांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

यावेळी जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांनी सांगितले की, राज्यात सध्या मतदारांच्या नोंदींची जुळवणी करण्याचे काम सुरू असून आतापर्यंत ७२.०४ टक्के मॅपिंग पूर्ण झाले आहे. मतदार याद्या अधिक अचूक, पारदर्शक व दोषविरहित करण्यासाठी सर्व राजकीय पक्षांनी प्रत्येक मतदान केंद्रावर मतदान केंद्रस्तरीय प्रतिनिधी (बीएलए) नियुक्त करावेत. तसेच सर्व राजकीय पक्षांनी तसेच नागरिकांनी या मोहिमेस सहकार्य करावे, असे आवाहनही जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांनी यावेळी केले.

राज्यात सुरू असलेल्या जनगणना कामाचा विचार करून महाराष्ट्रासाठी विशेष वेळापत्रक निश्चित करण्यात आले आहे. त्यानुसार दि. २० ते २९ जून २०२६ या कालावधीत गणना अर्जांची छपाई व बीएलओ प्रशिक्षण आयोजित करण्यात येणार आहे. दि. ३० जून ते २९ जुलै २०२६ या कालावधीत बीएलओमार्फत घरभेटी देऊन गणना प्रपत्रांचे वाटप व संकलन करण्यात येईल. दि. ५ ऑगस्ट २०२६ रोजी प्रारूप मतदार याद्या प्रसिद्ध करण्यात येणार असून, दि. ५ ऑगस्ट ते ४ सप्टेंबर २०२६ या कालावधीत दावे व हरकती स्वीकारण्यात येतील. त्यावरील निर्णय दि. ३ ऑक्टोबर २०२६ पर्यंत घेण्यात येऊन अंतिम मतदार याद्या दि. ७ ऑक्टोबर २०२६ रोजी प्रसिद्ध करण्यात येणार आहेत, अशी माहितीही जिल्हाधिकारी गुप्ता यांनी यावेळी दिली.

# नोकरीचे आमिष दाखवून ६.२१ लाखांची फसवणूक, गुन्हा दाखल

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २७ मे**

हिंगोली पंचायत समितीमध्ये आऊटसोर्सिंगमधून नोकरी लावण्याचे आमिष दाखवून ६.२१ लाख रूपयांची फसवणूक करणाऱ्या नागपूर येथील दोघांवर हिंगोली शहर पोलिस ठाण्यात मंगळवारी रात्री उशिरा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहीतीनुसार हिंगोली शहरातील संगणक प्रशिक्षक केंद्र चालक शहर मोहारे यांची दोन वर्षापूर्वी नागपूर येथील अॅडराईट मॅनेजमेंट सर्व्हिसेसचे विरेंद्र वाटकर व जगदीश राऊत यांच्याशी बस स्थानकावर भेट झाली होती. दोघांची चर्चा झाल्यानंतर त्यांनी मोहारे यांना आऊटसोर्सिंगच्या माध्यमातून जागा निघालेल्या असून त्यासाठी कोणी ओळखीचे असेल तर सांगा लगेच रूजू होण्याचे आदेश देतो असे सांगितले.

यावेळी मोहारे यांनी त्यांचा मुलगा व इतर दोघांसाठी विचारणा केली असता त्यांना हिंगोली पंचायत समितीमध्येच रोजगार हमी योजनेमध्ये टंकलेखक, पर्यवेखक व अन्य एक अशा तीन जागांवर नियुक्ती देण्याचे आमिष दाखविले. त्यासाठी पैसे लागतील असे सांगितले. त्यानंतर मोहारे यांनी दि ३१ मार्च २०२४ ते २० ऑक्टोबर २०२४ या कालावधीत ऑनलाईन पैसे देखील पाठविले.

दरम्यान, पैसे देऊनही नियुक्तीचे आदेश मिळालेच नाही. त्यामुळे मोहारे यांनी विरेंद्र व जगदीश यांच्याशी संपर्क साधून आदेशाची मागणी केली. मात्र लवकरच आदेश मिळतील असे सांगत त्यांनी एक वर्षभर आदेशच दिले नाहीत. त्यानंतर आपली फसवणूक झाल्याचे लक्षात आल्यानंतर मोहारे यांनी पैशाची मागणी केली. तर त्यांनी पैसे देण्यासही टाळाटाळ चालविली होती. अखेर मोहारे यांनी फसवणूक झाल्याचे लक्षात आल्यानंतर मंगळवारी हिंगोली शहर पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली आहे. या तक्रारीवरून शहर पोलिसांनी विरेंद्र वाटकर व जगदीश राऊत यांच्या विरूध्द फसवणूकीचा गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास पोलिस निरीक्षक संदीप मोदे, सहाय्यक पोलिस निरीक्षक आनंद बनसोडे, सपो उपनिरीक्षक संजय मार्के, जमादार अशोक धामणे हे करीत आहेत.

# औंढा नागनाथ येथे काँग्रेस पक्षाची आढावा बैठक

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २७ मे**



औंढा तालुका काँग्रेस कमिटीच्या वतीने बुधवारी (ता.२७) मे रोजी सकाळी ११ वाजता काँग्रेस पक्षाच्या बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. काँग्रेसचे नवनिर्वाचित जिल्हाध्यक्ष डॉ.सतीश पाचपुते यांच्या अध्यक्षतेखाली बैठक घेण्यात आली. प्रथमतः पुण्यश्लोक राजमाता अहिल्यादेवी होळकर यांच्या पूर्णाकृती पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

यावेळी औंढा तालुका काँग्रेस कमिटीच्या वतीने काँग्रेसचे नवनिर्वाचित जिल्हाध्यक्ष डॉ सतीश पाचपुते यांचा पुष्पहार घालून सत्कार करण्यात आला.

काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष पाचपुते म्हणाले, या सरकारमध्ये गॅस, डिझेल व पेट्रोलच्या दरामध्ये मोठी वाढ झाली आहे .तसेच या विरोधामध्ये औंढा तालुक्यात मोठे आंदोलन उभारण्यात येणार आहे. तसेच शक्तीपीठ महामार्ग होऊ देणार नाही. यासह विविध मुद्द्यावर बैठकीत चर्चा झाली व पदाधिकाऱ्याच्या समस्या ही जाणून घेण्यात आल्या. तसेच औंढा तालुक्यातील बोरजा ते दुधाळा या भागातून लीगो प्रकल्पाकडे जाणाऱ्या रस्त्याचा मोबदला त्या शेतकऱ्यांना मिळाला पाहिजे यासाठी देखील काँग्रेस पक्ष शेतकऱ्यांच्या पाठीशी खंबीर उभा आहे. तसेच येत्या काळामध्ये औंढा नागनाथ तालुकाध्यक्ष व पदाधिकारी यांची बैठक घेऊन त्यामध्ये शहर अध्यक्षाची देखील निवड करण्यात येणार आहे. सर्व कार्यकर्त्यांनी काँग्रेसचे जोमाने काम करायचे आहे. येत्या काळामध्ये तालुक्यात व जिल्ह्याभरात काँग्रेस पक्ष वाढला पाहिजे. या बैठकीस काँग्रेसचे ज्येष्ठ कार्यकर्ते माणिकराव पाटील, काँग्रेसचे प्रदेश सरचिटणीस प्रा. साहेबराव देवकते, काँग्रेस जिल्हा सरचिटणीस किसनराव जुमडे, जिल्हा सरचिटणीस नंदू पाटील, तालुकाध्यक्ष अॅड. प्रदीप पोले, माजी नगरसेवक शकील अहमद, भास्करराव पोले, अॅड मेहराज शेख, सौरभ जावळे, गजानन पोले, हरिहर पोले, गजानन हाके, रशिद कुरेशी, जुल्फेखार इनामदार यांच्यासह काँग्रेस तालुका कमिटीचे पदाधिकारी व कार्यकर्ते या बैठकीस उपस्थित होते. बैठकीची प्रस्तावना व सूत्रसंचालन अॅड प्रदीप पोले तर आभार नंदू पाटील यांनी मानले.

# कयाधू नदी पात्रातून पाच लाख घनमीटर गाळ काढण्यास सुरूवात



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २७ मे**

हिंगोली जिल्ह्याची जीवनदायीनी म्हणून ओळख असलेल्या कयाधू नदीच्या रूंदीकरण व खोलीकरणाचे काम मृद व जलसंधारण विभागाच्यावतीने हाती घेण्यात आले असून नदीपात्रातून तब्बल ५ लाख घनमीटर गाळ काढण्याचे प्रयत्न आहेत. यातून तब्बल ५० कोटी लिटर पाणीसाठा होणार आहे. त्यामुळे परिसरातील शेती सिंचनासोबत भूगर्भातील पाणी पातळी वाढण्यास मदत होणार आहे.

हिंगोली जिल्ह्यातून वाहणाऱ्या कयाधू नदीचे पात्र उथळ व अरूंद असल्यामुळे नदीमध्ये पावसाचे पाणी पडल्यानंतर वाहून जाते. त्यामुळे पावसाळ्यानंतर नोव्हेंबर व डिसेंबर महिन्यापासूनच नदीचे पाणी कमी होण्यास सुरूवात होते. तर जानेवारी महिन्यात नदी कोरडीठाक पडते. नदीचे पाणी आटल्यामुळे त्याचा परिणाम भूगर्भातील पाणीपातळीवर होत असून नदी असूनही परिसरातील भूगर्भातील पाणी पातळी खोल जात असल्याने शेतकऱ्यांना सिंचनासाठी विंधन विहीरीचा उपयोग होत नाही.

कयाधू नदीवर बंधारे घेण्याची मागणी सातत्याने होऊ लागली आहे. त्यानुसार शासकीय पातळीवर हालचाली देखील सुरू आहेत. तर दुसरीकडे हिंगोली शहरालगत तीन किमी अंतरापर्यंत नदीचे पात्र रूंद व खोल करण्याचा निर्णय जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांनी घेतला आहे. त्यानुसार मृद व जलसंधारण विभागाचे अभियंता व्ही एन निर्वळ यांच्यासह अधिकाऱ्यांनी नदी पात्राला भेट देऊन पाहणी केली. त्यानंतर गाळमुक्त धरण, गाळयुक्त शिवार योजनेतून नदीतील गाळ काढणे व खोलीकरण करण्यचे काम करण्याचे ठरविण्यात आले. या कामाला सध्या गतीने सुरूवात करण्यात आली आहे. सहा जेसीबी द्वारे गाळ काढला जात आहे. तसेच नदीपात्राचे एक ते दोन मीटरपर्यंत खोलीकरण करण्यात येत आहे.

पाऊस सुरू होईपर्यंत हे काम सुरू राहणार सून २१ जून पर्यंत ५ लाख घनमीटर गाळ काढण्याचे उद्दीष्ट आहे. त्यानुसार युध्दपातळीवर काम करण्यात येत आहे. गाळ काढणे व खोलीकरणामुळे नदीमध्ये पावसाळ्यात पाणीसाठा वाढणार असून हा पाणीसाठा जानेवारीपर्यंत कायम राहील अशी अपेक्षा व्यक्त करण्यात येत आहे. मृद व जलसंधारण विभागाचे अभियंता व्ही एन निर्वळ यांनी सांगितले की, नदीपात्राचे सुमारे तीन किलो मीटरचे पात्र रूंद करून खोलीकरण केले जाणार आहे. नदीतून वाळू उपसा केला जाणार नसून केवळ गाळ उपसा केला जात आहे. शेतकऱ्यांनी गाळ नेऊन शेतात टाकल्यास जमीन सुपीक होण्यास मदत होणार आहे.

## संक्षिप्त वृत्त

### औंढ्यात अवकाळी पावसाची हजेरी



हिंगोली- औंढा तालुक्यात दोन दिवसापासून वातावरण बदलले असून उकाड्यात प्रचंड वाढ झाली आहे.शनीवारी २३ मे रोजी अवकाळी पावसाने दुपारी चारच्या दरम्यान हजेरी लावली आहे. दुपारी जोरदार पावसाने कहरच केला. वादळी वाऱ्यासह झालेल्या पावसाने शेतात वाळू घातलेली हळद भिजली, टाळके ज्वारी व भुईमूग पिकांना फटका बसला. काही भागात काढणीला आलेली ज्वारी भुईसपाट झाली तर हळद, भुईमूग व कांद्याचे नुकसान झाले. पालेभाज्यासह फळबागांनाही पावसाचा फटका बसला. ढगाळ वातावरणाने उकाड्यात प्रचंड वाढ झाली असताना दुसरीकडे वीजपुरवठा खंडित झाल्याने नागरिक हैराण झाले. दररोज ढगाळ वातावरण होऊन उकाडा वाढला. औंढा शहरातील रस्ते जलमय झाले. रस्त्याच्या साईडला पावसाळ्यापूर्वी नाल्या काढून देण्याची मागणी नागरिक करत आहेत.

# घनकचरा व्यवस्थापन नियम २०२६ ची प्रभावी अंमलबजावणी करा

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २७ मे**

सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार घनकचरा व्यवस्थापन नियम २०२६ ची प्रभावी अंमलबजावणी करण्याच्या सूचना दिल्या. मोठ्या प्रमाणावर कचरा निर्माण करणाऱ्या घटकांची माहिती संकलित करावी. नगर परिषद तसेच ग्रामीण भागातील कचरा साठवणुकीच्या जागा निश्चित कराव्यात. कचरा निर्मितीची कारणे व प्रमाण जाणून घेण्यासाठी घरोघरी जाऊन सर्वेक्षण करावे, असे निर्देश जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांनी बैठकीत दिले.



जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांच्या अध्यक्षतेखाली आज घनकचरा व्यवस्थापन नियम २०२६ च्या प्रभावी अंमलबजावणीसंदर्भात आढावा बैठक आयोजित करण्यात आली. या बैठकीस जिल्हा परिषदेच्या पाणी पुरवठा व स्वच्छता विभागाच्या उपमुख्य कार्यकारी अधिकारी समृद्धी दिवाणे, हिंगोली नगर परिषदेचे मुख्याधिकारी अरविंद मुंडे यांच्यासह जिल्ह्यातील सर्व नगर परिषद व नगर पंचायतींचे मुख्याधिकारी उपस्थित होते.

यावेळी जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांनी गावातील घाण पाण्याचे योग्य नियोजन करण्यासाठी शोषखड्ड्याची निर्मिती करावी. कचरा साठवणुकीच्या संवेदनशील जागांची नोंद घेऊन त्या ठिकाणी विशेष उपाययोजना राबवाव्यात. याबाबत प्रत्येकाची जबाबदारी निश्चित करावी. कचऱ्याचे योग्य वर्गीकरण व्हावे यासाठी प्रत्येक नागरिकांना वार्डनिहाय प्रशिक्षण देण्यात यावे. या सर्व कामांची अद्यावत माहिती शुक्रवारपर्यंत सादर करण्याच्या सूचना जिल्हाधिकारी श्री. गुप्ता यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिल्या.

भाजी मार्केट परिसरातील स्वच्छतेकडे विशेष लक्ष द्यावे. तसेच सार्वजनिक ठिकाणांवरील अतिक्रमणे हटविण्यासाठी आवश्यक कार्यवाही करावी, असेही निर्देश जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांनी यावेळी दिले.



**हिंगोली- येथील जिल्हा परिषद बहुविध प्रशालेतील मतदान केंद्रावर हिंगोली तालुका सहकारी खरेदी-विक्री संघाच्या निवडणुकीसाठी बुधवारी सदस्यांनी मतदानाचा हक्क बजावला. छाया- विजय गुंडेकर**

# हिंगोलीतील जुन्या पोलिस वसाहतीचा होतोय कायापालट, शहराच्या वैभवात भर

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २७ मे**

शहराच्या वैभवात आणि आधुनिकतेत भर घालणाऱ्या एका भव्य गृहनिर्माण प्रकल्पाचे काम आता अंतिम टप्प्यात आले आहे. येथील संत नामदेव पोलीस कवायत मैदान परिसराच्या बाजूला असलेल्या जुन्या पोलीस वसाहतीचा पूर्णपणे कायापालट करण्यात आला असून, त्या ठिकाणी पोलीस कर्मचाऱ्यांसाठी अत्यंत आधुनिक आणि सुसज्ज अशा बहुमजली (टोलजंग) इमारतीचे बांधकाम पूर्णत्वाकडे आले आहे. या नव्या इमारतींमुळे पोलीस बांधवांच्या हक्काच्या आणि दर्जेदार निवासाचा प्रश्न कायमचा मिटणार असून, त्यांना सर्व सोयी-सुविधांनी युक्त अशा हक्काच्या घरांची भेट मिळणार आहे.

गेल्या अनेक दशकांपासून संत नामदेव कवायत मैदानाच्या बाजूला असलेली पोलीस वसाहत अत्यंत जीर्ण झाली होती. ब्रिटीशकालीन व जुन्या धाटणीची ही घरे असल्याने पावसाळ्यात छतामधून पाणी गळणे, भिंतींना ओलावा येणे, ड्रेनेज लाईन तुंबणे अशा अनेक समस्यांना पोलीस कर्मचाऱ्यांच्या कुटुंबांना सामोरे जावे लागत होते. कर्तव्य बजावताना पोलिसांना कुटुंबाच्या सुरक्षेची चिंता सतावत असे. हीच गंभीर बाब लक्षात घेऊन शासनाच्या पोलीस गृहनिर्माण महामंडळाने या ठिकाणी नवीन आणि आधुनिक इमारती उभारण्यास मंजुरी दिली. त्यानुसार जुनी जुनाट वसाहत जमीनदोस्त करून त्या जागी आता या गगनचुंबी इमारती दिमाखात उभ्या राहिल्या आहेत.



**शहराच्या वैभवात पडली मोठी भर**

संत नामदेव पोलीस कवायत मैदान परिसर हा हिंगोली शहराच्या मुख्य केंद्रबिंदूपैकी एक मानला जातो. या मैदानाच्या बाजूलाच आता या टोलजंग इमारती उभ्या राहिल्याने संपूर्ण परिसराचा लूक बदलला आहे. बाहेरून येणाऱ्या नागरिकांनाही या इमारती आकर्षित करत असून, हिंगोली शहर आता आधुनिकतेकडे पाऊल टाकत असल्याचे हे उत्तम उदाहरण ठरले आहे. या भव्य वास्तूमुळे शहराच्या सौंदर्यात प्रचंड भर पडली आहे.

पोलीस बांधव दिवस-रात्र, ऊन-पाऊस, सण-उत्सवांची पर्वा न करता जनतेच्या सुरक्षेसाठी रस्त्यावर तैनात असतात. अशा वेळी त्यांच्या कुटुंबाला सुरक्षित आणि चांगल्या वातावरणात राहता यावे, हा या प्रकल्पाचा मुख्य उद्देश आहे. या नवीन बहुमजली इमारतींमध्ये प्रत्येक पोलीस कर्मचाऱ्याच्या कुटुंबासाठी प्रशस्त फ्लॅट्स तयार करण्यात आले आहेत. दर्जेदार बांधकाम, मुबलक हवा आणि प्रकाश राहील अशी रचना, अत्याधुनिक विटकाम आणि उत्कृष्ट दर्जाचे साहित्य वापरून ही निवासस्थाने तयार करण्यात आली आहेत.

केवळ इमारती न उभारता या संपूर्ण वसाहतीचा परिसर हायटेक केला जात आहे. यामध्ये २४ तास पाणीपुरवठा, पिण्याच्या आणि वापराच्या पाण्यासाठी स्वतंत्र विहिरी व साठवण टाक्या,पोलीस कर्मचाऱ्यांच्या वाहनांसाठी तळमजल्यावर प्रशस्त पार्किंग व्यवस्था, वसाहतीतील मुलांसाठी खेळण्याची छोटी जागा आणि विरंगुळा केंद्र, संपूर्ण परिसराला मजबूत सुरक्षा भिंत आणि रात्रीच्या वेळी प्रकाशमान राहण्यासाठी आधुनिक एलईडी पथदिवे लावण्यात येत आहेत.

सध्या या सर्व इमारतींच्या बाहेरील व आतील रंगरंगोटीचे, वीज जोडणीचे आणि किरकोळ फिनिशिंगचे काम युद्धपातळीवर सुरू असून ते अंतिम टप्प्यात आले आहे. पुढील काही महिन्यांतच या इमारतींचे लोकार्पण करून त्या पोलीस कर्मचाऱ्यांच्या सेवेत सुपूर्द केल्या जातील, अशी माहिती सूत्रांनी दिली आहे. अनेक वर्षांपासून जुन्या आणि पडक्या घरात राहणाऱ्या पोलीस कुटुंबांमध्ये आता या नव्या देखण्या घरांमध्ये गृहप्रवेश करण्यासाठी प्रचंड उत्साहाचे आणि आनंदाचे वातावरण पाहायला मिळत आहे.

पोलीस कर्मचारी २४ तास तणावाखाली काम करत असतात. ड्युटीवरून घरी आल्यानंतर त्यांना आणि त्यांच्या कुटुंबाला हवेशीर, स्वच्छ आणि सुरक्षित घर मिळावे ही जुनी मागणी होती. कवायत मैदानाशेजारील या सुसज्ज इमारतींमुळे पोलिसांना राहण्यासाठी उत्तम दर्जाचे वातावरण मिळणार असून, यामुळे त्यांच्या कामाचा ताण हलका होण्यास नक्कीच मदत होईल.

# नांदेड येथे रेल्वे कोच, वंदे भारत, अमृत भारत मेंटेनन्स देखभाल डेपो उभारा

## विविध मागण्यांसाठी खा . डॉ. अजित गोपछडे यांनी घेतली केंद्रीय रेल्वेमंत्र्यांची भेट

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. २७ मे -**

पुणेनांदेड तसेच हैदराबादनांदेड वंदे भारत सेवा तात्काळ सुरू करावी , हजूर साहिब नांदेड येथे वंदे भारत आणि अमृत भारत गाड्यांसाठी

रेल्वे कोच, वंदे भारत, अमृत भारत मेंटेनन्स देखभाल डेपो उभारण्यात यावे.

नांदेड इलेक्ट्रिक लोको ट्रिप शेडचे काम लवकर पूर्ण करण्यात यावे. नांदेड रेल्वे स्थानकावरील रेल्वे पिट लाईन मालटेकडी रेल्वे स्थानकाकडे स्थलांतरित करून मालटेकडी रेल्वे स्थानकाचा सर्व आवश्यक रेल्वे सुविधांसह विकास करावा अशी मागणी खा. डॉ. अजित गोपाछडे यांनी केंद्रीय रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव यांच्याकडे केली आहे.

खा. डॉ. अजित गोपछडे यांनी काल दिल्लीत केंद्रीय रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव यांची भेट घेतली. या भेटीत त्यांनी.मराठवाड्यातील दीर्घकालीन रेल्वे विकासाला, धार्मिक पर्यटनाला, औद्योगिक प्रगतीला आणि आधुनिक रेल्वे पायाभूत सुविधांना नवी दिशा देण्याच्या उद्देशाने केंद्र सरकारसमोर रेल्वे विकासाचे व्हिजन मांडले आहे. त्यांनी नांदेडलातूर रोड तथा नांदेड-बिदर रेल्वे मार्गाच्या कामाला गती देणे, बोधनबिलोलीनरसीलातूर रोड (१३४ कि.मी.) सर्वेक्षण झालेल्या रेल्वेमार्गास मंजुरी देणे तसेच आगामी रेल्वे अर्थसंकल्पात निधीची तरतूद करण्याची मागणी प्रमुखत्वाने केली. तसेच धर्माबाद रेल्वे स्थानकाचे नामकरण परमपूज्य डॉ. केशव बळीराम हेडगेवार रेल्वे स्थानक असे करण्याची विनंतीही केली.



हजूर साहिब नांदेड रेल्वे स्थानकाचा जागतिक दर्जाचे, आधुनिक, हरित व पर्यावरणपूरक रेल्वे स्थानक म्हणून विकास करण्याची मागणी करताना त्यांनी स्थानक परिसरात पर्यटक माहिती केंद्र, सौर ऊर्जा प्रणाली, पावसाच्या पाण्याचे संकलन, दोन्ही प्रवेशद्वारांवर उद्याने, कारंजे, सुशोभीकरण, आधुनिक स्वच्छता व्यवस्था, डिजिटल माहिती प्रणाली, मल्टीलेव्हल पार्किंग, स्वतंत्र प्रतीक्षालये आणि उच्च दर्जाच्या प्रवासी सुविधा उपलब्ध करण्याची आवश्यकता व्यक्त केली. तसेच स्थानक पुनर्विकासापूर्वी दोन नवीन प्लॅटफॉर्म उभारणे आणि तख्त हजूर साहिबसह नांदेडच्या सांस्कृतिक व आध्यात्मिक वारशाचे दर्शन घडविणाऱ्या वास्तुशिल्पीय संकल्पनांचा विकास आराखड्यात समावेश करण्याचा आग्रह धरला.

रेल्वे संपर्क विस्ताराच्या दृष्टीने जालना नांदेड काचीगुडा तिरुपती दैनिक पुष्करिणी एक्सप्रेस, नांदेडसावंतवाडी द्विसाप्ताहिक एक्सप्रेस तसेच हजुर साहिब नांदेड-धुबरी साहिब-तीनसुकिया पूर्वोत्तर भारतासाठी नवीन अमृत भारत रेल्वे सेवा सुरू करण्याची मागणी करण्यात आली. याशिवाय पूर्णापटना एक्सप्रेस त्रिसाप्ताहिक करणे, हजूर साहिब नांदेडअंब अंदौरा आणि नांदेडसंत्रागाछी एक्सप्रेस द्विसाप्ताहिक करणे तसेच बंगळुरूनांदेड एक्सप्रेस वाराणसीपर्यंत वाढविण्याचा प्रस्तावही त्यांनी मांडला.

खा. डॉ. गोपछडे यांनी नांदेडमुंबई वंदे भारतचा प्रवास कालावधी आठ तासांच्या आत आणणे, नांदेडजालना रेल्वे मार्गावर १३० कि.मी. प्रतितास सेक्शन स्पीड मंजूर करणे तसेच अंकाई, लातूर रोड आणि परळी वैजनाथ बायपास रेल्वे प्रकल्पांना गती देण्याची मागणी केली. याचबरोबर उमरीधर्माबादबासर रेल्वे मार्गावरील वाढती वाहतूक आणि जनसुरक्षा लक्षात घेऊन रेल्वे अंडरब्रिजचे काम तातडीने पूर्ण करण्याची आवश्यकता त्यांनी रेल्वेमंत्र्यांच्या निदर्शनास आणून दिली.

**धर्माबाद रेल्वे स्थानकाचे नामकरण करावे**

धर्माबाद रेल्वे स्थानकाचे नामकरण प.पू. डॉ. केशव बळीराम हेडगेवार रेल्वे स्थानक असे करण्याची विनंतीही खा. डॉ. अजित गोपाछडे यांनी केंद्रीय रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव यांच्याकडे केली.

# पैशाची मागणी करून मरणास परावृत्त ; दोघांवर गुन्हा दाखल!

**तभा वृतसेवा**
**फुलवळ, दि. २७ मे -**

तालुक्यातील फुलवळ येथील रहिवासी मयत स्वप्नील प्रल्हाद बसवंते वय २३ वर्षे यांच्याकडे त्यांची गाडी सोडवून देण्याच्या बदल्यात पैशाची मागणी करून, त्याला टॉर्चर करून गळफास घेण्यास परावर्त करणाऱ्या दोघाजणाविरुद्ध कंधार पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. त्यामुळे दबंगगिरी व खंडणी वसूल करणाऱ्यांचे चांगलेच धाबे दणाणले आहेत.

घटनेचे थोडक्यात वृत्त असे दिनांक २४ मे २०२६ रोज रविवारी दुपारी आरोपी नवनाथ भीमराव बनसोडे व हरिदास रामू बसवंते यांनी संगणमत करून, मयत स्वप्निल प्रल्हाद बसवंते वय २२ वर्षे यांचे घरी जाऊन तुझी शाईन मोटरसायकल पोलीस ठाण्यातून सोडवून देण्यासाठी स्वप्निल यांच्याकडे पैशाची मागणी करून त्याचेवर दबाव आणत होते, त्यास गुन्हा खूप मोठा आहे त्यात तू सुटत नाहीस तुला शिक्षा होते असे सतत दबाव टाकून त्याला टॉर्चर करत होते त्यामुळे मयत स्वप्नीलने नवनाथ बनसोडे व हरिदास बसवंते यांच्या दबावाला व मानसिक त्रासाला कंटाळून रात्रीच्या सुमारास गळफास घेऊन आत्महत्या केली. अशा आशयाच्या फिर्यादीवरून कंधार पोलीस ठाण्यात पोलीस निरीक्षक चंद्रकांत जाधव यांचे आदेशान्वये दोघांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

मयताची आई मीनाक्षी प्रल्हाद बसवंते वय ३८ वर्षे यांचे फिर्यादीवरून कंधार पोलीस ठाण्यात नवनाथ भीमराव बनसोडे व हरिदास रामू बसवंते यांच्याविरुद्ध गुरनं.२००/२०२६ कलम १०८,३०८(३),३ (५) बीएनएस प्रमाणे दाखल करून पुढील तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक विकास कोकाटे हे करत आहेत.

## सुजायतपूर येथे आजपासून श्रामणेर शिबिराला प्रारंभ

**देगलूर** -देगलूर तालुक्यातील सुजायतपूर येथे जेतवन शैक्षणिक, सामाजिक चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने गुरूवार, दि. २८ मे पासून श्रामणेर शिबिराचे आयोजन करण्यात आले असून, बौद्ध धम्माचे विचार व संस्कार नव्या पिढीपर्यंत पोहोचविण्याच्या उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात येत आहे. या शिबिरास भंते पय्याबोधी महाथेरो, खुरगाव (नांदेड) यांचे मार्गदर्शन लाभणार असून, प्रमुख उपस्थिती म्हणून भंते दीपरत्न, उस्माननगर (नांदेड) उपस्थित राहणार आहेत. कार्यक्रमाचे आयोजन जेतवन शैक्षणिक, सामाजिक चॅरिटेबल ट्रस्टच्या अध्यक्षा सावित्रीताई शेवाळकर व सर्व आयोजन समितीच्या माध्यमातून दि. २८ मे २०२६ ते ६ जून २०२६ पर्यंत संपन्न होणार आहे. श्रामणेर शिबिरामध्ये एकूण २१ मुले-मुली सहभागी झाले असून, त्यांना त्रिशरण, पंचशील, बुद्ध वंदना, धम्म संस्कार, ध्यान साधना तसेच बौद्ध धम्मातील विविध विचारधारांचे प्रशिक्षण दिले जाणार आहे. भंते पय्याबोधी महाथेरो (खुरगाव नांदुसा नांदेड) व भंते दीपरत्न (उस्माननगर, नांदेड) यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांना नैतिकता, शिस्त, करुणा आणि धम्ममय जीवनाचे संस्कार दिले जाणार आहेत. या शिबिराच्या माध्यमातून बौद्ध धम्मातील मानवतावादी विचार समाजाच्या तळागाळापर्यंत पोहोचविण्याचा प्रयत्न करण्यात येत असून, सामाजिक, शैक्षणिक व राजकीय क्षेत्रातील अनेक मान्यवर या कार्यक्रमास उपस्थित राहणार असल्याची माहिती आयोजकांनी दिली. तसेच या शिबिराचा लाभ घ्यावा असे, आवाहन केले आहे. या शिबिरास सुजायतपूर येथील उपासक - उपासिका, सर्व गावकरी यांचे सहकार्य लाभणार आहे.



# मुक्या जीवासाठी सावली बनले झाड; फोटो पाहून अनेकांचे डोळे पाणावले

**तभा वृतसेवा**
**इस्लापूर, दि. २७ मे -**

उन्हाचा तडाखा दिवसेंदिवस वाढत चालला आहे. रस्ते तापले आहेत, माणूसच नव्हे तर मुक्या प्राण्यांचेही जगणे कठीण झाले आहे. अशाच कडक उन्हात एका छोट्याशा झाडाखाली सावलीत शांत बसलेले कुत्र्याचे निरागस पिल्लू पाहून अनेकांच्या मनात मायेची भावना जागी झाली. हा साधा वाटणारा क्षण मात्र समाजाला मोठा संदेश देऊन गेला.

भर दुपारच्या रणरणत्या उन्हात, अंगाची लाही लाही होत असताना त्या छोट्याशा झाडाने एका मुक्या जीवासाठी जणू आईची माया उभी केली होती. मोठी झाडे तोडून काँक्रीटची जंगले उभी राहत असताना, एका छोट्याशा झाडाने दिलेली ही थंड सावली माणसालाही विचार करायला भाग पाडणारी ठरली.



आज शहरांमध्ये विकासाच्या नावाखाली हजारो झाडे नष्ट होत आहेत. परिणामी तापमान वाढत आहे, पाण्याची कमतरता जाणवत आहे आणि मुक्या प्राण्यांचे जीवन धोक्यात आले आहे. अशा परिस्थितीत या एका दृश्याने पर्यावरण संवर्धनाचा संदेश अधिक ठळकपणे समोर आणला आहे.

विशेष म्हणजे, त्या छोट्याशा झाडाने कुठलाही भेदभाव केला नाही. ना भाषा, ना जातीचा प्रश्न फक्त जीवाला जीव देणारी सावली दिली. माणसानेही निसर्गाकडून हाच धडा शिकण्याची गरज असल्याची भावना अनेकांनी व्यक्त केली.

हा फोटो सोशल मीडियावरही मोठ्या प्रमाणात व्हायरल होत असून, झाडे म्हणजे पृथ्वीचा श्वास, आज झाड वाचवा, उद्या जीवन वाचवा, मुक्या जीवांसाठी थोडी माया ठेवा अशा भावना नेटकऱ्यांनी व्यक्त केल्या आहेत.

पर्यावरणप्रेमींनीही नागरिकांना आवाहन केले आहे की, प्रत्येकाने किमान एक झाड लावावे आणि उन्हाळ्यात मुक्या प्राण्यांसाठी पाण्याची व्यवस्था करावी. कारण झाडे फक्त ऑक्सिजन देत नाहीत, तर ती प्रत्येक जीवाला जगण्यासाठी आधार देतात. एका छोट्याशा झाडाखाली बसलेल्या त्या पिल्लाने जणू संपूर्ण समाजाला शांतपणे सांगितले माणसा निसर्ग जपलास तरच जीवन टिकेल!

## एसओएफ आंतरराष्ट्रीय ऑलिम्पियाडमध्ये नांदेडच्या विद्यार्थ्यांची उत्कृष्ट कामगिरी

**नांदेड** -विद्यार्थ्यांनी सायन्स ऑलिम्पियाड फाउंडेशन (एसओएफ) परीक्षा २०२५-२६ मध्ये उत्कृष्ट यश मिळवून शहराला गौरव प्राप्त करून दिला आहे.

सामान्य ज्ञान ऑलिम्पियाडमध्ये आंतरराष्ट्रीय रँक मिळवणारा सह्याद्री पब्लिक स्कूल, परडी लोहा येथील इयत्ता ८ वीचा विद्यार्थी यशराज एन देशमुख, आंतरराष्ट्रीय इंग्रजी ऑलिम्पियाडमध्ये आंतरराष्ट्रीय रँक मिळवणारी स्वामी विवेकानंद विद्या विहार येथील इयत्ता १ लीची विद्यार्थिनी देवंशी पांडिलवार, राष्ट्रीय विज्ञान ऑलिम्पियाडमध्ये आंतरराष्ट्रीय रँक मिळवणारा चाटे फाउंडेशन नांदेड येथील इयत्ता १ लीचा विद्यार्थी सोनटक्के दक्ष सुनील आणि आंतरराष्ट्रीय गणित ऑलिम्पियाडमध्ये (खचज) आंतरराष्ट्रीय रँक मिळवणारा चेतना इंग्लिश स्कूल येथील इयत्ता १ लीचा विद्यार्थी श्रीवर्धन वैभव धुमाळे यांचा समावेश आहे. सर्व विद्यार्थ्यांना सुवर्णपदके आणि प्रमाणपत्रे प्रदान केली जातील.

## मेहनत, जिद्द आणि गुणवत्तेचा संगम; अनुष्का बेंद्रीकरची दैदिप्यमान कामगिरी

**नायगाव** -यश हे कधीच सहजासहजी मिळत नसते ; त्यामागे असते अथक परिश्रमांची शिदोरी, ध्येय गाठण्याची जिद्द आणि कुटुंबासह गुरुजनांचे भक्कम पाठबळ. अशाच चिकाटीच्या जोरावर प्रियदर्शनी ग्लोबल इंग्लिश मिडीयम स्कूलची कु.अनुष्का बालाजी बेंद्रीकर हिने इयत्ता दहावी बोर्ड परीक्षेत ९५.८० टक्के गुण मिळवत शाळेत प्रथम क्रमांक पटकावून उज्ज्वल यश संपादन केले आहे. तिच्या या नेत्रदीपक कामगिरीमुळे संपूर्ण शाळा परिसरात आनंदाचे वातावरण निर्माण झाले असून, ती विद्यार्थ्यांसाठी प्रेरणेचा नवा आदर्श ठरली आहे. अनुष्काच्या या दैदिप्यमान यशाबद्दल शाळेच्या संचालक मंडळाच्या वतीने तिचा विशेष सत्कार करण्यात आला. पुष्पगुच्छ देऊन तिच्या गुणवत्तेचा गौरव करण्यात आला. यावेळी तिचे वडील बालाजी बेंद्रीकर, आई मीनाक्षी बेंद्रीकर, शाळेचे संचालक आकाश मादसवार, मुख्याध्यापिका वर्षा कंठे मॅडम, शिक्षकवृंद व शाळेतील कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. मोठी स्वप्ने पाहा आणि त्यासाठी सातत्याने प्रयत्न करा, यश नक्कीच तुमच्या पायाशी येते, असा संदेशच जणू अनुष्काने आपल्या यशातून विद्यार्थी तरुणाईसमोर ठेवला आहे. नियमित अभ्यास, वेळेचे योग्य नियोजन आणि शिक्षकांच्या मार्गदर्शनामुळे हे यश मिळाल्याची भावना अनुष्काने व्यक्त केली. प्रियदर्शनी ग्लोबल स्कूलने केवळ शैक्षणिक गुणवत्ता जपली नाही, तर विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी सातत्याने प्रयत्न केले आहेत. अनुष्काच्या यशामुळे शाळेच्या गुणवत्तेच्या परंपरेत आणखी एक मानाचा तुरा रोवला गेला आहे. तिच्या यशाबद्दल परिसरातून अभिनंदनाचा वर्षाव होत असून, भविष्यातही ती उच्च शिखरे गाठेल, असा विश्वास व्यक्त केला जात आहे. शाळेच्या संचालक मंडळाने अनुष्काच्या पुढील शैक्षणिक वाटचालीस शुभेच्छा देत, विद्यार्थ्यांनी तिच्या जिद्दीचा आणि मेहनतीचा आदर्श घ्यावा, असे आवाहन केले.



# सोनारी फाट्यावरील टोलनाक्यावर सुविधेचा अभाव

**तभा वृतसेवा**
**हिमायतनगर, दि. २७ मे -**

सोनारी फाट्याजवळ चालू झालेल्या टोलनाक्याला परवानगी कशी दिली, या विषयी सध्या तर्कवितर्क लावले जात असून या टोलनाक्यावर कोणतीच सूविधा नाही. आणि विशेषत्वाने येथे पिण्याच्या पाण्याची सुविधा करण्यात आली नाही. सौचालय कुलूपबंद आहे. सध्या भोकर, हिमायतनगर अंतर्गत रस्त्याची मोठ्या प्रमाणात वाताहत झाली आहे. सिमेंट रस्त्याला जागोजागी खड्डे, भेगा पडल्या आहेत. अशी रस्त्याची दयनिय अवस्था असतानाही येथे टोलनाका सुरू केलेला आहे. आणि वसूलीही येथे जोमाने चालू आहे. हा गैर प्रकार कुठेतरी थांबला पाहीजे.या करीता प्रशासनाने दखल घेणे गरजेचे असून हा टोल नाका तात्काळ बंद करून अंतर्गत रस्ता दुरूस्ती,पडलेल्या भेगा बुजवून शासनाच्या नियमाप्रमाणे टोलनाक्यावरील सर्व सोयी,सूविधा उपलब्ध झाल्यानंतरच टोलनाका सुरू करावा. अशी मागणी होत आहे.




राज्य रस्त्याचे रूपांतर नॅशनल हायवे मध्ये झाल्यानंतर या मार्गावर असलेली महाकाय वृक्ष तोडण्यात आली. हा रस्ता तयार होण्याअगोदर झाडे तोडलेल्या प्रमाणात नाही तरी काहींतरी प्रमाणात या मार्गावर वृक्ष लागवड व संगोपन करणे गरजेचे होते. परंतू दुर्दैवाने तसे झाले नाही. शेकडो झाडांची अक्षरशः कत्तल झाली. आता चालू झालेल्या टोलनाक्या नजिक खुप मोठी झाडे होती. ती तोडल्या गेल्यानंतर येथे वृक्ष लागवड होणे अपेक्षित असताना येथे एक ही झाड या टोलनाक्याजवळ लावलेले नाही. टोलनाक्यावर शासनाच्या नियमाप्रमाणे ज्या काहीं सुविधा अपेक्षित असतात. त्या कोणत्याच सोयी, सूविधा येथे उपलब्ध करूण दिल्या गेल्या नाहीत. ही बाब गंभीर स्वरूपाची ठरत असतानाच टोलनाक्यावर शिकाऊ उमेदवार ज्यांचे वय अठरापेक्षा कमी आहे. अश्या लहाण मुलांना टोलनाक्यावर कामाला जुंपवून त्या बालमजूरांकडून काम करवून घेतले जात आहे. शासनाच्या सर्व नियमाला बगल देवून हा टोलनाका सुरू करण्यात आला आहे. ही अतिशय गंभीर बाब ठरत असून नॅशनल हायवे च्या अधिक्षक अभियंत्यानी या बाबींकडे तातडीने लक्ष वेधून सध्याची टोलवसूली तात्काळ बंद करावी. या ठिकाणी शासनाचे नियमाप्रमाणे सर्व सोयीसूविधा व तसेच या अंतर्गत रस्त्याची दुरूस्ती, वृक्ष लागवड व संगोपनानंतरच टोलवसूलीला परवानगी द्यावी. अशी मागणी प्रवाश्यांतून जोर धरत आहे.

## मुदखेड तालुका भाजपा युवामोर्चाच्या उपाध्यक्षपदी माधव पाटील वसुरे

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. २६ मे -**

मुदखेड तालुक्यातील मेंडका येथील भाजपाचे कट्टर व एकनिष्ठ कार्यकर्ते माधव मारोती वसुरे यांची भारतीय जनता पक्षाच्या युवा मोर्चाच्या तालुका उपाध्यक्ष पदी निवड करण्यात आली आहे. महाराष्ट्र राज्याचे माजी मुख्यमंत्री तथा राज्यसभेचे खासदार अशोकराव चव्हाण, भोकर विधानसभेच्या आमदार ॲड. श्रीजयाताई चव्हाण,भाजपाचे जिल्हाध्यक्ष ड.किशोर देशमुख यांनी भाजपा युवामोर्चाच्या तालुका उपाध्यक्षपदी माधव पाटील वसुरे यांची नियुक्ती केली आहे. मुदखेड तालुका भाजपा युवामोर्चाच्या उपाध्यक्षपदी माधव पाटील वसुरे यांची निवड झाल्याबद्दल भारतीय जनता पक्षाचे उत्तर महामंत्री मा.बाळासाहेब देशमुख बारडकर, मुदखेड तालुकाध्यक्ष केशव पा.मुंगल तसेच नगराध्यक्ष मुदखेड माधव पाटील कदम, तालुकाध्यक्ष दत्तुभाऊ देशमुख,मारोती पाटील आदिंनी अभिनंदन करुन शुभेच्छा दिल्या.


# कार्यालय देगलूर नगर परिषद देगलूर जि. नांदेड

## जाहिर सुचना

**(महाराष्ट्र नगर परिषद, नगरपंचायत व औदयोगीक नगरी अधिनियम १९६५ चे कलम १९५ अन्वये)**

**(जुन्या व जीर्ण इमारतीबाबत)**

देगलूर शहरातील जिर्ण व मोडकळीस आलेल्या इमारत । घर मालकांना सुचित करण्यात येते कि, आता लवकरच पावसाळा सुरू होत असुन पावसाळयात जिर्ण, मोडकळीस आलेल्या इमारती / घरांची पडझड होत असते. पावसाळयापुर्वी आपले जिर्ण व मोडकळीस आलेल्या पडावु इमारती / घरांची दुरूस्ती करून घेण्यासांबंधी कार्यवाही करून संभाव्य अपघात टाळावा. जिर्ण व मोडकळीस आलेल्या इमारती /घरांचा पडावु भाग पडल्यास व त्यापासुन वितहानी अगर प्राणहानी झाल्यास त्यास नगर परिषद जबाबदार राहणार नाही. त्याची सर्वस्वी जबाबदारी इमारत । घर मालक व भोगवटादार यांचीच राहिल याची सर्व संबंधितांनी नोंद घ्यावी. संभाव्य दुर्घटना टाळण्या करिता नागरिकांनी पडावु घरात रहिवास करू नये. तसेच ३० वर्षावरील इमारतींचे शासन आदेशानुसार परवानाधारक वास्तु विशारद यांचेकडुन स्ट्रक्चर ऑडीट करून घ्यावे व ऑडीट रिपोर्ट नुसार आवश्यक ती दुरूस्ती करून घेण्यात यावी.

तसेच देगलूर शहरातील नदी काठी किंवा नैसर्गिक नाला प्रवाह शेजारी राहणा-या नागरिकांना सुचित करण्यात येते कि, लवकरच पावसाळा सुरू होत असुन पावसाळयात अतिवृष्टीमुळे किंवा सततधार पावसामुळे आपल्या नदीस/प्रवाह तसेच इतर नाल्यास पुर येण्याचा संभव आहे. तरी पावसाळया पुर्वी आपल्या नदीनाल्याच्या काठावरील घरे, दुकाने, विटभट्टया, टप-या, खळे इत्यादी स्वखर्चाने इतरत्र हलविण्याची व्यवस्था करावी. यात प्राणहानी अगर वित्तहानी झाल्यास नगर परिषद देगलूर जबाबदार राहणार नाही व कोणत्याही प्रकारची आर्थिक मदत देण्यात येणार नाही याची सर्व संबंधीतांनी नोंद घ्यावी.

नदी व नाल्याच्या शेजारी नैसर्गिक प्रवाहास अडथळा होईल असे कोणत्याही स्वरूपाचे बांधकामे /ओटे केलेले असतील, गटारीवर ढापे टाकुन अडथळा निर्माण होईल असे कृत्य केलेले असतील तर त्यांनी ते त्वरीत काढुन टाकावे. सदर बांधकामा मुळे पावसाचे पाणी निचरा होण्यास अडचण आल्यास संबंधीतांवर गुन्हा दाखल करण्यात युवून सदर बांधकाम / अडथळे कोणतीही पुर्व सुचना न देता काढून टाकण्यात येतील याची नोंद घ्यावी.

**स्वाक्ष-**
**सौ. विजयमाला बालाजीराव टेकाळे**
**नगराध्यक्षा नगरपरिषद देगलूर**

**(निलम कांबळे)**
**मुख्याधिकारी**
**नगर परिषद देगलूर**


# डॉ.आंबेडकर पुतळा ते छ. शिवाजी महाराज पुतळा दरम्यान रस्त्याच्या बाजूने नाली करण्यास बी अँड सी उदासीन

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. २७ मे -**

शहरातील डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर पुतळा ते छत्रपती शिवाजी महाराज पुतळा दरम्यान झालेल्या रस्त्याच्या कामानंतर दोन्ही बाजूने नाली केली नसल्याने या भागात दुर्गंधी पसरली आहे. विशेष म्हणजे हा रस्ता शहरातील मुख्य रस्ता म्हणून ओळखल्या जातो. हजुर साहेब रेल्वेस्थानकावर आलेला प्रत्येक माणूस याच रस्त्याने शहरात प्रवेश करतो. त्यांना मात्र या अर्धवट कामाचा त्रास सहन करावा लागतो. पाठपुरावा करूनही सार्वजनिक बांधकाम विभाग या कामासाठी उदासीन असल्याचे दिसून येत आहे.

रेल्वे स्टेशन, जीएसटी ऑफिस ते छत्रपती शिवाजी महाराज पुतळ्या पर्यंतच्या दोन्ही बाजूच्या नालीचे काम करण्यांत आले नाही.

डॉक्टर आंबेडकर पुतळा जीएसटी ऑफिस ते छत्रपती शिवाजी महाराज पुतळा या रस्त्यावरील नालीचे काम बऱ्याच दिवसापासून रखडलेले आहे. सदर नालीमध्ये पाणी वाहून जाण्यासाठी मार्ग नसल्यामुळे तसेच सदर नालीस घुस लागलेली आहे. सीसी रोडचे काम पूर्ण झालेले आहे. परंतु नालीचे काम अद्यापपर्यंत झालेले नाही, त्यामुळे या परिसरातील नागरिकांना या घाण पाण्याचा वारंवार त्रास होत आहे. ज्या दिवशी महापालिकेच्या नळाला पाणी आले त्या दिवशी मोठ्या प्रमाणात रस्त्यावर पाणी येत असते. त्याचा त्रास रस्त्यावरून ये- जा करणा-या भाविक/नागरिकांना होत आहे. याच रस्त्यावर धार्मिक स्थळ सुध्दा आहेत. त्याही भक्तांना या घाण पाण्याचा त्रास होत आहे.

जीएसटी ऑफिस ते छत्रपती शिवाजी महाराज पुतळा या दोन्ही बाजुच्या नालीचे तात्काळ हाती घेवून काम पूर्ण करुन घ्यावे अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते वसीम बाबू कासिम उस्मान शेठ यांनी महानगरपालिकेकडे केली असून महानगरपालिकेने या कामासंदर्भात सार्वजनिक बांधकाम विभागाला पत्र दिले आहे. पावसाळ्यापूर्वी जर ही कामे मार्गी लागली तर या भागातील नागरिकांना त्रास होणार नाही याची काळजी महानगरपालिकेने व बी अँड सीने घेणे गरजेचे असल्याचेही सांगण्यात आले.

